मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुररस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.


सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका



अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्‌मयीन नियतकालिक


युगवाणी

एप्रिल-मे-जून २०१३



चित्र : विजयराज बोधनकर

अनुक्रमणिका



मकर संक्रांत १९२३

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

युगवाणी

वर्ष : ६८ वे/अंक : पहिला

एप्रिल-मे-जून २०१३


अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

युगवाणी

एप्रिल-मे-जून २०१३

संपादक
प्रा. अजय देशपांडे



मुखपृष्ठ, मलपृष्ठ व आतील चित्रे :
विजयराज बोधनकर
२०३-१-१, बंगला नं. सोसायटी,आझाद नगर, घोडबंदर रोड,ठाणे (प.)भ्रमणभाष ९९२०४११८२८

रेखाटने :
प्रा. वसंत आवाजी डहाके
'कैवल्य' दक्षिण मालटेकडी, परिगणित कॉलनी, अमरावती, भ्रमणभाष : ९८९०३६२७०३

प्राचार्य सदानंद बोरकर
श्री ज्ञानेश चित्रकला महाविद्यालय, नवरगाव जि. चंद्रपूर, भ्रमणभाष : ९०२१३३३६३३

मांडणी, सजावट, अक्षरजुळवणी व मुद्रण :
ॲक्टिव्ह कॉम्प्युटर,वणी,जि.यवतमाळ

मूल्य : साठ रूपये

वार्षिक वर्गणी : २०० रूपये

ISSN - 2319-6092


प्रकाशक
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक,
नागपूर - ४४००१२
दूरध्वनी : ०७१२-२५२३९२९, २५५३७६७

वर्गणी व अंकासंबंधी चौकशीकरिता दूरध्वनी : ०७१२-२५४००१४

संपादकीय पत्रव्यवहार
प्रा.अजय देशपांडे
वामनघाट मार्ग, हनुमान नगर,वणी ४४५३०४, जि. यवतमाळ
भ्रमणध्वनी : ९८५०५९३०३०
ई-मेल : srushti_ajay@rediffmail.com, yugwanivss@rediffmail.com

www.yugwanivss.com
www.facebook.com/yugwani.ank@gmail.com

अनुक्रमणिका




संपादकीय

■

साहित्याचा विचार समाजाला वगळून करता येणे शक्य नाही. साहित्य आणि समाज यांच्यातील नाते विशद करताना हॅरी लेविन म्हणतो, ''साहित्य आणि समाज यांच्यातील संबंध अन्योन्य असतात. साहित्य हा केवळ सामाजिक कारणांचा परिणाम नसतो तर ते सामाजिक परिणामांचे कारणही असू शकते'' खरे तर साहित्य आणि समाज यांच्यातील अन्योन्य संबंधांचा अलीकडे विसरच पडला आहे असे म्हणावयास भरपूर वाव आहे. 'साहित्य म्हणजे सामाजिक सांस्कृतिक पर्यावरणाच्या संबंधात मनुष्यमात्राचा अभ्यास' या अन्वर्थक विचाराचेही विस्मरण झाले असण्याची शक्यता वर्तविली जाऊ शकते. डॉ. भा. ल. भोळे म्हणाले होते, ''सभोवतीच्या सामाजिक-सांस्कृतिक पर्यावरणाशी सर्जनशील कलावंताचे जैविक नाते असते आणि त्यामुळे पर्यावरणातील परिवर्तनाचे पडसाद त्याच्या आविष्कृतींमधून अपरिहार्यपणे उमटणे क्रमप्राप्त असते जर ते तसे उमटले नाहीत तर ती एक विकृती मानून तिच्या कार्यकारणांचा शोध घेणे आवश्यक ठरते'' आज मराठीतील साहित्यकृती आणि महाराष्ट्रातील कलावंतांच्या कलाकृती जर सामाजिक सांस्कृतिक पर्यावरणाच्या कालच्या रूपस्वरूपांचेच चित्रण करण्यात गुरफटलेल्या असतील तर वर्तमानाचे अन्वयार्थ कधी लावायचे ? भूतकाळाचे चित्रण आणि त्यातून समाजाचे साक्षेपी परीक्षण आवश्यक असले तरी ते करताना वर्तमान हातातून निसटून जाणे कदापि योग्य नाही. १९७५ आणि १९९० नंतरच्या इष्टानिष्ट सांस्कृतिक सामाजिक प्रक्रियांचे अन्वयार्थ साहित्यकृती आणि कलाकृती कधी लावणार ? काही अपवाद सोडले तर गतकालीन आणि समकालीनही सामाजिक राजकीय स्थित्यंतरांचे आकलन मराठी साहित्यकृतींमध्ये आढळत नाही परिणामी समाजसापेक्ष साहित्यकृतींचा प्रवाह परिवर्तन घडवून आणू शकेल एवढा वाढलेला दिसत नाही. एकीकडे आर्थिकदृष्ट्या स्थिर असणारा अभिजनवर्ग आपल्या सांस्कृतिक प्रभुत्वाचे नवे जाळे विणू लागला आहे तर दुसरीकडे मूठभर राजकारण्यांच्या स्वार्थासाठी नवी झुंडशाही वैचारिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाच्या नावाखाली दर दिवशी सुनियोजितपणे वाढत आहे. अशा स्थितीत सामान्य माणसांचे जगणे, त्यांचे प्रश्न, त्यांच्या उपेक्षा आ‥ त्यावरील उपायोजना याबाबत काहीतरी पावले उचलली पाहिजे, असे फक्त म्हटल्या जात आहे, प्रत्यक्षात साहित्यिक, कलावंत आणि समाज यांच्यातील सांस्कृतिक दरी सतत वाढत आहे. साहित्यिक, कलावंत उत्सवी वातावरणात सेलिब्रिटी होत आहेत, तसे होणे गैर नसले तरी सामान्य माणसांच्या अश्रू आणि रक्ताशी त्यांचे नाते जर नसेल तर मात्र महाराष्ट्राच्या विचारविश्वाने, कलावंत-साहित्यिकांच्या विश्वाने संवेदनशीलता, सृजनशीलता, वैचारिकता आणि नीतिमत्ता गमावली असे जर सामान्य माणसाने समजले, तर गैर काय ? सारा महाराष्ट्र निरपराधी सामान्य माणसांच्या रक्तात आणि अश्रूत व्हावून निघत असताना साहित्यिक, कलावंत शांत आणि स्वस्थ असतील तर साहित्याच्या प्रयोजनांचा, साहित्याच्या समाजशास्त्राचा, साहित्य आणि समाजाच्या संबंधांचा पुनर्विचार करणे अपरिहार्य असते. संथगतीने का होईना पण असा पुनर्विचार महाराष्ट्रात सुरू झाला आहे. 'सावध असा, तुफानाची हीच खरी सुरूवात आहे !'

■ अजय देशपांडे


अनुक्रमणिका



विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

युगवाणी

अ नु क्र म



।। लेख ।।

मर्ढेकरांची संगीतिका: 'कर्ण'

डॉ. सुधीर रसाळ

■

बा.सी. मर्ढेकरांच्या संगीतिकांवर समीक्षात्मक लेखन झालेले दिसत नाही. त्यामुळे मर्ढेकरांचे एकूण वाङ्मय - विशेषत: त्यांचे काव्य-समजून घेण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या त्यांच्या 'कर्ण' या संगीतिकेकडेही समीक्षकांचे दुर्लक्ष झाले आहे. प्रस्तुत लेखात त्यांच्या 'कर्ण' या संगीतिकेच्या स्वरूपाची आणि त्यातून व्यक्त झालेल्या मर्ढेकरांच्या जाणिवांची मीमांसा केली आहे.

आकाशवाणीवर अधिकारी असताना मर्ढेकरांनी आकाशवाणीसाठी एकूण चार संगीतिका लिहिल्या. त्यांपैकी 'संगम' आणि औक्षण' या संगीतिका त्यांना आकाशवाणीची गरज म्हणून लिहाव्या लागल्या. परंतु 'कर्ण' आणि 'बदकाचे गुपित' या दोन संगीतिका मात्र त्यांनी आपणहून आकाशवाणीसाठी लिहिल्या. आकाशवाणीची मागणी म्हणून त्यांना लिहाव्या लागलेल्या संगीतिकांची रचना कृत्रिम झालेली आढळते. परंतु त्यांनी स्वखुषीने लिहिलेल्या 'कर्ण' आणि 'बदकाचे गुपित' या दोन संगीतिकांत मात्र कलात्मक सर्जनाचा प्रत्यय येतो. त्यांच्या या दोन संगीतिकांपैकी येथे आपण 'कर्ण' या संगीतिकेचा विचार करणार आहोत.

मर्ढेकरांच्या या संगीतिकेत महाभारताच्या कर्णपर्वातील कर्णार्जुनाची युद्धकथा सांगितली गेली आहे. महाभारतातील घटनाक्रम आणि त्यातील तपशील मर्ढेकरांनी आपल्या संगीतिकेत मुळाबरहुकूम ठेवला आहे. तो ठेवताना मात्र त्यांनी योग्य तो संक्षेपही केला आहे. उदाहरणार्थ कर्णाचा तेजोभंग करणारे भाषण शल्य सतत करत असतो. ते करताना त्याने कर्णाला कावळ्याची आणि अर्जुनाला हंसाची उपमा देऊन हंसकाककथा ऐकवलेली असते. हंसकाककथेचे उपाख्यान न देता मर्ढेकर शल्याच्या तोंडी 'कौंतेय कुठे हंस! कुठे तू न बलाक। सुतात्मज काक।' एवढेच वाक्य घातले आहे.तसेच महाभारतात कर्ण आणि अर्जुन एकमेकांवर वेगवेगळ्या अस्त्रांचा प्रयोग करतात. या अस्त्रांची नावे, त्यांचा उपयोग केल्यावर दोन्ही सैन्यांची कोणती हानी झाली, त्यांपैकी एकमेकांची कोणती अस्त्रे एकमेकांनी निकामी केली, अस्त्रप्रयोग करताना त्यांनी एकमेकांना कोणत्या शब्दांत आव्हान दिले, मुळातील या विस्तृत तपशिलाचा मर्ढेकरांनी संक्षेप केला आहे. त्यांनी हा तपशील 'परस्परांना शरसंधाने अस्त्रास्त्रें विंधुन' या एका ओळीत सांगितला आहे. या युद्धात योजिली गेलेली महत्त्वाची अस्त्रे आणि त्याचे दोन्ही सैन्यांवर आणि कर्णार्जुनांवर झालेले घातक परिणाम तेवढे या कथेत सांगितले गेले आहेत. मूळ महाभारतातील कथेत मर्ढेकरांनी जरी बदल केलेले नसले तरी त्यांनी एका प्रसंगाची वाढ मात्र केली आहे. जेव्हा कर्णाचा वध होतो तेव्हा ही वार्ता कुंतीला कळल्याचे दु:खी तारकांच्या गानामधून ते सांगतात आणि कुंतीचे शोकोद्गाराचे गीतही देतात. ही घटना मूळ महाभारतात नाही. मर्ढेकरांच्या ठिकाणी असलेल्या मातृप्रेमाच्या भावनेतून मुळात नसलेल्या या प्रसंगाची वाढ झालेली असावी. मर्ढेकरांनी ही संगीतिका आकाशवाणीसाठी लिहिली असल्यामुळे त्यांच्या या लेखनावर कालमर्यादेचे बंधन पडले होते. त्यामुळे त्यांच्या अभिव्यक्तिहेतूच्या दृष्टीने मूळच्या कथेतील ज्या अनेक बाबी अर्थपूर्ण ठरू शकल्या असत्या त्या त्यांना या संगीतिकेत आवश्यक त्या विस्ताराने मांडता आल्या नाहीत. अशा बाबींचा केवळ उल्लेख त्यांना करावा लागलेला आहे. असे उल्लेखही त्यांनी आपल्या निर्मितिहेतूच्या दृष्टीने अर्थपूर्ण बनवले आहेत. हे सर्व लक्षात घेता त्यांनी महाभारतातील कर्णकथा किती बारकाईने अभ्यासली होती हे जसे कळते तसेच या कथेची त्यांना जाणवलेली अर्थपूर्णता व्यक्त होण्यासाठी या कथेचा संक्षेप कसा व किती करायचा, या कथेतील कोणत्या घटना ठळकपणे मांडायच्या या संबंधीच्या

त्यांच्या निर्णयकौशल्याचाही प्रत्यय या संगीतिकेत येतो.

या संगीतिकेच्या रचनेत संवाद आणि कथन अशा दोन माध्यमांची एकत्र योजना केलेली आहे. यांतील संवादांतून कर्ण-अर्जुन, कर्ण-शल्य, कर्ण-कृष्ण, अर्जुन-कृष्ण आणि शल्य-अर्जुन या पात्रांच्या परस्परांच्या नात्यातील, या पात्रांच्या दृष्टिकोणातील आणि मनोवस्थांतील नाट्य साकार केले गेले आहे. या संगीतिकेतील कथन तीन गटांच्या समूहगानाने केले गेले आहे. आनंदी, दुःखी आणि सर्व, अशा तीन तारकासमूहांचे गान यात टाकण्यात आले आहे. या तीन तारकासमूहांपैकी आनंदी तारका अर्जुनाच्या आणि दुःखी तारका कर्णाच्या पक्षाच्या आहेत.आपापल्या गीतरूप कथनातून त्या जशा कथेचा काही तपशील नोंदवतात तसेच त्या आपापल्या पक्षासंबंधींच्या घटनांबद्दलच्या आपल्या भावनिक प्रतिक्रियाही व्यक्त करतात. ग्रीक नाटकातील वृंदासारखेच त्यांचे हे भावनाप्रकटीकरण आहे. यांतील तिसरा, सर्व तारकांचा गट तुलनेने तटस्थ आहे. त्याचे शेवटचे गान सोडल्यास उरलेल्या सर्व गानांत त्यांची भूमिका तटस्थतेची आहे. सर्व तारकांच्या समूहाचे पहिले आणि शेवटचे गान मर्ढेकरांच्या मानवी जीवनाबद्दलच्या जाणिवांचे सूचन करणारे आहे. या प्रकारच्या रचनेत आपल्या अभिव्यक्तिहेतूवरची, आपल्या जाणिवांच्या अभिव्यक्तीवरची पकड मर्ढेकरांनी कुठेही ढिली होऊ दिली नाही. कर्णार्जुनांचे बाण जसे लक्ष्याचे अचूक वेध घेतात तसाच वेध या संगीतिकेत मर्ढेकरांनी आपल्या जाणिवांचा घेतला आहे.

आता आपण या संगीतिकेतील कथानकाचा विचार करू. या कथानकाची सुरवात समूहगानाने होते. सर्व तारकांच्या प्रारंभीच्या गानातून मर्ढेकरांनी या युद्धकथेला अर्थाची एक चौकट मिळवून दिली आहे. तारकांचा हा समूह म्हणतो की, आम्ही निळ्या नभावर चिरंतनाची गाणी सतत घुमवीत अनंतात पांगलो आहोत. चिरंतनाची गाणी सतत घुमवीत असणाऱ्या या तारका आता कर्णार्जुनयुद्धकथाही गात आहेत. यातून कर्णार्जुनयुद्धकथा ही मानवाबद्दलच्या चिरंतन सत्याचे गाणे असल्याचे सुचवले गेले आहे. निरपराध असणारा व दातृत्वासारख्या जीवनपोषक मूल्यांचे प्रतीक असणारा कर्ण आणि अधर्माच्या मार्गाने आणि कृष्णपरमात्म्याच्या साह्याने केलेला त्याचा वध, हे एका परीने मानवाच्या चिरंतन अशा नियतीचे प्रतीक आहे. मानवाला त्याच्या जीवनात कसलाही गुन्हा नसताना अकारण शिक्षा भोगावी लागते. माणसाची इच्छा असो वा नसो, त्याच्या पदरात विशिष्ट प्रकारचे जीवन टाकले जाते आणि ते त्याला भोगायला भाग पाडले जाते. सूर्यपुत्र आणि क्षत्रिय असणाऱ्या कर्णाच्या वाट्याला सुतपुत्राचे जीवन आले. अतुल पराक्रमी असूनही त्याची सतत अवहेलना आणि उपेक्षा होत आली. इंद्रप्रस्थाच्या सम्राटपदावर हक्क असताना त्याला दुर्योधनकृपेने केवळ अंगदेशाचे राज्य प्राप्त होऊन त्याला मांडलिकाचे, आश्रिताचे जीवन जगावे लागले. त्याचा काहीही अपराध नसताना परमेश्वराकडून त्याच्या विनाशाची अधर्मी आणि अनैतिक योजना, भारतीय युद्धाच्या कितीतरी आधीपासून, रचली जाऊ लागली. मानवाबद्दलही याच प्रकारचे घडत असते. माणसाच्या क्षमतेप्रमाणे आणि त्याच्या क्षमतेच्या प्रमाणात त्याच्या जीवनात त्याला काहीही लाभत नाही. धनुर्विद्येवर असामान्य प्रभुत्व असूनही कर्णाला विजय मिळत नाही. धनुर्विद्येवर कर्णाच्या तुल्यबल प्रभुत्व असूनही कर्णसमवेतच्या युद्धात अर्जुनाला स्वतःच्या बळावर निष्कलंक यश मिळत नाही. त्यासाठी त्याला अधर्माची आणि कृष्णसल्ल्याची कास धरावी लागते. युद्ध करण्याच्या, प्रतिकार करण्याच्या आणि प्रतिहल्ला करण्याच्या अवस्थेत नसणाऱ्या कर्णाचा वध त्याच्याकडून आणि तोही कृष्णाच्या मदतीने, होत असल्यामुळे त्याचा विजय त्याच्या युद्धकौशल्याचे फल ठरत नाही. एकापरीने नियतीने दोघांचाही वेगवेगळ्या प्रकारे पराभवच केला आहे.या अर्थाने कर्णार्जुन-युद्धकथा हे मानवी नियतीबद्दलचे चिरंतनाचे गाणे आहे. मर्ढेकरांच्या काव्यातून मानवाच्या नियतीबद्दल हीच जाणीव व्यक्त झाली आहे. या विश्वपटावर विधिघटनांची चित्रे सतत कोणीतरी सरकवत असते, असे या तारका म्हणत आहेत. विधिघटनांची ही चित्रे विश्वासंबंधीची आणि मानवी जीवनासंबंधीची आहेत. ही चित्रे सरकवणारा कोण, चित्रांच्या अशा सरकवण्यातून तो कोणता संकेत देत आहे, हे अनाकलनीय आहे. येथे योजलेली 'चित्रे' ही प्रतिमा अर्थपूर्ण आहे. चित्रातील वस्तूंना चित्रकारामुळे अस्तित्व प्राप्त झालेले असते. स्वतःचा रंगरूप-आकार कसा असावा आणि स्वतःबद्दल काय घडावे, हे ठरवण्याचा अधिकार त्यांना नसतो. चित्र रंगवताना हे सर्व चित्रकारच ठरवत असतो.विश्वनियंता हा चित्रकार असून त्यानेच तो रेखाटीत असणाऱ्या मानवाबद्दल आणि विश्वातील सर्वच वस्तूंबद्दल कसे, केव्हा आणि काय घडावे हे आधीच निश्चित केले आहे. हेही एक चिरंतन सत्य आहे. या प्रतिमेतून मानवाच्या परमेश्वरनियमित नियतीसंबंधीची जाणीव मर्ढेकरांनी व्यंजित केली आहे. हीच जाणीव त्यांच्या कवितेतूनही अभिव्यक्त झाली आहे.

यानंतर अनुक्रमे आनंदी तारकांचे आणि दुःखी तारकांचे गान दिले गेले आहे. आनंदाचे गान हे यशाचे, आकांक्षासाफल्याचे आणि सार्थकतेचे आहे. आनंदी तारकांचा समूह हा अर्जुनाचा पक्षपाती आहे. अर्जुनाच्या यशाबद्दलचा

अनुक्रमणिका

आनंद व्यक्त करणे हे या तारकासमूहाचे कार्य आहे. या युद्धात अर्जुनाने कर्णावर केलेल्या आक्रमणात त्याला यश मिळाले की आणि कर्णाच्या हल्ल्यात तो सहीसलामत वाचला की त्याबद्दलचा आनंद हा तारकासमूह व्यक्त करतो. मर्ढेकरांना मानवी जीवनात सार्थकता, आकांक्षासाफल्य असे जे हवे होते ते आनंदी तारकांच्या गानातून उमटलेले आहे. ज्याच्यावर परमेश्वराची कृपा असते त्याचे जीवन या गानात सांगितलेल्या गोष्टींनी युक्त असते. अर्जुनावर कृष्णकृपा होती म्हणून तो विजयी झाला. त्याचे जीवन सार्थकी लागले. त्याच्या आशाआकांक्षा सफल झाल्या. या उलट कर्णाचा भर स्वत:च्या कर्तृत्वावर होता. त्याने कुठल्याही परमेश्वरकृपेची कधीही वांच्छा धरली नाही. त्याला जी मूल्ये प्रमाण होती त्या मूल्यांप्रमाणे त्याने स्वत:चे निर्णय घेऊन त्याप्रमाणे कृती केल्या. इंद्र जेव्हा ब्राह्मण वेशात त्याला कवचकुंडले मागण्यास येत होता तेव्हा सूर्याने दिलेला सल्ला न मानता आपले दानाचे मूल्य प्रमाण मानून त्याने ती इंद्राला दान केली. त्याच्या स्वयंनिर्भरतेमुळे त्याचा विनाश झाला. मुळात मर्यादित कर्तृत्व असणाऱ्या आणि नियतीपुढे दुबळ्या असणाऱ्या मानवाला परमेश्वरकृपेशिवाय काहीच मिळत नाही. हीच मर्ढेकरांना मानवाची शोकांतिका वाटत होती. वस्तुतः मानव हा कर्तृत्वाने स्वयंपूर्ण असायला हवा, स्वत:चे भवितव्य स्वत:च घडवण्याची क्षमता त्याच्यापाशी असायला हवी, पण दुर्दैवाने तो तसा नाही, मर्ढेकरांची काव्यातील ही जाणीवच येथे साकार झाली आहे.

दु:खी तारकांचा समूह हा कर्णाच्या बाजूचा आहे. कर्णाच्या अपयशाचे,त्याच्या दुर्दैवाचे दु:ख या तारकासमूहाच्या गानांतून प्रकट केले गेले आहे. मर्ढेकरांच्या परमेश्वरविषयक जाणिवा लक्षात घेण्याच्या दृष्टीने हे गानही महत्त्वाचे आहे. जिच्या धुंदीला दयामाया नाही अशी समर्थ शक्ती भोळ्या जगाला फिरवीत, भ्रमवीत आहे, असे या गानात म्हटले गेले आहे. ही शक्ती म्हणजेच परमेश्वर आणि भोळे जग म्हणजे मानवाचे जग होय. या जगाला परमेश्वराचे हे कठोर रूप कळत नासल्यामुळे आणि परमेश्वर दयाळू असण्यावर त्याची श्रद्धा असल्यामुळे ते 'भोळे' आहे. कर्णही या जगाचा एक घटक आहे. या युद्धात कृष्णरूपी परमेश्वरशक्तीने त्याच्यावर दयामाया न दाखवता त्याला फिरवले-भ्रमविले आहे. परमेश्वराकडून भोळ्या मानवास भ्रमविले जाण्याचे दृश्य हे कारुण्याचे, कष्टवैकल्याचे, नीतिचांचल्याचे, नैराश्याचे, दौर्बल्याचे, अपेशी दुर्दैवाचे आहे. त्यामुळे आमच्या गानातून काहूर, आर्त बेसूर असे, तेजोभंगातून उमटलेले पडसादच ऐकू येत आहेत. मर्ढेकरांची परमेश्वरविषयक कल्पना आणि भोळ्या जगताचे दु:खपूर्ण वास्तव येथे अधोरेखित झाले आहे. त्यांच्या कवितेतही हेच उमटले आहे.प्रारंभीच्या या तिन्ही प्रकारच्या गानातून मर्ढेकरांनी कर्णवधकथेला अर्थ मिळवून देणारी जाणिवांची चौकट उभी केली आहे. या चौकटीच्या संदर्भातच ही कर्णवधकथा वाचकाने स्वीकारायची आहे.

अशाप्रकारे कर्णकथेला अर्थ मिळवून देणाऱ्या जाणिवांची एक चौकट निश्चित केल्यानंतर सर्व तारकांच्या समूहगानाने या कथेला प्रारंभ होतो. सर्व तारकांचा समूह म्हणतो ब्रह्मांडाचा चलच्चित्रपट बघताना पृथ्वीच्या कुरुक्षेत्रावर आमची नजर भारली गेली आहे; धीरोद्धत कौरवसेनाग्रणी अग्ररथावर जयविश्वासाने विराजत असून त्याच्या मुखावर पसरलेली संगरलाली त्याचे बाहुबलच व्यक्त करत आहे; सूर्यपुत्र असलेल्या या पहिल्या पांडवाचा सारथी शल्य आहे; त्याच्या रथावर गजकक्षांकित ध्वज फडकत आहे आणि या रथाचे अश्व उधळलेले आहेत. प्रारंभीचे हे कथन महत्त्वाचे असून त्यातून या संगीतिकेला एक दिशा आणि स्वर दिला गेला आहे. कर्णाचा प्रारंभीचा 'जयविश्वास' शेवटी पराजयाच्या शोकभावनेत विलीन होणार आहे. या गीतातील 'जयविश्वास' हा शब्द अर्थपूर्ण असून तो शेवटच्या पराजयाच्या घटनेशी विरोधी नात्याने बांधला गेला आहे. आपले युद्धविद्येवर एवढे प्रभुत्व आहे की भीष्म-द्रोणाला साध्य न झालेला जय आपल्याला आपल्या बाहुबलावरच मिळणार, या त्याच्या विश्वासाचे हे चित्र आहे. कर्णाचा हा विश्वास मानवाच्या स्वकर्तृत्वावरील विश्वासाचे प्रतीक आहे. कर्णाचे बाहुबल व्यक्त करणारी त्याच्या मुखावरची संगरलाली, शल्यासारखा कृष्णतुल्य निपुण सारथी, असे सर्व जयदायक असतानाही त्याचा पराजय झाला आहे. कर्णाच्या शोकांतिकेला अर्थपूर्ण बनवणारा विरोध या गीतातून सुचवला गेला आहे.

या समूहगानानंतर कर्णाला उद्देशून शल्याचे भाषण दिले गेले आहे. हे भाषण कर्णाचा तेजोभंग करणारे, त्याचा आत्मविश्वास भंग करणारे आहे. या भाषणामुळे सर्व तारकांच्या समूहगानातून प्रकटणाऱ्या 'जयविश्वासा'शी विरोधन्यास साधला गेला आहे. शल्याच्या या भाषणाचा भर जसा अर्जुनाच्या अतुलनीय पराक्रमावर आहे तसाच तो त्याच्यावर असलेल्या परमेश्वरकृपेवरही आहे. ज्याच्या पराक्रमापुढे भीष्म-द्रोण हरले आणि ज्याला परमेश्वरकृपेने सदैव जयश्रीच प्राप्त होणार, त्या पार्थासमोर तू कशाला जातोस, असा प्रश्न शल्य करत आहे. ज्याला देवेंद्राचे रक्षण लाभलेले आहे, शंकर ज्याचा मित्र आहे आणि आता येथे प्रत्यक्ष कृष्णच ज्याच्या समवेत आहे त्या अर्जुनालाच जयश्री लाभणार आहे. हे भाग्य इतर कोणालाही लाभणे शक्य नाही. असे कर्णाचा तेजोभंग करणारे

भाषण शल्य करतो. परमेश्वरी कृपा आणि व्यक्तीचे स्वत:चे कर्तृत्व असा संघर्ष मर्ढेकरांना चित्रित करायचा असल्यामुळे शल्याच्या या भाषणात अर्जुनावर परमेश्वरी कृपा असण्यावर भर दिला गेला आहे. कर्णही परमेश्वरकृपेचा मुद्दा केंद्रस्थानी ठेऊन शल्याला उत्तर देतो. त्यात तो आपल्याला मनोभंग ठाऊकच नसल्याचे अभिमानाने सांगतो आणि आपला विश्वास देवदेवांवर नसून तो स्वत:च्या बाहूंवर आणि कर्तव्याच्या जाणिवेवर असून आपल्याला संहारण्यासाठी सर्व देव जरी आले तरी चालतील! हेही तो ठामपणे सांगतो. येथे आत्मनिर्भरता विरुद्ध देवशरणता असा संघर्ष असल्याचे आणि त्यात आत्मनिर्भरतेचा पराजय होणार असल्याची शोकात्म जाणीव सूचित केली आहे. माणूस आपल्या बाहुबलावर विश्वासून आणि परमेश्वराचे साह्य नाकारून कर्तृत्व गाजवू पहातो. परंतु केवळ बाहुबलाच्या साह्याने माणूस कुठलेही कार्य यशस्वीपणे करू शकत नाही, त्यासाठी त्याला परमेश्वरी कृपेची जोड असावी लागते. मानवाची ही परतंत्रतेची स्थिती दुर्दैवी आणि शोकपूर्ण आहे. मर्ढेकरांची ही जाणीव या संगीतिकेत व्यक्त झाली आहे. ही जाणीव त्यांच्या काव्यातील एक प्रधान जाणीव आहे. म्हणूनच त्यांनी एका कवितेत परमेश्वराला उद्देशून 'हासडल्या तुज शिव्या तरीहि। तुझ्याच आलो पायी लोळत ' असे म्हटले आहे.

यानंतर पुन्हा कर्णाची मानखंडना करणारे भाषण शल्य करतो. महाभारतात विस्ताराने आलेल्या 'हंसकाकाख्याना'चा केवळ संक्षिप्त निर्देश शल्याच्या या भाषणात केला गेला आहे. अर्जुन हंस असून तू बगळाही नाहीस तर केवळ कावळा आहेस; त्याच्याशी तुझी सागर ओलांडण्याची स्पर्धा जर घडवून आणली तर तुझ्यात शक्ती आणि त्राणही रहाणार नाही; त्यात तुझे प्राणच जातील. शल्य जरी असे म्हणत असला तरी ही स्पर्धा केवळ अर्जुन आणि कर्ण या दोघांत नव्हती. ती अर्जुन आणि देव (त्याबरोबरच अप्रत्यक्षपणे शल्य) एका बाजूला आणि एकटा कर्ण दुसऱ्या बाजूला, अशी विषम स्वरूपाची होती. या सुतपुत्राला दैवामुळे सुतकुळात रहावे लागत असले तरी त्याच्या कृती त्याच्या पौरुष्यातून जन्मतात आणि त्याची कीर्ती स्वायत्त असते; ती इतर कोणावरही अवलंबून असत नाही; मी कधीही माझ्या लोकांशी द्रोह केला नाही आणि ज्याला मी मित्र मानले त्याच्या सहाय्यासाठी विश्वाशी झुंज घेण्यासही मी मागेपुढे पाहिले नाही; असे स्वाभिमानयुक्त उत्तर कर्ण शल्याला देतो. यानंतर,कौरवपांडवांत सुरू झालेल्या युद्धाच्या भीषणत्वाचे सर्व तारकांचे कथन येते. महत्त्वाचे म्हणजे कर्णार्जुनाचे हे युद्ध पहाण्यासाठी देवदानवांनी, यक्षकिन्नरांनी, गंधर्वांनी, अप्सरांनी आणि मुनींनी अंतरिक्ष कसे भरून गेले आणि अर्जुनाच्या विजयाबद्दल शंकित झालेल्या सर्व देवांना ब्रह्मदेवाने 'विजयश्रीची माळ अर्जुना!' असे बोलून कसे आश्वासिले याचा निर्देश या कथनात येतो. हा उल्लेख महाभारतात जरी असला तरी येथे तो हा संघर्ष केवळ कर्णार्जुनात नसून एकीकडे केवळ आपल्या बाहुबलावर एकटा लढणारा कर्ण आणि त्याच्या विरोधात कृष्णाच्या साह्याने व सर्व देवांच्या पाठिंब्याच्या आधाराने लढणारा अर्जुन,असा असल्याचे सूचित करण्यासाठी आलेला आहे. ब्रह्मदेवाच्या या भविष्यकथनानंतर दुःखी तारकांचे गान येते. ही भविष्यवाणी ब्रह्मदेवाचीच असल्यामुळे ती खरी होणार याबद्दल कर्णाच्या पक्षपाती असणाऱ्या तारकांना शंका नाही. या अटळ भवितव्याने त्या दुःखित झाल्या आहेत. विजय जरी अर्जुनाचा होणार असला तरी 'परि दूर, अजुनिही दूर, विजय तो दूर' या उद्गारातून होऊ घातलेल्या अर्जुनविजयाला मान्यता देऊन त्या कर्णाच्या पराक्रमाबद्दल बोलत आहेत. अर्जुनविजय नजिक येईपर्यंत कर्णाने या युद्धात केलला 'कहर' त्या वर्णित आहेत. इंद्राने अर्जुनाला दिलेले आणि हमखास मृत्यू घडवून आणणारे ऐंद्रास्त्र जेव्हा अर्जुन कर्णावर सोडतो तेव्हा ते हुकुमी ऐंद्रास्त्र कर्ण छिन्नविच्छिन्न करून टाकतो. कर्णाचे हे अभूतपूर्व युद्धकौशल्य पाहून हतबल झालेला अर्जुन खिन्न होऊन बसतो. तेव्हा त्याला उत्तेजन देणारे भाषण कृष्ण करत असल्याचे कथन या गानात करण्यात येते. कृष्णाच्या या भाषणात कर्णाच्या पराक्रमाची स्तुती केली गेली असून 'सव्यसाचिन्, लोपली का अस्त्रविद्या या पळा। बाणसंधानचातुर्या काय तुझ्या ही कळा!' या भाषेत कृष्ण अर्जुनाची निंदा करत आहे आणि औदासिन्य सोडून कर्णाला यमसदनाला पाठव, असे उत्तेजनही देत आहे. कृष्णासारख्या परमेश्वरालाही कर्णाचे श्रेष्ठ धनुर्धरत्व मान्य होते हे सूचित करून जर हे युद्ध न्याय्य पद्धतीने लढले गेले असते तर अर्जुनाला कर्णाचा पराभव करता आला नसता, हे यातून सूचित केले गेले आहे. कर्णवध हा परमात्म्याने-कृष्णाने-अन्याय्य पद्धतीने घडवून आणला, हे येथे मर्ढेकरांना प्रस्थापित करायचे आहे. यावर हताश झालेला अर्जुन म्हणतो : त्वेषाने, क्रोधाने जरी माझे हृदय भरलेले असले आणि युद्ध करण्यासाठी जरी माझे बाहू स्फुरत असले तरी माझी मती कुंठित झालेली आहे.अतिशय कराल, अमोघ अशी अस्त्रे जरी मी कर्णावर सोडत असलो तरी कर्ण ते सर्व फोडून टाकत आहे. हमखास विजय मिळवून देणारे ऐंद्रास्त्र कर्णाने छिन्नविच्छिन्न केल्यामुळे अर्जुन स्तंभित होऊन हे बोलत आहे. कृष्णार्जुनांच्या या संवादातून कर्णाचे युद्धश्रेष्ठत्व मर्ढेकरांनी प्रस्थापित केले आहे. ते करणे त्यांना आवश्यक वाटते कारण त्याशिवाय अर्जुनाने हे युद्ध परमेश्वराच्या साह्याने अन्याय्य पद्धतीने जिंकले हे

अपरिहार्यपणे प्रस्थापित होणार नाही.

आता अर्जुनाचा लयाला गेलेला आत्मविश्वास पुन्हा जिवंत केला पाहिजे असे कृष्णाला वाटते. म्हणून तो अर्जुनाला त्याच्या पूर्वपराक्रमांची आठवण करून देतो. तो म्हणतो बाहुयुद्धात तू किरातरूपी महादेवास तुष्ट केले आहेस, कौरवांनी द्रौपदीला क्लेश दिले,ते तुम्हांला षंढ म्हणाले,अशा दुष्टबुद्धी कौरवांची आताच तू उपेक्षा का करतो आहेस? तुझ्या या संमोहजालामुळे कौरवसेना भीषण युद्ध करू लागली असून पांडवसेना मात्र विस्मित आणि पीडित झाली आहे.ज्याने स्वप्रतापे अग्नीला खांडववन दिले त्याला कर्णशासनाबद्दल संदेह वाटण्याचे काय कारण आहे? तेव्हा तू स्वप्रभाव आठव आणि कर्णनाशाने तुझ्या दिव्य यशाची सांगाता कर! कृष्णाच्या या उत्साहवर्धक भाषणानंतर त्याच्यावरील कृष्णाच्या अलोट कृपेचा निर्देश करून त्यामुळेच आपल्या बाहूत युयुत्सू सामर्थ्य असल्याचे तो म्हणतो. आता आपला व्यामोह संपला, असे म्हणून उत्साहाने आपण कर्णावर ब्रह्मास्त्र सोडून त्याच्या मस्तकाची शकले दहा दिशांना उडवीत असल्याचे सांगतो. ब्रह्मास्त्र सोडल्यावर कौरवसेनेचा प्रचंड नाश झाल्याचे आणि कर्ण जरी रक्ताने माखून निघाला असला तरीही 'धीरधी' कर्ण जराही चळला नसल्याचे सर्व तारकांचा समूह आपल्या कथनात सांगतो. ज्याची त्याने नित्य पूजा केलेली असते असा चंदनचूर्णात माखलेला एक बाकदार शर आपल्या सुवर्ण भात्यातून काढून कर्ण तो अर्जुनाच्या ब्रह्मास्त्राला प्रत्युत्तर देण्यासाठी प्रत्यंचेलां लावतो. हे पाहिल्यावर उल्कापात होऊ लागतो; देवही भयाकुल होतात. अशा वेळी शल्य कर्णाला सावध करण्यासाठी म्हणतो : तू सोडत असलेला बाण सर्पमुखी नसून तो दारुण, उग्र, तीक्ष्ण आणि विषारी आहे. असे असले तरी पार्थाचे मस्तक उडवण्यास तो समर्थ असल्याबद्दल मी साशंक आहे.तू अकारण देवांना इरेला पाडू नकोस; अपेशी होशील.निदान पुन्हा योग्य,अचूक नेम घेऊन संधानविवेक तरी कर! या बाणाचा ट नेम धरला आहेस तो तू बदलून नव्याने नेम धरावास, असा सल्ला शल्य देत आहे. याचे कारण कर्णाने अर्जुनाच्या कंठाचा अचूक नेम धरल्याचे आणि त्याने धरलेला नेम जर कायम राहिला तर अर्जुनाचा मृत्यू अटळ असल्याचे त्याच्या लक्षात आलेले असते.अर्जुनाचा मामा असलेल्या शल्यास त्याचा प्राण वाचवायचा असल्यामुळे तो कर्णाला शरसंधान बदलण्याचा सल्ला देत आहे. शल्याच्या या भाषणातून कर्णाचे युद्धातील एकटेपण आणि विनासाह्यत्व अधोरेखित केले गेले आहे. शल्याच्या या सूचनेचा अव्हेर करून कर्ण म्हणतो की, एकदा केलेले संधान बदलून नव्याने पुन्हा संधान करणे हे जरी योद्ध्याच्या धर्मात बसत असले तरी हा कर्ण हा धर्म पाळत नाही. त्याने एकदा केलेले संधान कायम असते. कर्णाच्या या बाणात अश्वसेन नाग दडून बसलेला असतो. खांडववन जाळले जाताना आगीत त्याची आई जळून मेलेली असते. परंतु तो मात्र अग्नीतृ। जिवंत बाहेर पडण्यात यशस्वी होतो. तेव्हापासून अर्जुनावर सूड घेण्यासाठी तो टपलेला असतो. या युद्धात बाणाबरोबर अर्जुनाच्या निकट जाऊन त्याला दंश करण्याचा त्याचा मानस असतो. परंतु त्यात त्याला यश येत नाही. तो दिसल्यावर अर्जुन त्याला ठार करतो. महाभारतातील कर्णपर्वात अश्वसेन नागाची ही कथा सांगितली गेली आहे. मर्ढेकरांनी आपल्या संक्षेपात ती काढून त्याऐवजी शल्याच्या भाषणात 'हा नागमुखी बाण नसे, नाग असे हा' एवढाच उल्लेख केला आहे. 'हा केवळ बाण नसून तो नाग आहे' हे सांगून शल्य म्हणतो की, 'जसा काल असेल तसे वर्तन करणे इष्ट असते. तेव्हा तू असा नेम धर की जो व्यर्थ जाणार नाही.' तुला स्वत:ला अर्जुनवध करणे जमणारच नाही: आता आयता हा नाग या बाणात आहे, तरी नीट संधान करून तू हा बाण सोड; म्हणजे हा नाग अर्जुनाचा मृत्यू घडवून आणील. असे शल्य सुचवत आहे. या बाणाने जर अर्जुनाला मृत्यू आला तर तो तू दिलेला मृत्यू नसेल, त्याचे श्रेय नागाकडे जाईल, म्हणून तू हा बाण सोडू नकोस; हे शल्य आपल्या या बोलण्यातून सुचवत आहे.

यावर कर्ण अभिमानयुक्त भाषण करत आहे. तो म्हणतो : युद्धात माझी भिस्त दुसऱ्यावर नाही. हा बाण असो की नाग असो, मला त्याची पर्वा नाही. हजारो पार्थ जरी आले तरी त्यांच्या वधासाठी दुसऱ्याच्या बळाची आशा नाही: बघ हा बाण सुटला आता पुन्हा संधान होणार नाही. आपल्या या भाषणात कर्ण कृष्णसाह्य घेणाऱ्या अर्जुनाचा उपहास करत असून आपल्या वैयक्तिक कर्तृत्वाबद्दल अभिमान प्रकट करत आहे.

येथे मर्ढेकरांनी आनंदी तारकांचे गान टाकले आहे. कारण कृष्णसाह्यामुळे या बाणाने अर्जुनाचा वध होत नाही. कृष्णाने या बाणाचे स्वरूप ओळखलेले असते. हा बाण अर्जुनानजिक येताच कृष्ण आपल्या पायाने रथ खालच्या बाजूस दाबतो. त्यामुळे हा बाण अर्जुनाच्या कंठात शिरण्याऐवजी तो अर्जुनाच्या मुकुटाला लागतो आणि त्याचा मुकुट खाली पडतो. अर्जुनाला कृष्णामुळे हे जीवदान मिळाले आहे. परंतु अर्जुनाचे प्राण वाचवले जाण्यात अर्जुनाचे काहीही कर्तृत्व नसताना तो वाचला म्हणून आकाशातून देवांनी त्याच्यावरच फुलांची वृष्टी केली आहे. देवांच्या अन्याय्य पक्षपातीपणाचे सूचन येथे करण्यात आले आहे.

यानंतर, कर्णाच्या सर्पमुखी बाणाचा फासा उलटा पडला आणि काळही उलटून 'कर्णा तुझी अंतिम घटिका भरलेली असून तुझ्या रथाचे चाक जमिनीत चालले आहे' असे बोलला; हे कथन सर्व तारकांच्या समूहगानातून केले गेले आहे. मूळ महाभारतात अर्जुनकिरिटपाताच्या प्रसंगानंतरही कर्णार्जुनाचे दीर्घकाळ युद्ध चालले असल्याचे म्हटले आहे. महाभारतात येथेच अश्वसेन नागाच्या वधाची सविस्तर कथा दिली गेली आहे.अर्जुनाचा मुकुट खाली पडल्यावर अश्वसेन नाग कर्णाजवळ जाऊन तू पुन्हा मला बाणातून अर्जुनावर सोड म्हणजे मी तुझा व माझा शत्रू असलेल्या अर्जुनाचा अंत घडवून आणीन; असे म्हणतो. यावर 'कर्ण दुसऱ्याच्या बलावर भिस्त ठेवून जयाची आशा करत नाही' असे उत्तर कर्ण अश्वसेनास देतो. यानंतर अश्वसेन नाग विक्राळ रूप धारण करून अर्जुनावर चाल करून जातो.अर्जुन त्याचा वध करतो. हा सर्व कथाभाग मर्ढेकरांनी वगळलेला आहे.मर्ढेकरांनी या संगीतिकेच्या लेखनात सादरीकरणासाठीचे आकाशवाणीचे कालबंधन पाळले नसते तर त्यांनी हा प्रसंग आपल्या संगीतिकेत घातला असता. कर्णाच्या व्यक्तिमत्त्वाचे जे दर्शन मर्ढेकरांना घडवायचे आहे ते या प्रसंगातून अचूकपणे प्रकट होते. अर्जुन कृष्णबलावर युद्ध लढतो आहे आणि कर्ण मात्र स्वबलावर ते लढतो आहे; हे कर्णश्रेष्ठत्व मर्ढेकरांना या संगितिकेत अधोरेखित करायचे आहे.त्या दृष्टीने हा प्रसंग अतिशय अनुकूल होता. पण मर्ढेकरांना तो वगळावा लागला आहे.अश्वसेनवध झाल्यानंतर कर्ण परशुरामदत्त भार्गवास्त्राचा प्रयोग अर्जुनावर करण्याचे ठरवताच कर्णाच्या अंतसमय जवळ आला म्हणून प्रत्यक्ष काळ अदृश्यरूपाने कर्णाजवळ येऊन 'बघ! तुझ्या रथाचे चाक पृथ्वी गिळत आहे' असे म्हणतो; हे ऐकताच कर्णाला भार्गवास्त्र आठवेनासे होते. महाभारतातील या भागाचा मर्ढेकरांनी संक्षेप केला आहे आणि कर्णाने सोडलेल्या सर्पमुखी बाणामुळे अर्जुनाचा मुकुट जमिनीवर पडल्यावर त्याच्यावर उलटलेला काळ 'तुझी शेवटची वेळ आली असून तुझ्या रथाचे चाक पृथ्वीत चालले आहे.'असे बोलतो, एवढाच संक्षिप्त तपशील मर्ढेकरांनी 'सर्व तारकांच्या समूहगाना'तून दिला आहे. कर्णरथाचे चाक पृथ्वीच्या पोटात जाऊ लागताच कर्णाच्या मतिभ्रष्ट झालेल्या मनोवस्थेचे आणि त्याला झालेल्या भार्गवास्त्रविस्मृतीचे वर्णन 'दुःखी तारकांच्या समूहगाना'तून केले गेले आहे. पृथ्वीने रथचक्र गिळताच कर्ण (शल्याची मदत न घेताच) स्वतःच्या बाहुबलाने ते वर उचलू लागला. या वेळी तो निःशस्त्र होता. तो अर्जुनाला म्हणाला : मी रथाचे चाक वर काढीपर्यंत युद्ध थांबव. तू धर्मवीर आहेस आणि धर्मयुद्ध करूनच जगावे आणि मरावे, हे तू जाणतोस; शत्रू संकटात असताना त्याचा वध करणे हे वीरधर्मास योग्य नव्हे! मला तुझी किंवा कृष्णाची भीती वाटत नाही; चाक वर येताच तुझी रणेच्छा पूर्ण करण्याचे सामर्थ्य माझ्यामध्ये आहे.

या प्रसंगावर 'कर्ण धीराने थांबला आणि सूर्यही अगतिक झाला' असे भाष्य सर्व तारकांचा समूह करतो. येथे मर्ढेकरांनी सूर्याच्या अगतिक होण्याचा केलेला उल्लेख अर्थपूर्ण आहे. कर्ण इतरांचा सल्ला घेऊन निर्णय करत नाही आणि इतरांनी केलेली मदतही नाकारतो, हे सूर्यालाही माहीत आहे. आपला पुत्र मरणाला सामोरा जात असताना आपण त्याला वाचवण्यासाठी काहीही करू शकत नाही, असे अगतिक झालेल्या सूर्याला वाटते; हे यातून सूचित करून कर्णाची स्वयंनिर्भरता येथे प्रस्थापित केली गेली आहे.यावेळी कर्णाला उद्देशून कृष्ण उपहासाच्या स्वरात बोलतो : कर्णाला रणात धर्म आठवावा ना! त्यासाठी बुद्धिसामर्थ्य पणाला लावावे हे आश्चर्यच! आता धर्माचे पांग फेडण्याचा चंग अधर्माने बांधावा आणि विस्मृतीने स्मृतीला स्मरावे काय! आता धर्मयुद्धाचा श्रेष्ठ आदर्श व्हावा ना! आता पुण्यकीर्तीला स्मरून कीर्तीच्या पारण्यात पाप फेडले जावे ना! एकवस्त्रा असलेल्या द्रौपदीला जेव्हा सभेत आणले गेले तेव्हा धर्माची खाण असणारी कर्णाची वाणी गर्जली होती काय? अभिमन्यूला जेव्हा कौरवांनी ठार केले तेव्हा या सुतपुत्राला धर्माचा वायदा का स्मरला नाही? तुझ्यावर वेळ आली आणि डोळ्यांसमोर काजवे चमकू लागले की अंगराजाला आता धर्म आठवतो आहे! पांडवांना कौरवांमार्फत ज्याने देशोधडी लावू दिले त्याला एरव्ही वावडी असणारी सौजन्यभाषा आता कशी काय शोभते! शठाला जसा शाठ्य तसा कर्णाला आता अर्जुन! आज कोणी कोणाला आणि कसा दोष द्यायचा? कृष्णाचे हे भाषण ऐकून कर्ण म्हणतो : कृष्णा तुझ्या बोलण्यातला भाव समजला. या प्रसंगी तुझी जशी इच्छा असेल तसेच व्हावे! अर्जुना! तुझे बाण येऊ दे! मीही रथावर आणि रथावीण तुझ्याशी झुंज घेईन! कर्णाच्या या बोलण्यानंतर सर्व तारका कथन करतात-कर्णाने एक नवा बाण अर्जुनावर सोडला; त्यामुळे अर्जुन थरथर कापला; त्याच्या हातातील गांडिव धनुष्य गळून पडले; पण लगेच सावध होऊन त्याने कर्णाच्या रथाचा ध्वज तोडून टाकला. त्यानंतर त्याने प्रार्थना करून एक आंजलिक बाण आपल्या धनुष्याला जोडला आणि तो गांडिव धनुष्यास उद्देशून म्हणाला या महान अस्त्रास मंत्रून आणि देवास आणि गुरूस वंदन करून मी हा शर प्रत्यंचेस लावतो आहे; आता कर्णाच्या प्राणाचे हरण केले जावे! त्या अस्त्राने कर्णाचे मस्तक तुटून जमिनीवर पडले.कर्णाचे शिर तुटल्यावर आनंदी तारका आपल्या समूहगानातून कर्णपतनाबद्दलचा आनंद व्यक्त करू लागतात.

अनुक्रमणिका

त्या म्हणतात : कणदिह खाली पडला, कुंतिपुत्र यशशाली झाला आणि ब्रह्मांडात जयजयनादाचा शब्द भरून गेला; स्वर्गधरा आनंदाच्या जयघोषाने दुमदुमून गेली! परंतु दुःखी तारकांना कर्णवधाचे दुःख होते. त्या म्हणतात : आमच्या कानांना कसलीही भूल पडली नाही; ढगाची तरल सावली जशी मुखरित व्हावी तशी आम्हाला वाऱ्यावर कुंतिमातेची व्याकुळ चाहूल लागली आहे. नंतर कुंतिमातेचे व्याकुळ असे गीत प्रकट होते. तू आज अचानक सोडून जाताना ही माता विव्हल झाली आहे. अश्रूंनाही आज लाज राहिली नाही. ते उघडपणे वहात आहेत. माझे प्रेमही आता मूक राहिले नाही. कर्णा! तुझ्या आईला अतिशय शोक झाला आहे.

यानंतर सर्व तारकांच्या गानाने ही संगीतिका समाप्त होते. हे शेवटचे गान या कर्णकथेला शोकात्म अर्थ देत असल्यामुळे त्याला या संगीतिकेत महत्त्व आहे. अर्जुनविजयाने आनंदी तारकांना जरी आनंद झाला असला तरी सर्व तारकांना मात्र दुःख झाले आहे. कर्णार्जुनयुद्ध चालू असता आनंदी आणि दुःखी तारका अनुक्रमे अर्जुनाची आणि कर्णाची बाजू घेऊन आपल्या भावनिक प्रतिक्रिया व्यक्त करत होत्या आणि सर्व तारकांचा समूह जे घडत होते त्याचे तटस्थपणे कथन करत होता. कर्णवध झाल्यावर मात्र सर्व तारकांच्या समूहाने कर्णाच्या बाजूने आपल्या भावनिक प्रतिक्रिया दिल्या आहेत. युद्ध चालू असताना धर्मयुद्धाची भाषा करणारा कर्ण किती अधर्मी आहे याची यादी कृष्णाने वाचली. पांडवांनी आणि पांडवांना मदत करणाऱ्यांनी आतापर्यंत किती अधर्मी वर्तन केले, याची नोंद हे युद्ध संपल्यावर सर्व तारकांचा समूह करत आहे. सर्व तारकांचा समूह म्हणतो : कर्णाने केलेली कपटीपणाची, दुष्कृत्याची पेरणी देवाने आठवून ती कृष्णमुखाने समरांगणात कथन केली पण अर्जुनाला साथ देणाऱ्यांनी केलेली अशीच कृत्ये मात्र देवाला आठवली नाहीत! कर्णाच्या मांडीवर परशुराम झोपला असताना अर्जुनपिता इंद्राने कीटकरूप घेऊन कर्णाची मांडी फोडली आणि कर्णाला त्याच्या मृत्यूकडे नेणारा परशुरामाचा शाप मिळाला; याचे स्मरण देवाला झाले का? युद्धात होणाऱ्या मृत्यूपासून अभय देणारी कर्णाची कवचकुंडले ब्राह्मणवेषात येऊन इंद्राने दानशूर कर्णाकडून दान म्हणून मिळवली आणि कर्णाने ती देऊन आपला मृत्यू निश्चित करून घेतला; मुळात स्त्री असलेल्या शिखंडीला समोर उभे करून आणि त्याच्या आडून बाण मारून अर्जुनाने अजेय असलेल्या भीष्माचा वध केला, ही गोष्ट देवाची पवित्र वाणी सोयिस्करपणे विसरली! कर्ण आणि अर्जुन हे दोघेही अधर्मी वर्तन करण्यात जर सारखेच दोषी असतील तर अधर्मी वर्तनाची शिक्षा केवळ कर्णालाच का? असा प्रश्न सर्व तारकांच्या समूहाच्या या युक्तिवादातून व्यंजित केला गेला आहे.

मर्ढेकरांना कर्णाची ही शोकान्तिका केवळ कर्णाचीच नव्हे तर हताशता पदरी पडणाऱ्या सर्वच 'गुणी' माणसांची वाटते. सर्व तारकांचा समूह म्हणतो : हे कर्णपर्व समाप्त झाले आणि आमची पापणी भिजली; आता केविलवाणी रिती भावना या अफाट गगनांत उदासवाणी होऊन एकलीच भिरभिरते; जेव्हा ती हताश झालेला गुणी माणूस बघते तेव्हा ती गहिवरते आणि वेडेपणाने हसून ही कर्णकहाणी सांगते. या जगतात गुणी माणसाची नियती कर्णासारखीच असते. आत्मविश्वासाने भारलेल्या आणि स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास असलेल्या गुणी माणसाच्या कृतीला कर्णासारखेच फळ मिळत असते. स्वकर्तृत्वावर विश्वास असल्यामुळे त्याने देवसाह्याची अपेक्षाच केलेली नसते. या विश्वात मानव कितीही कर्तृत्ववान असला तरी अंतिमतः तो दुबळाच असतो. त्याची कृती कितीही शिव असली तरी देवसाह्याशिवाय ती सफल होतच नाही. हवे असलेले स्वबळावर मिळवण्याची ईर्ष्या मानवाच्या ठिकाणी असते. परंतु तो परमेश्वरी कृपेशिवाय स्वबलावर काहीही मिळवू शकत नाही; त्याच्यावर होणारी परमेश्वरी कृपा न्याय्य असेलच असे नाही; हीच मानवाची मूलभूत शोकात्मिका आहे. हीच जाणीव मर्ढेकरांच्या कवितेचाही अंतःस्वर आहे. तारकांचा समूह 'चिरंतनाची गाणी' गाणारा आहे. याचा अर्थ त्यांनी गायलेले स्वबलावर विश्वास असणाऱ्या कर्णाच्या अपयशाचे गाणे हे चिरंतन गाणे आहे; ते एकूण मानवाच्या सनातन नियतीचे गाणे आहे, हे मर्ढेकर येथे सुचवत आहेत. कर्ण हा मर्ढेकरांच्या मानवविषयक आणि आध्यात्मिक जाणिवांचे प्रतीक आहे. मानवाची बुद्धी, त्याच्या कार्यक्षमता यांना नैसर्गिक मर्यादा असल्यामुळे तो आपल्या प्रेरणा सफल करण्यात अपयशी होतो. परंतु मानवाला आपल्या बौद्धिक आणि शारीरिक कर्तृत्वावर भरवसाही असतो. कोणाचेही साह्य न घेता आपण आपल्या बळावर जीवनसाफल्य मिळवू शकू, असा विश्वास त्याला वाटत असतो. आपला पिता असलेल्या सूर्यदेवाचा सल्लाही न ऐकता स्वस्वीकृत मूल्यांप्रमाणे वागणारा कर्ण अशा मानवाचे प्रतीक आहे. परंतु मानवाचे दुर्दैव असे की त्याच्या प्रेरणांना सफल किंवा निष्फल करण्याचा अंतिम निर्णय त्याच्या बाहेरच्या अज्ञात शक्तींच्या हाती असतो. या शक्तींवर परमेश्वराचे नियंत्रण असते. म्हणून जर मानवावर परमेश्वरकृपा झाली तरच त्याच्या प्रेरणा, आशाआकांक्षा सफल होऊ शकतात. अनेकदा अधर्मी वर्तन करूनही केवळ परमेश्वरी कृपा लाभल्यामुळे यश मिळवणाऱ्या मानवाचे अर्जुन हा प्रतीक आहे. परमेश्वरी कृपा ही नैतिकतेशी, धर्ममान्य कृतीशी

अनुक्रमणिका

निगडित आहे, असे ठामपणे म्हणता येत नाही, मानव परमेश्वराला शिवस्वरूप,करुणामय मानतो. परंतु सर्व नैतिकता झुगारून परमेश्वराने अर्जुनाला साह्य केले आहे. तसेच अनेकदा तो माणसाशी, त्याचा काहीही अपराध नसताना निर्दयपणे, अन्यायानेही वागत असतो. तो आयुष्यभर कर्णाशी अशाच प्रकारे वागत आला. मानवाला परमेश्वराकडून लाभलेल्या शक्तींच्या मर्यादांची आणि मानवाची नियती घडवणाऱ्या परमेश्वराच्या अन्याय्य, निर्दय रूपाची होणारी जाणीव वेदनादायक असते. ही वेदनादायक जाणीव मर्ढेकरांनी आपल्या वाङ्मयातून-विशेषतः कवितेतून- साकार केली आहे. कर्णकथा मर्ढेकरांच्या या जाणीवेचे परिपूर्ण उदाहरण आहे. मर्ढेकरांना मानवी जीवनाबद्दल हे जे काही व्यक्त करायचे होते त्यासाठी कर्णाची जन्मापासूनची कथा सांगितली जाणे योग्य ठरले असते. म्हणूनच त्यांची ही संगीतिका वाचल्यावर कर्णकथेवर मर्ढेकरांनी दीर्घकाव्य अथवा विस्तृत नाट्यकाव्य का लिहिले नाही,असा प्रश्न पडतो. आकाशवाणीसाठी ती संगीतिकेच्या रूपात लिहिली गेली असल्यामुळे मर्यादित वेळेत तिचे सादरीकरण केले जाणे भाग होते. त्यामुळे त्यांनी कर्णार्जुनयुद्धाचा भाग निवडून आणि त्याचाही संक्षेप करून ही संगीतिका विशिष्ट कालमर्यादित सादर होईलअशा पद्धतीने लिहिली. तिच्या वाचनात जरी 'मर्ढेकर' दिसत असले तरी तिच्या ह्या मर्यादित रूपामुळे मर्ढेकरांची, त्यांच्या कवितेत होते तशी, परिपूर्ण अशी भेट होत नाही. त्यामुळे वाचकमनाला एक रुखरुख लागून रहाते.

मर्ढेकरांची 'कर्ण' ही संगीतिका ग्रीक नाट्यपरंपरेतील शोकांतिका आहे. ग्रीक शोकांतिका या अभिजातवादी परंपरेत लिहिल्या गेल्या आहेत. मर्ढेकरही आधुनिक अभिजावादी परंपरेतील कवी-लेखक आहेत. त्यामुळे ग्रीक नाट्यपरंपरेशी त्यांचे नाते आहे. व्यक्तीचा कोणताही दोष नसताना, किंवा त्याने काहीही गुन्हा केला नसताना त्याच्या भोवती शत्रुवत परिस्थिती निर्माण होऊन ती त्याचा विनाश घडवून आणते. ही विरोधी परिस्थिती परमेश्वरनिर्मित असते. ग्रीक शोकांतिकेत ही जाणीव अभिव्यक्त होते. कर्णाबद्दलही असेच घडले आहे. कुमारिकावस्थेत, अल्प वयात कुंतीला सूर्यदेवापासून कर्ण होतो. परंतु त्याला जन्म देऊनही त्याची योग्य व्यवस्था न लावताच सूर्य निघून जातो. त्याला अर्भकावस्थेत नद्यार्पण करणे कुंतीला भाग पडते. तो सुतकुलात वाढतो आणि क्षत्रिय असूनही कर्णाला सुतपुत्र म्हणून वरिष्ट वर्णांकडून जन्मभर अवहेलना भोगावी लागते.ज्येष्ठ पांडव असूनही त्याला हक्काचे युवराजपद आणि इंद्रप्रस्थाचे राजेपण मिळत नाही. दुर्योधनकृपेवर त्याला मिंधेपणाने आयुष्य काढावे लागते. कौरवपांडवांबरोबर तो द्रोणाच्या युद्धविद्याशालेत धनुर्विद्या शिकतो. द्रोणाचार्यांने त्याच्या शिक्षणाकडे अर्जुन-अश्वत्थाम्याकडे द्यावे तसे- लक्ष दिलेले नसतानाही तो धनुर्विद्येत अर्जुनाइतकेच प्रावीण्य मिळवतो. अर्जुन स्वर्गात जाऊन इंद्राकडून आणि हिमालयात जाऊन महेशाकडून दुर्मिळ आणि प्रभावी अस्त्रे मिळवण्यात यशस्वी होतो. परशुरामाकडून ब्रह्मास्त्र मिळवण्यात कर्णाला मात्र यश येत नाही. त्याला परशुरामाकडून भार्गवास्त्र जरी मिळालेले असले तरी त्याला परशुरामाने दिलेल्या शापामुळे ते त्याला वापरता येत नाही. त्याला अजेय बनवणारी जन्मतःच लाभलेली कवचकुंडले इंद्र त्याच्याकडून काढून घेतो. युद्धात त्याच्या रथाचे चाक जमिनीत रुतते आणि सुरक्षा देणाऱ्या रथातून उघड्यावर आलेल्या, निःशस्त्र कर्णाला मारण्याची संधी अर्जुनाला मिळते. कर्णाला लाभलेले जीवन त्याच्यावर अन्याय्य पद्धतीने लादले गेले आहे. या जीवनाच्या विरोधात तो आयुष्यभर जरी लढत राहिला असला तरी त्याला कधीच यश मिळत नाही. त्याचा काहीही दोष नसताना त्याला आयुष्यभर शिक्षा मिळत राहते.असा कर्ण मर्ढेकरांच्या अभिजातवादी जाणिवांचे परिपूर्ण प्रतीक आहे. म्हणून कर्णकथेतून मर्ढेकरांना अभिजातवादीपरंपरेतील श्रेष्ठ दर्जाचे परिपूर्ण असे शोकात्म काव्य निर्माण करता आले असते. परंतु त्यांनी केवळ आकाशवाणीसाठी एक छोटीशी संगीतिकाच लिहिली.

धनुर्विद्येत कर्णार्जुनाशी तुल्यबळ असणाऱ्या द्रोणपुत्र अश्वत्थाम्यावर दीर्घकाव्य लिहिण्याची मनीषा मर्ढेकरांनी बाळगली होती. कारण कर्णाप्रमाणे तोही त्याच्या जीवनात उपेक्षित,आश्रित आणि नियतीचा शिकार झालेला योद्धा होता. जन्मापासून सतत त्याच्यावर अन्यायच झाला होता. त्याच्या युद्धनैपुण्याची योग्य दखल भारतीय युद्धात घेतली गेली नाही. या सर्वांचा परिणाम म्हणून त्याच्या व्यक्तिमत्त्वात कडवटपणा आलेला होता. शेवटी त्याला वेदनादायक चिरंजीवत्वाचा शाप प्राप्त झाला. मर्ढेकरांच्या जाणीवव्यूहाचे तोही प्रतीक होता. परंतु हे दीर्घकाव्यही मर्ढेकरांनी लिहिले नाही.

मर्ढेकरांनी या प्रकारच्या लेखनाला 'संगीतक' म्हटले आहे. पाश्चात्त्य 'ऑपेरा'साठी त्यांनी योजलेली ही संज्ञा आहे. आपण या प्रकाराला 'संगीतिका' म्हणत आहोत. आपल्याकडे रंगभूमीवर 'ऑपेरा' हा पाश्चात्त्य प्रकार आलेलाच नाही. त्या फक्त आकाशवाणीसाठी लिहिल्या गेल्या आहेत. संगीतिका हा एक नाट्यप्रकार आहे. संगीतिकेतील नाट्य हे उचित वाद्यांसह गाण्यातून साकार केले जाते. गद्य संवादांऐवजी येथे पात्रे गीतांतून एकमेकांशी बोलत असतात. या गीतांतील पद्य हे संगीतानुकूल असावे लागते. प्रत्येक गीत वेगवेगळ्या चालीत

बसवले जाऊ शकेल आणि सर्व गीतांच्या चालींमध्ये विविधता असेल. अशाप्रकारे संगीतिकेतील गीतांचे पद्य असावे लागते. संगीतिकेतील गीते नाट्यात्म असावी लागतात; ती काव्यात्म असतीलच असे नाही. नाट्यात्मकता आणि संगीत यांच्या दर्जावरच संगीतिकेचे मूल्य निश्चित केले जाते. काव्यात्मता हा संगीतिकेचा आवश्यक नव्हे तर अधिकचा गुण मानला पाहिजे. जेव्हा एखाद्या संगीतिकेतील नाट्य हे स्थलकालनिरपेक्ष होऊन वैश्विकतेच्या पातळीवर गेलेले असते आणि तिच्यातील पात्रे जेव्हा विशिष्ट व्यक्ती म्हणून व त्याबरोबर प्रतीकात्मही असतात; तसेच जेव्हा तिच्या भाषेत काव्याची वैशिष्ट्ये उतरलेली असतात; तेव्हा ती संगीतिका मूलत: 'काव्यनाट्य'च असते आणि तिचे केवळ वाचनही तिच्या आस्वादासाठी पुरेसे असते. असे काव्यनाट्य तिच्यात योजलेल्या छंदांच्या लयीत म्हणत रंगभूमीवर सादर केले जाऊ शकते. रंगभूमीवरचे तिचे सादरीकरण हे मूळच्या वाङ्मयरूपाला नाटककलेचे दिले गेलेले रूप असते. ज्या काव्यनाट्यातील संवादांमध्ये संगीतरूप धारण करण्याची क्षमता असते ते काव्यनाट्य 'संगीतिका' म्हणून सादर केले जाऊ शकते. परंतु सर्वच संगीतिका या काव्यनाट्य असत नाहीत. पद्यमय भाषा आणि तिला दिले जाणारे संगीतरूप या दोन गोष्टीच लेखनाला संगीतिका बनवू शकतात.याचा अर्थ संगीतिकेतील गीते काव्यात्म असण्याची गरज नसते. मर्ढेकरांची 'कर्ण' ही स्वरानुकूल 'पद्यरूप' संगीतिका नसून तिची मूळ प्रकृती 'काव्यनाट्या'ची आहे.

मर्ढेकरांनी संगीतिकेच्या स्वरूपाची मीमांसा करणारा लेख लिहिला असून त्यात काव्यनाट्य आणि संगीतिका यांतील फरक स्पष्ट केला आहे. या लेखात त्यांनी संगीतिकेसाठी (ऑपेरासाठी) 'संगीतक' ही संज्ञा वापरली आहे. संगीतक हे काव्यात्मच असते, असे मर्ढेकरांचे मत आहे. गद्य संवादांमध्ये शब्दपसाऱ्याला मोकळीक असते पण संगीतकात मात्र ती देता येत नाही हे सांगून ते म्हणतात-.'एका बाजूला संवादविस्ताराचे बंधन व दुसऱ्या बाजूला संगीतयोजना सुलभ होईलच अशी शब्दांची लयबद्धता ह्या दोहोंची बूज राखून संगीतक लिहायचे म्हणजे साहजिकच लेखकाला काव्याचा आश्रय घ्यावा लागतो' (१७३) 'या विधानात काव्य या संकल्पनेला 'काव्य म्हणजे अल्पाक्षरी लयबद्ध लेखन' असे संकुचित केले गेले आहे. पद्य हेही अल्पाक्षरी आणि लयबद्ध असते. परंतु ते काव्य असेलच असे नाही. लयबद्ध, छंदोबद्ध शब्दरचना हे मुळात पद्याचे लक्षण आहे. सामान्यपणे काव्य जरी या रूपात-म्हणजे पद्यरूपात-रचलेले असले तरी ते काव्याचे व्यवच्छेदक लक्षण नाही. गद्यरूपातील लेखनही काव्यात्म असू शकते. संगीत देण्यासाठी लेखन हे मुळात लयबद्ध असावे लागते. मग ते पद्यरूप गद्य असेल किंवा पद्यरूप काव्य असेल, म्हणून संगीतक हे संगीत धारण करणारे,संगीतरूप घेणारे लेखन असले पाहिजे; एवढेच म्हणता येते. संगीतक आणि काव्यनाट्य यांतील फरक सांगताना मर्ढेकर म्हणतात 'गद्य किंवा पद्य नाटकांप्रमाणेच काव्यनाट्याच्या आधारावर संगीतकाची पुस्तिका तयार करता येणे शक्य आहे; पण गद्य नाटक, पद्य नाटक, काव्यनाट्य ह्यांची विशिष्ट स्वरूपे संगीतकाहून भिन्न आहेत.. काव्यनाट्यातील सर्व संवाद वृत्तात किंवा छंदात लिहिलेले असतात....काव्यनाट्यात हे वृत्त किंवा हा छंद प्रथमपासून शेवटपर्यंत वापरलेला असतो. काव्यनाट्यातील सर्वच पात्रे (काही गौण पात्रे एखादे वेळेस अपवाद असतात व गद्य वापरतात) ह्या एकाच काव्यरीतीतून संभाषण करत असतात.' काव्यनाट्यात एकच एक छंद किंवा वृत्त वापरले जाणे ही केवळ रुढी आहे. कुठलाही कवी ही रुढी मोडू शकतो आणि प्रत्येक पात्राच्या प्रत्येक संवादासाठी वेगवेगळे छंद वापरू शकतो. असे विविध वृत्तांची आणि छंदांची योजना करणारे लेखन प्रकृतीने 'काव्यनाट्य' असू शकते. काव्यनाट्यात काव्य आणि नाट्य हे एकजीव झालेले असावे लागते. किंवा नाट्याला काव्यात्म रूप प्राप्त व्हावे लागते.मग त्याचे बाह्य रूप कसेही असले तरी त्यामुळे त्याच्या काव्यनाट्यत्वाला बाधा येत नाही.

काव्यनाट्य आणि संगीतक यातील फरक सांगताना मर्ढेकरांनी आणखी एक मुद्दा मांडला आहे ते म्हणतात 'काव्यनाट्य आणि संगीतक यांतील या फरकानुसार पहिल्यातील संवाद भावनापूर्ण वक्तृत्वाने वठवायचे असतात, तर दुसऱ्यातील संवाद समर्पक संगीताच्या चालीवर रंगवायचे असतात.' हा फरकही वरवरचा आणि केवळ सादरीकरणातील आहे. संगीतिका ही जशी संगीतबद्ध असते तसेच ती वृत्तबद्ध आणि छंदोबद्ध असल्यामुळे वाचनीयही असते. ती वाचताना वाचक ती गात नाही तर वृत्ताची किंवा छंदाची लय सांभाळत वाचत असतो. असे वाचनही त्याला परिपूर्ण कलानुभव देऊ शकते. तसेच एखादी संगीतिका म्हणून लिहिलेले लेखन जर संगीताऐवजी वृत्तबद्ध आणि छंदोबद्ध लयीत नटांनी सादर केले तर प्रेक्षक-श्रोत्यांना कलानुभव प्राप्त होऊ शकणार नाही, असे म्हणता येत नाही. संगीतिकेचा अनुभव घेण्यासाठी त्याचे लयबद्ध वाचन, नटांकडून त्याचे लयबद्ध सादरीकरण आणि त्यातील शब्द संगीतानुकूल असल्यामुळे त्याचे सांगितिकीकृत रूपाचे सादरीकरण, असे तीन मार्ग उपलब्ध असतात. आणि हे तिन्ही मार्ग वेगवेगळ्या पातळ्यांवरचा कलानुभव देऊ शकतात. काव्यनाट्यातील संवादरूप गीते ज्या छंदात

अनुक्रमणिका

लिहिलेली असतात ते छंद त्यांच्या अंगभूत चालीत जरी म्हटली तरी काव्यनाट्यातील नाट्याचा आणि काव्याचा प्रत्यय येऊ शकतो. त्याला जर संगीतिकेची रूप दिले तर त्यातील काव्याला आणि नाट्याला एक अधिकचा आयाम प्राप्त होऊन ते काव्य, नाट्य आणि संगीत या तीन पातळ्यांवर अर्थपूर्ण बनू शकते. असे जरी असले तरी काव्यनाट्याचे केलेले छंदोबद्ध वाचनही त्यातील नाट्याचा आणि काव्याचा संयुक्त प्रत्यय देऊ शकते. म्हणून काव्यनाट्य हे शब्दकला म्हणून -वाङ्मय म्हणून-परिपूर्ण असते. अशा काव्यनाट्याला जेव्हा स्वरसाज चढवून ते शब्द, स्वर आणि अभिनय (आणि त्यांच्या जोडीला अनेकदा नृत्य) या संयुक्त माध्यमात रंगभूमीवर साकार केले जाते तेव्हा मूळच्या वाङ्मयकलेवर आधिष्ठित अशी, एकाच वेळी काव्याचा, नाट्याचा, (नृत्याचा) आणि संगीताचा संयुक्त प्रत्यय देणारी संगीतमय, काव्यात्म अशी स्वतंत्र नाट्यकला घडवली जाते. म्हणून मर्ढेकरांच्या 'कर्ण'या लेखनाचा विचार काव्यनाट्य म्हणूनच केला पाहिजे. आज त्याचे संगीतमय श्राव्यरूप उपलब्ध नसल्यामुळे एक 'संगीतिका' म्हणून तिचा विचार करता येणार नाही. काव्यनाट्यातील संहितेत घटनांचे कथन, नाट्यात्म घटनांचा कृतिसंलग्न संवादात्मक आविष्कार आणि पात्रांच्या भावनिक-वैचारिक प्रतिक्रिया यांचा समावेश होतो. नाटकाप्रमाणेच काव्यनाट्यातील पात्रांना त्यांचे त्यांचे स्वभाव, जीवनाकडे पहाण्याच्या त्यांच्या त्यांच्या भूमिका असतात.त्यातून त्यांच्या प्रेरणा आणि कृती जन्मत असतात. पात्राच्या परस्परविरोधी प्रेरणा, त्यातून घडणाऱ्या कृती यांतील संघर्षाची अभिव्यक्ती नाटकाप्रमाणेच काव्यनाट्यातूनही होत असते. नाटक या प्रकारातील सर्व घटकांना, सामान्यपणे गद्य नाटकात नसलेली काव्यात्म पातळी काव्यनाट्यात प्राप्त झालेली असते. काही गद्य नाटकेही कमी अधिक प्रमाणात काव्यात्म असू शकतात. गद्यात लिहिलेले नाटक विशिष्ट स्थल,काल व सामाजिक स्थिती आणि त्यांच्याशी निगडित असणारे प्रश्न आणि संघर्ष यांवर केंद्रित होत असते. काव्यनाट्य या विशिष्टांवर केंद्रित न होता ते वैश्विकतेवर, स्थलकालपरिस्थितिनिरपेक्षतेवर, म्हणजेच सार्वत्रिकतेवर केंद्रित झालेले असते. त्यामुळे त्यातील संघर्ष हा मानवाच्या मूलभूत प्रेरणांमधून, जीवनपोषक-पूरक मूल्यांतून आणि सार्वकालिक समस्यांतून जन्मत असतो. गद्य नाटकातील पात्रांचे स्वभाव, त्यांच्या प्रेरणा आणि जीवनोद्दिष्टे विशिष्ट कालसंलग्न वास्तवातून घडलेली असतात. काव्यनाट्यातील पात्रांच्या स्वभावात सार्वकालिक, मूलभूत भावना आणि प्रेरणा, जीवनावश्यक मूल्ये आणि वैश्विक जीवनोद्दिष्टे यांना महत्त्व असते. त्यामुळे काव्यनाट्यातील पात्रांना प्रतीकांचे स्वरूप प्राप्त होत असते. भाषेच्या गद्यरूपातून साकार होणारे कथात्म आणि नाट्यात्म वाङ्मय हे विशिष्ट स्थलकालपरिस्थितीशी निगडित असते आणि काव्य हे स्थलकालपरिस्थितिनिरपेक्ष सार्वकालिकतेशी निगडित असते. काव्याची ही स्थलकाल-परिस्थितिनिरपेक्षता जेव्हा प्रत्यक्षपणे नाट्याला प्राप्त होते तेव्हा ते 'काव्यनाट्या'च्या पातळीवर जाऊ लागते. सर्वच वाङ्मयाचे अंतिम उद्दिष्ट हे सार्वकालिकता-वैश्विकता गाठण्याचे असते. परंतु कथात्म वाङ्मय स्थलकालपरिस्थितीनिबद्ध वास्तवावर केंद्रित होऊन त्यातील सार्वकालिकता आणि वैश्विकता अप्रत्यक्षरीत्या व्यंजित करते. काव्य हे प्रत्यक्षपणे आणि सरळपणे सार्वकालिक आणि वैश्विक असते. मर्ढेकरांच्या 'कर्ण' यातील कर्ण हा आत्मप्रतिष्ठा, आत्मनिर्भरता, स्वयंपूर्णता, मित्रनिष्ठा, त्याच्या जीवनात साह्यभूत होणाऱ्या व्यक्तींशी अविचल बांधिलकी या जीवनावश्यक मूल्यांचे प्रतीक आहे. या मूल्यांपुढे त्याला रक्ताचे नातेसंबंध महत्त्वाचे वाटत नाहीत. त्यामुळे अर्जुन आपला भाऊ असूनही परक्या शत्रूशी ज्या ईर्ष्येने लढावे तसा तो अर्जुनाशी लढतो.अर्जुनाचे युद्ध न्याय्य हक्कांसाठी असून ते स्वार्थातून, सत्तालोभातून आणि अनैतिक मार्गांनी मिळवलेल्या सत्तेविरुद्ध आहे.त्याच्या कृतीमागे न्यायनिष्ठा, आणि उचित अधिकारप्राप्तीची प्रेरणा आहे. कृष्ण हा न्यायाच्या बाजूने उभा असून शल्य हा उपकृततेची किंमत मोजण्यासाठी आपल्या भाच्यांच्या विरोधात उभा आहे. ही पात्रे जशी विशिष्ट जीवनमूल्यांची प्रतीके आहेत तसेच त्यांचे माणूसपणही जपले गेले आहे. न्याय्य हक्कांसाठी लढणारे पांडव युद्धात अन्याय्य डावपेचांचा अवलंब करतात आणि न्यायाच्या बाजूने उभा असणारा कृष्णही त्यांना मान्यता देतो. किंबहुना असे डावपेच कृष्णच पांडवांना सुचवतो. शल्य एकीकडे त्याचे भाचे असणाऱ्या पांडवांच्या विरोधात कौरवांबद्दलची कृतज्ञता सांभाळण्यासाठी लढत आहे तर दुसरीकडे कर्णाचे सारथ्य करताना तो कर्णाचा तेजोभंग करून पांडवांना साह्यही करत आहे. मूळच्या महाभारतातील ही वैशिष्ट्ये मर्ढेकरांनी आपल्या या काव्यनाट्यात सांभाळली आहेत. परमेश्वराचे अन्याय्य,निर्दय असे स्वरूप, मानवाचे अंगभूत दुर्बलपण आणि त्याची नियतिशरणता, माणसाला स्वयंपूर्णतेची असलेली ओढ आणि त्यामुळेच त्याची होणारी शोकांतिका, असा वैश्विक पातळीवरचा नवा अर्थ मर्ढेकरांनी या काव्यनाट्याला दिला आहे. या सर्व जाणिवा त्यांच्या कवितांतूनही व्यक्त झाल्या आहेत. थोडक्यात, मर्ढेकरांच्या या काव्यनाट्यातील पात्राचे माणूसपण टिकवून त्यांना प्रतीकात्म रूप दिले गेले आहे. जीवनातील प्रतीकक्षम वास्तव ही सुद्धा काव्याची सामग्री


असते. कर्णकथेतील हीच सामग्री येथे योजिली गेली असल्यामुळे मर्ढेकरांच्या 'कर्ण' या लेखनकृतीला काव्यनाट्याचे स्वरूप प्राप्त झालेले आहे. या काव्यनाट्याला काव्यात्म भाषेची अनेक वैशिष्ट्ये प्राप्त झाली असून ती यातील नाट्याशी संयुक्त केली गेली आहेत.

भाषिक लयबद्धता हा पद्यामार्फत काव्याला प्राप्त झालेला धर्म आहे. मर्ढेकरांचे हे लेखन छंदोबद्ध असल्यामुळे त्यात भाषिक लय साधलेली आहे. यातील सर्व तारकांच्या समूहगानासाठी त्यांनी अधिक मात्रासंख्या असलेला (लवंगलतिकेसारखा) छंद वापरला आहे. या छंदातील ओळीत आंतरिक यमके किंवा अनुप्रास नसल्यामुळे त्यात अंतर्गत विराम, खटके येत नाहीत. हा छंद म्हणत असताना त्याची प्रत्येक ओळ सलग म्हणावी लागते. त्यामुळे ती गांभीर्याचा प्रत्यय देते. शोकात्म अनुभवाच्या अभिव्यक्तीत अपेक्षित असणारा परिणाम या छंदयोजनेमुळे साधला जातो. आनंदी तारकांच्या गानासाठी योजलेला छंद कमी मात्रासंख्येचा असून त्यातील ओळींत अंत्य यमक साधलेले आहे. त्यामुळे त्यात गतिमानता आलेली असून अंत्य यमकामुळे प्रत्येक ओळीच्या अंती आपोआप खटका आलेला आहे. या दोन्हीमुळे आनंदी भावाचा प्रत्यय हा छंद देतो. दुःखी तारकांच्या गानासाठी योजिलेल्या छंदातील प्रत्येक ओळीत कमी मात्रासंख्येचे तुकडे असून तुकड्यांच्या शेवटी स्वल्पविराम टाकले आहेत आणि काही तुकड्यांत अंत्य यमकांची किंवा अनुप्रासांची योजना केली आहे. दुःखी तारकांच्या समूहगानातील ओळींची ही रचना त्यातील दुःखाच्या, कारुण्याच्या भावनेला अर्थपूर्णता मिळवून देते. याच प्रकारे पात्रांच्या संवादासाठी त्यातील भावनेला पोषक असे छंद योजण्यात आलेले आहेत. या प्रकारे या काव्यनाट्यात छंदनियमित लय आणि नाट्यात्म अनुभव संयुक्त केले गेले आहेत.

या काव्यनाट्यातील कथन आणि संवाद यांत केलेल्या अर्थसमृद्ध शब्दयोजनेमुळे कथा व नाट्य यांचा विस्तार टाळला जाऊनही त्यांना परिपूर्णता प्राप्त झाली आहे. अशी अल्पाक्षरी योजना हे काव्याचे लक्षण आहे. कर्णाच्या वधाने ज्या युद्धाचा शेवट होणार आहे त्या युद्धाच्या दृश्याबद्दल 'कारुण्य, कष्ट-वैकल्य, नीति-चांचल्य आणि नैराश्य, । दौर्बल्य अपेशी दुर्दैवाचे दृश्य ।' असे उद्गार दुःखी तारकांच्या समूहाने काढले आहेत. ही सर्व कर्णवधकथेची वैशिष्ट्ये असून ती या कथेला अर्थपूर्णता देत आहेत. हे मूलतः 'नाट्य' असल्याने यात कथनाबरोबरच बोलणाऱ्या पात्राचे हेतू, भावना, आणि समोरच्या पात्राचे बोलणे आणि कृती यांबद्दलच्या भाव-वैचारिक प्रतिक्रिया संवादांतून व्यक्त होत असतात. प्रत्येक पात्राचे बोलणे भावनिक पातळीवरचे असते. आणि त्यांतून परस्परविरोधी भावनांचा न्यास साधला जात असतो. आनंदी तारकांचे गान आणि दुःखी तारकांचे गान हे या प्रकारच्या न्यासाचे उदाहरण म्हणून दाखवता येईल. एका बाजूला कर्ण एकटाच आणि त्याच्या विरोधी बाजूस अर्जुन, कृष्ण आणि अप्रत्यक्षपणे शल्य, यांच्यात परस्परविरोधी भावनांनी भारलेले संभाषण होत असते. भावकाव्याप्रमाणे कथात्म आणि नाट्यात्म काव्याची बांधणी प्रतिमांतून होत नाही. येथे कथनाला आणि व्यक्तीच्या भावनिक प्रतिक्रियांना अर्थपूर्ण करणाऱ्या कथात्म आणि नाट्यात्म प्रतिमांची गरजेप्रमाणे योग्य ठिकाणी योजना केली जाते. या काव्यनाट्याचे आशयसूत्र व्यक्त करणारी सर्व तारकांच्या समूहगानातील 'विश्वपटावर विधिघटनांची सदा सरकवी कुणी । अगम्य संकेताने चित्रे' ही प्रतिमा तसेच या काव्यनाट्याच्या अखेरच्या सर्व तारकांच्या समूहगानात येणारी आणि या संपूर्ण काव्यनाट्याला शोकाचा भावनिक स्वर देऊन ते सार्वकालीन बनवणारी 'अफाट गगनीं उदासवाणी भिरभिरते साजणी.। रिती भावना अता एकली ही केविलवाणी!। गहिवरते ती हताश कोणी मानव बघता गुणी । आणि सांगते कर्णकहाणी हसून वेडेपणी :।' ही प्रतिमा उदाहरणादाखल देता येतील. कथेला आणि कथेतील पात्रांना प्राप्त करून दिलेली प्रतीकात्मकता, लयबद्ध भाषिक रचना, अल्पाक्षरत्व, कथनाचे आणि संवादांचे भावकेंद्रीत्व,आवश्यक त्या ठिकाणी केली जाणारी प्रतिमांची योजना, या वैशिष्ट्यांमुळे 'कर्ण' या लेखनकृतीला काव्यात्मता प्राप्त झाली आहे. कर्णकथा ही महाभारतासारख्या आर्ष महाकाव्याचा भाग असल्यामुळे या कथेच्या आर्षतेचा प्रत्यय देण्यासाठी मर्ढेकरांनी संस्कृतप्रचुर भाषेची योजना केली आहे. पंडिती काव्यपरंपरेतील ही भाषशैली आहे. छंदयोजना आणि शब्दयोजना यांतून या कथेतील नाट्याचा. नाट्यातील भावनांचा आणि आर्ष वातावरणाचा प्रत्यय घडवला जातो. कर्ण हे मर्ढेकरांचे त्रोटक पण अर्थपूर्ण असे शोकात्म काव्यनाट्य आहे. मात्र त्यातील त्रोटकपणा वाचकमनात असमाधानाची भावना निर्माण करतो. मूळच्या कर्णकथेतील सर्वच शोकात्म पदर या काव्यनाट्यात व्यक्त केले गेले असते तर मराठीतील ते एक श्रेष्ठ शोकात्म काव्यनाट्य ठरले असते, असे म्हटल्यावाचून राहवत नाही. थोडक्यात, आकाशवाणीसाठी केवळ 'संगीतक' म्हणून लिहिलेल्या या लेखनाला दर्जेदार काव्यनाट्याचे रूप प्राप्त झाले आहे.

। डॉ. सुधीर रसाळ
१००, श्रेयनगर, नवा उस्मानपुरा
औरंगाबाद ४३१ ००५
भ्रमणभाष : ९८८१४००३५०

अनुक्रमणिका



॥ कथा ॥

''खुर्ची''

श्याम पेठकर

■

साहेबांच्या केबीनमध्ये असलेली त्यांची खास खुर्ची बाहेर काढण्यात आली होती. संस्थेच्या त्या अफाट पसारा असलेल्या ऑफिसमध्ये जो चपराश्यांना बसण्याचा विभाग होता त्याला सगळेच 'चपराशीपुरा' म्हणायचे. तिथे ही खुर्ची नेऊन ठेवण्यात आली. महालातली राजकन्या अचानक झोपडपट्टीत राहायला यावी, असेच साऱ्या चपराश्यांना त्या खुर्चीकडे बघताना वाटत होते.

''अबे, दुरुस्तीले टाकाची हाय तवरीक अठी ठेवली हाय.'' एका चपराश्याच्या मदतीनंच तिथे तिथे खुर्ची आणून ठेवणाऱ्या भिवगडेनं टेचात सांगितलं. भिवगडे हा इस्टेट मॅनेजर असलेले साहेबांचे साळे जागेश्वरजी यांचा खास माणूस होता. तसा तो चपराशीच होता मात्र साहेबांच्या जातीचा अन् त्यात जरा चतरा त्यामुळे त्यानं फ्लोअर इंचार्ज सारखी पोष्ट जमवून घेतली होती.

''जरा पाह्यसान, बसूगिसू नोका. होऽऽव, नाही त दिसली खुर्ची त घ्यानचं बसून.'' असं म्हणत तो त्याच्या खास लकबीनं डावा हात मागच्या बाजूनं झटकत निघाला. परत वळला, कमरेवर हात ठेवत महत्त्वाचं सांगत असल्यागत म्हणाला, ''साहेबाची खास खुर्ची हाय. लकी हाय... येच्यावर बसले न तवापासून त्याहीनं कहीच मांग वळून नाही पाह्यलं. तवा...'' त्यानं त्याच्या जाड भुवया उंचावत डावा हात अमिताभ बच्चन सारखा नाचवीत 'तवा' नंतरचं वाक्य त्यानं अर्धवट सोडलं पण त्याचा अर्थ हाच होता की 'जरा सांभाळून अन् आपली पायरी ओळखून वागा'

साहेबांची खुर्ची... साहेब गावात असले की मग ते याच संस्थेच्या त्यांच्या केबीनमध्ये असायचे. व्याप वाढत गेला तसे मग साहेब गावात कमीच असायचे. गेल्या दोन महिन्यात ते फारच फार चारेक दिवस या ऑफिसला आले होते. आत्ता अगदी दोनेक दिवसांपूर्वी ते दोने- अडीच तास इकडे येऊन बसले होते. साहेब आले की मग ऑफिस अगदी गजबजून असायचे. कामही अगदी कडक शिस्तीत आलेलं असायचं. तसं या ऑफिसला साहेबांचे मोठे चिरंजीव बसायचे. अलीकडे ते देखील महिन्यातून चार- दोन वेळा मुंबईला चक्कर मारायचे. साहेब परवा आले तेव्हा बरीच धावपळ होती. एकतर साहेबांचा शिक्षण संस्थांचा पसाराच मोठा. इंजिनियरींग, मेडिकल पासून डीएड पर्यंत सगळेच शिक्षण साहेबांच्या संस्थेत मिळायचे. सध्या शाळा- कॉलेजच्या प्रवेशाचे दिवस होते. सतत कुणीतरी भेटायला येणारे. डोनेशन कमी करुन द्या... साहेबच गावात अन् तेही संस्थेत आहेत म्हटल्यावर मग दिल्ली- मुंबईत जावून कुठे गाठता साहेबांना? बरं संस्थेचा रजिस्ट्रार डोनेशन, फी यात कुणी कमी करा, असे म्हटले तर 'साहेबांची चिठ्ठी आणा' किंवा मग 'साहेबांच्या मोठ्या मुलाची चिठ्ठी आणा' असे सांगून मोकळा व्हायचा. साहेब किंवा मोठा दर्शन एकतर भेटायचे नाही अन् भेटले तरी ठरलेली डोनेशनची रक्कम घेतलीच जायची. रजिस्ट्रार जैनला डोनेशनची रक्कम अन् टार्गेट दिलेले होते. त्याला ते पूर्णच करावे लागायचे. त्यामुळे ॲडमिशनच्या दिवसात साहेब किमान गावात अन् या संस्थेच्या मुख्यालयात नसायचे. असलेच तर त्यांना भेटताच येणार नाही, अशी व्यूहरचना असायची. एखादा पालक साहेबांच्या मतदारसंघातला असायचा. नाहीतर नातेवाईकाचा मित्र तरी. तो साहेबांच्या मोठ्या मुलाला, लहान मुलाला किंवा मग साहेबांचा सेक्रेटरी बाळासाहेब ढाले याच्याशीच थेट संगनमत करुन व्यूह भेदायचा. सामान्य पालक आला तर साहेबांच्या केबीन बाहेर असलेल्या त्यांच्या ऑफिसमधला स्वागत कारकून त्याला, ''हं बोला साहेब...''

''साहेबांना भेटायचं होतं... ॲडमिशनचं काम होतं.'' तो पालक म्हणायचा.

''बरं, बरं... बसा. साहेब जरा मिटींग मध्ये आहे.'' तो अगदी हसून, आपुलकीनं हे सांगायचा. बसायला छान नरम, गुबगुबीत सोफासेट, वर गरगरणारा पंखा, आजुबाजूच्या एसी केबीनमुळे साहेबांच्या केबीन बाहेरच्या लाऊंजमधील वातावरणही गारच असायचं. त्यातच तिथे पांढरे डगलेवाले वावरायचे. बड्या अधिकाऱ्यांचाही साहेब असले की राबता असायचा. त्यामुळे इथले वातावरण पुरेसे गंभीर असायचे. दबक्या, हळू आवाजातले बोलणे, कुठलं कर्ज असल्यागत हळूवार हसणे. थोडं जड आणि जाडच वातावरण. त्यामुळे इथे बसल्या बसल्या डुलकी नक्कीच यायची. त्यातच चहा यायचा मधूनच. सामान्य पालक गदगद व्हायचा चहाने. तासाभराने तो चुळबूळ करीत वरत कारकूनाकडे जायचा. तो न बोलताच थोडावेळ बसा, अशी खूण करायचा. असे चार- दोन तास निघून गेल्यावर तो पालक चिडायचा.

''का यार सोहबांना पाच मिनिटं भेटायचं त आहे... चार तास झाले ना.'' तो म्हणायचा.

''होव, मंग मी काय करू?'' कारकून.

''आता इतके लोक भेटूनच आले. मला जावू द्या ना...'' तो पालक म्हणायचा.

''थांवा, एवढी मिटींग होऊ द्या, मुंबईचे मानसं आले हायत. बस याच्या बाद तुमालेच पाठतो.'' असं सांगत तो कारकून त्या पालकाला बसवून ठेवायचा. संध्याकाळ होत आली असायची. साहेबांच्या केबीनबाहेरच्या बऱ्यापैकी मोठ्या साईबाबाच्या मूर्तीची सांजपूजा व्हायची. दिवा लागायचा. तरीही त्या पालकाची भेट झालेलीच नसायची. 'बस्स, आत्ता तुमचाच नंबर..' असं करत करत बरेच पालक निघूनही जायचे. एखादा उरायचा. फारच गरजू. साहेब घरी जायला बाहेर पडायचे तर मग हा आडवा व्हायचा. कारकूनही सांगायचा, ''सकाळपासून बसले साहेब ते...''

साहेब मोबाईल्ची स्टाईलीश चाळा करीत चष्म्याच्या वरुन बघायचे, ''हं बोला?''

तो पालक थरथरत्या हाताने फॉर्म समोर करायचा. त्यावर पन्नास हजार, एक लाख असा आकडा टाकलेला असायचा. साहेब मग आपल्याला काहीच कळलं नाही, असा चेहरा करुन प्रश्नार्थक बघायचे.

''सर, ते डोनेशनचा आकडा थोडा कमी करुन द्या... जैन साहेब म्हणाले, मोठ्या साहेबांची सही घेऊन या कमी करतो.'' साहेब मग हातातल्या फार्मकडे अन् त्या माणसाकडे बघायचे अगदी गोंधळात पडल्यागत.

''हे काय आहे? मला नाही कळलं...'' साहेब म्हणायचे.

''डोनेशन...'' तो पालक डोनेशन हा शब्द चारचौघात इतका हळू अन् लाजून म्हणायचा की नवख्या माणसाने केमिस्टकडे जावून कंडोम मागावेत त्याहीपेक्षा त्याचा आवाज डोनेशन म्हणताना हळू असायचा. त्याने नुसते डोनेशन म्हटले की साहेब परत चेहऱ्यावर मोठ्ठे प्रश्नचिन्ह आणायचे.

''डोनेशन दोन लाख म्हणत होता... मी म्हटलं काही कमी करा. त जैन साहेब म्हणे की मोठ्या साहेबांकडून या फॉर्मवर लिहून आणा...'' मग साहेब खूप अस्वस्थ व्हायचे. तो फॉर्म घेऊन परत केबीनमध्ये जायचे. त्यांच्या मागे लवाजमा असायचाच.

''अरुण...'' ते क्लर्कला हाक मारायचे.

''जी साहेब...''

''ही डोनेशनची काय भानगड आहे? आपल्या कॉलेजला ॲडमिशन देण्यासाठी डोनेशन घेतो आपण?'' साहेब चढ्या आवाजात विचारायचे.

''नाही, म्हनजे मले त काही माहीत नाही...'' अरुण नावाचा तयार झालेला तो तरणा कारकून कमालीचा अभिनय करायचा.

''काय माहिती नाही? सामान्य माणसाकडून असे दोन दोन लाख डोनेशन घ्यासाठी शिक्षनसंस्था काढल्या का आम्ही? आता हे आले म्हणून माहीत झालं. मी शाळा- कॉलेजमधून लक्ष काढून टाकलं हे असं काही सुरू झालं?'' साहेब मग खूपच शरमिंदे झाल्यागत चेहरा करायचे. त्या पालकाला बसा, असे म्हणायचे. ''चहा दे यांना...'' असं म्हणत मग अत्यंत आपुलकीनं त्या पालकाला विचारायचे, ''दिवसभर इथेच आहात काही खाल्लं का?'' तो पालक मग गहिवरानं रडायचाच बाकी राहायचा.

''जैन कुठे आहे?'' साहेब विचारायचे. म्हणजे आता जैनचं काही खरं नाही. एक मोठा घोटाळाच बाहेर येणार, असे त्याला पालकाला वाटायचे.

''जैन साहेब घरी गेले सर.''

''आमचा दर्शन तरी आहे का नाही?''

''नाही दर्शनसाहेब मुंबईला गेले कालच.'' परत उत्तर यायचं.

''जैनला फोन लावा... कॉलेजकडे कोण पाहते आजकाल?''

''लहाने जय साहेब...''

''अच्छा, मला भेटायला लावा तुमच्या जय साहेबांना अन् त्या जैनला...'' मग ते त्या पालकाकडे बघत अजीजीनं म्हणायचे, ''मी पाच- सात वर्षांपासून कॉलेजकडे लक्षच देत नाही.

अनुक्रमणिका

कारखान्यातही लक्ष देता येत नाही. दिल्लीत गेल्यापासून व्याप वाढला. तुम्ही लोक विश्वासानं निवडून देता तर मग कामं करायला नको? त्यात हे असे प्रकार होतात...'' असे म्हणत साहेब मग त्या पालकाला फॉर्म मागायचे. त्यावर डोनेशन लिहीलेल्या रकमेवर काट मारायचे. उद्या भेटा त्या जैनला, असे सांगायचे.

''काय करता?''

''बँकेत क्लर्क आहे साहेब...''

''दोन-तीन लाख कुठून आणाल? उद्या भेटा जैनला. मी रात्री बोलतो त्याच्याशी.'' असं म्हणत साहेब निघायचे. परत एकदा अरुणला सांगायचे, ''अरुण, त्या जैनला काही झालं तरी वाड्यावर येऊन भेट म्हणा...'' साहेब निघून जायचे. तो पालक हातातल्या फॉर्मकडे अन् साहेबांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे अनिमिष नेत्रांनी बघत राहायचा. एकही पैसा डोनेशन न देता ॲडमिशन! एवढ्यावेळ थांबल्याचं सार्थक झालं. साहेबांबद्दल तर कृतज्ञतेनं पार वाकून गेला असायचा तो. रात्री खूप शांत झोप लागायची. साहेबांसारखी माणसं आहेत म्हणून देश टिकून आहे, असा ठाम विश्वास त्याला वाटू लागलेला असायचा.

दुसऱ्या दिवशी तो टेचातच जैनकडे जायचा. फॉर्म त्याच्यासमोर टाकायचा.

''साहेबांनी काट मारलाय डोनेशनवर...'' असे म्हणत असताना तो जैनच्या चेहऱ्याकडे बघायचा. रात्री साहेबांनी पार शिलून काढला असेल याला, असा विचार करायचा. जैन मात्र शांत चेहऱ्याने हसायचा.

''साहेबांना काय कळतं? संस्था टिकवायच्या, चालवायच्या अन् विकास करायचा तर... साहेब आमचे महादेव आहे. भोळासांब! देतच सुटतात. त्यांच्या मनाने चाललो ना तर बुडायचं सगळं...'' जैन असे बोलत असताना हा पालक मात्र हादरलेला असायचा.

''साडेतीन भरावे लागतील.'' जैन म्हणायचा.

''अरे! काल तर दोन म्हणाले होते...''

''हो, आजचा रेट हाच आहे. दोनच सीट शिल्लक आहेत.'' जैन.

''पण साहेब...''

''साहेबांचं नका सांगू हो, त्यांना काय दिल्लीत असतात. जनतेचा कळवळा त्यांना परवडतो. त्यांचे आदर्श महात्मा गांधी आहेत. गांधींच्या तत्त्वावर शिक्षणसंस्था नाही चालत. साडेतीन भरा, ॲडमिशन घ्या.'' जैन अखेरचं बोलायचा.

''दोन भरतो ना...'' तो पालक आता एकदम नम्र झालेला.

''ठीक आहे. रोख, हजार नाहीतर पाचशेच्या नोटा. चार वाजताच्या आधी.'' जैन सांगायचा. मोठ्या दर्शनच्या केबीनमध्ये रक्कम द्यायची. त्याची बायको सांभाळायची हा व्यवहार. रक्कम टेबलवर ठेवली की अरुण त्या नोटा दोन्ही हातांनी ओढून मोठ्या खोक्यात किंवा मोठ्या पिशवीत कोंबायचा. केबीनच्या मागच्या बाजूला असलेल्या पेटी केबीनमध्ये मोजल्या जायच्या नोटा. हजार अन् पाचशेच्या नोटा जमवून कसाबसा चार वाजेपर्यंत तिथे पोहचलेला तो पालक तिथे अरुणला पाहून काय समजायचे ते समजायचा. माणसाच्या कमरेच्या उंचीचे दोन- अडीच फूट लांबी, रुंदी असलेले ते खोके किती भरतात, असे तो अरुणला सहज विचारायचा.

''दिवसभरात तीन- चार तरी भरतात ॲडमिशनच्या दिवसात.'' असे ऐकून दीपून जायला डोळेच शिल्लक नसायचे. आधीच मॅडमने घातलेल्या हिऱ्याच्या नेकलेसने दीपून दीपून डोळे विझलेले असायचे अन् कालपासून आलेल्या या नव्या साक्षात्काराने गुंग होण्याइतकीही मती कायम नसायची...

तर साहेब!

एक आख्यायिका. जिवंतपणीच एक दंतकथा झालेले. त्यांच्याबद्दलच्या सुरस, चमत्कारीक कथा होत्या. राजकारण चातुर्याच्या होत्या, रंगेलपणाच्या होत्या, तशाच त्या जनतेविषयीच्या आस्थेच्या, कळवळ्याच्याही होत्या.

साहेब म्हणजे पंचायत समितीला चपराशी होते. खेड्यातून आलेले. अगदी नव्यानेच लागलेले. एका झेडपी सदस्याच्या लग्गाने. जिल्ह्यात ७६ चपराशी होते त्यांना सेवेत नियमित केलेले नव्हते. अर्ज, विनंत्या, निवेदने झाली. काही उपयोग नव्हता. साहेबांना चर्चेतून हे कळले. त्यांचा एक मित्रच दहा वर्षांपासून प्यून होता पण नियमित होत नव्हता.चपराशी संघटनेच्या सभेला साहेब गेले. चपराश्यांचे नेते गुळमूळ बोलताहेत हे अगदीच नवखे अन् तरुण असूनही साहेबांच्या लक्षात आले. कुणाला बोलायचं आहे का, असं नेत्यांनी विचारताच साहेबांनी हात वर केला. हे झिन्नूड काय बोलणार, असा चेहरा करत नेता म्हणाला, ''बोल...''

साहेब धो धो बोलले. आपण अधिक आक्रमक व्हायला हवे, संप करायला हवा अन् संप पुकारण्याआधी काय काय करायला हवे तेही सांगितले. इतर चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांनाही सोबत घ्यावे. सफाई कामगार देखील आहेत. त्यांच्याही

अनुक्रमणिका

समस्या आहेत... चपराश्यांचे प्रस्थापित नेते सोडून इतरांना ते पटलं. संप झाला. त्यात सफाई कर्मचारी देखील सहभागी झाले. संपाच्या आदल्या संध्याकाळी बैठक झाली. तोवर साहेब सगळ्यात तरुण असूनही सूत्रं त्यांच्याकडे आली होती. त्यांनी सांगितले, आज रात्री मोकाट कुत्री, मांजरं मारा. पंचायत समिती सभापतीपासून जिल्ह्याचे नेते मंत्रीमहोदय शिंदेंपर्यंत साऱ्यांच्या घराभोवती मेलेली ही जनावरं फेकून द्या... दोन दिवसात त्याचा परिणाम दिसला. मेली कुत्री सडली. त्यांचा वास येऊ लागला. नाक दाबल्या गेलं. नेत्यांचं मग तोंड उघडलं. कामगार संघटनेशी ते चर्चेला तयार झाले. मग पालकमंत्र्यांनी त्याचं श्रेय लाटण्यासाठी जाहीर सभा घेऊन त्यात चपराशी व सफाई कर्मचाऱ्यांना सेवेत नियमित केल्याची पत्रं देण्यात आली. त्या सभेत कर्मचाऱ्यांतर्फे साहेबांनी भावना व्यक्त केल्या. ते भाषण ऐकून पालकमंत्री शिंदे प्रभावीत झाले. नंतर साहेब चपराश्याच्या पोष्टवर होते मात्र काम ते नव्हतेच. विधानसभेच्या निवडणुकीत साहेब मंत्री शिंदेंच्या प्रचारात भाषणे ठोकत होते. नंतर त्याचं फळं मिळालं. पंचायत समिती सदस्य म्हणून साहेबांना पक्षाने तिकिट दिलं, साहेब निवडून आले. डोकं चालवून पहिल्यांदाच पंचायत समितीवर निवडून आले असतानाही सभापतीपद मिळविलं. आपला एक चपराशी बांधव पंचायत समितीचा सभापती होतो, म्हणून समस्त चपराशी वर्गाला आनंद झाला. साहेबांचा सत्कार करण्यात आला. जिल्ह्यातल्या चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटनेचे साहेब जिल्हाध्यक्ष झाले. मग झेडपीत निवडून आले. अध्यक्ष झाले. सक्रीय राजकारणात अशी दहा वर्षे निघून गेली. शिंदे हे साहेबांचे गॉडफादर होते. राज्य सरकारचे महत्त्वाचे नेते. साहेब त्यांचा सगळा कारभार बघायचे. शिंदेंनी आमदारकी सोडून केंद्रात जावे, असे साहेबांनी सुचवून पाहिले. ही आपली अखेरची निवडणूक, असे शिंदे म्हणायचे. यावेळच्या विधानसभेला अगदी अखेरच्या क्षणी साहेबांनी कर्मचारी विकास आघाडी करून फॉर्म टाकला. शिंदेंनी विचारले, ''युवराज, हे का व्हय?''

''साहेब, बाकी कोनी हे करू नये म्हून म्याच फारम टाकला. ऐन टायमाले मांग घेऊन तुमाले पाठींबा देनार...'' साहेब हसत म्हणाले. शिंदे साहेबांना युवराज म्हणायचे. शिंद्यांना असे आंधीत ठेवत साहेब लढले. शिंदे नुकतेच डोळ्यांचे ऑपरेशन करुन आले होते. त्यांनी जपानवरुन चष्मा आणला होता. साहेबांनी आतून प्रचार केला, शिंद्यांचा चष्मा एक्सरे ग्लासचा आहे. त्यातून लोक नागडे दिसतात. झाले! बाया तर शिंद्यांच्या प्रचारा सभेला जातच नव्हत्या. माणसे देखील टाळू लागली. शिंदे पडले. साहेब निवडून आले. पक्षाशी बंडखोरी केली होती पण निवडून आल्यावर पक्षाला पाठींबा दिला. मी मूळचा याच पक्षाचा, असे जाहीर केले. अपक्षांची मोट बांधली. त्यांचे नेते झाले साहेब. त्यातून पहिलीच टर्म असूनही मंत्रीपद मिळविले...

या साऱ्याच प्रवासात त्यांना पंचायत समितीत सभापतीपद मिळाल्यावर बुडाशी आलेली खुर्ची अगदी मंत्री झाल्यावर देखील त्यांनी सोडली नव्हती. ती लकी खुर्ची होती... साहेबांना त्या खुर्चीमुळेच मोठमोठी पदे मिळत गेली, असे त्यांनाही वाटू लागले होते.

साहेब प्रथमच पंचायत समिती सभासद आणि त्याचवेळी सभापती झाले. शिंदे साहेबांचे एक गुरू होते, नाथगुरू. तसा त्यांचा अन् साहेबांचा काहीएक संबंध नव्हता. शिंदे साहेब मात्र नाथगुरुंचे साधे नावही घेतले तर जमिनीवर डोकं टेकवायचे. साहेबांच्या पदग्रहणाला शिंदे साहेब होतेच. साहेबांची अटच होती की शिंदे साहेबच मला खुर्चीत नेऊन बसवतील. शिंदे साहेबांसोबत गाडीतून नाथगुरू उतरले. शिंदे साहेब भलतेच खुश होते. ''युवराज तुझ्या पदग्रहणाला मी असावा असा आग्रह तू धरलास पण बघ, नाथगुरूंना कळलं. तुला ओळखत नसूनही काल रात्री स्वप्नात आले गुरूदेव अन् मला म्हणाले, तुझ्या युवराजाच्या पदग्रहणाला मी येणारेय्... स्वप्नात बोलले अन् सकाळी प्रत्यक्षात हजर!'' झाले शिंदे साहेबांच्या गुरूदेवांच्या हस्ते पदग्रहण झाले. नाथगुरू म्हणाले, ''ही खुर्ची म्हणजे कल्पवृक्ष आहे तुझ्यासाठी. यावर बसून तू जी इच्छा धरशील ती पूर्ण होइल तुझी...''

साहेब खुश झाले. शिंदे साहेब तर फारच कारण त्यांच्या गुरुदेवांनीच युवराजाला आशीर्वाद दिला होता. नंतर साहेबांना कळले की नाथगुरू सगळ्यांनाच असे म्हणतात. शिंदे साहेबांकडे गेला महिनाभर त्यांचा मुक्काम होताच. साहेबांच्या फार्म हाऊसवर होता. साहेब कुठल्या कार्यक्रमाला जातो म्हटल्यावर गुरू देखील सोबत निघाले. इथून ते त्यांच्या कोकणातल्या गडावर जाणार होते...

काही का असेल. तीच ही खुर्ची... बाहेर दुरुस्तीच्या निमित्ताने अडगळीत होती. चपराश्याला मंत्री करणारी खुर्ची... लकी खुर्ची!

हिरामण गनपत जवरे, अशी अक्षरे त्याच्या युनिफार्मवर लावलेल्या निळ्या पट्टीवर लिहिली होती. फेन्ट निळा ड्रेस म्हणजे चपराशी. त्यावर निळी पट्टी अन् त्यावर त्या चपराशाचे नाव कोरलेले असले म्हणजे तो हेड चपराशी. म्हणजे सेवेत नियमित असणारा. हिरामण जवरे अन् नारायण जाने हे या

विभागाचे हेड चपराशी. हिरामणनं ऑफिसात आल्यावर त्याचा टिफीन नीट खुंटीला टांगून ठेवला. दहा वाजले होते. अजून साहेब मंडळी यायची होती. या मजल्यावर दर्शन साहेब, जय साहेब अन् स्वतः मोठ्या साहेबांच्या केबीन होत्या. त्यामुळे महत्त्वाचे अधिकारी, पदाधिकारी याच मजल्यावर बसत. हेड अकाऊंटंट, रजिस्ट्रार जैन, अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. हरीप्रसाद पान्डेय्, सुपरवायझर सावळे, साहेबांचा सेक्रेटरी किरण, दर्शन अन् जय साहेबांची सेक्रटरी सिन्हा मॅडम, इस्टेट मॅनेजर जागेश्वरजी अन् साहेबांचे राजकीय सल्लागार कम पीआर ऑफिसर राजनसाहेब... हे आधी पत्रकार होते. नंतर साहेबांशी संबंध वाढले अन् साहेबांनी त्यांना ''राजनजी तिकडं किती भेटतेत तुमाले?'' असं थेटच विचारलं. तसेही राजनजी साहेबांच्या बातम्या करुन दे, लेख लिहून दे असं करायचे. त्यांच्या वर्तमानपत्रात त्यांना तसा पगार कमी. पोष्ट मोठी, माणूसही हुशार पण मराठी वर्तमानपत्र अन् तेही विभागीय म्हणून वर्तमानपत्राचीच परिस्थिती बेताची. साहेबांनी माणूस हेरला, त्यांची राजकीय वार्तापत्र जबरदस्त असायची. त्यातून राजकारणाची दिशा कळायची अन् आपण काय करायला हवे ते देखील कळायचे. साहेब राजनजींना मदत करायचे. तेही साहेबांना अशी मदत करायचे.

किती पगार मिळतो, या प्रश्नावर राजनजी थोडे अडखळले. त्यांच्या उत्तराची वाटही न पाहता साहेब म्हणाले, ''त्याच्या दुप्पट देतो. आपल्याकडे या. पीआर पहा अन् विभागिय विकास परिषदेची तुम्हीच दिलेली कल्पना तुम्हीच राबवा...''

संध्याकाळी संपादकांना राजीनामा देत राजनजी इकडे जॉइन झाले... सांगायचा अर्थ हाच की या फ्लोअरवर महत्त्वाच्या व्यक्तींचा राबता असायचा. त्यामुळे 'ए' विंग अन् 'बी' विंग दोन्ही सांभाळायला इथे किमान चार चपराशी असायचे. त्यात हिरामण अन् नारायण हे हेड धरुन सहा. हिरामण अन् नारायणचा दरारा होता. त्यांच्या रीटायरमेंटला पाच- सहा वर्षे शिल्लक होती मात्र त्यांच्या नावासोबत आता 'जी' लागले होते. दोघेही कोर्टातून लढून सेवेत नियमित झाले होते. दहा- बारा वर्षे न्यायालयीन लढाईत गेली. त्या काळात वृत्तपत्र वाट, किराणा दुकानात काम कर, भाजी विक... असली कामे केली. वकिलानेही साथ दिली. एकतर तो डाव्या चळवळीतला होता अन् म्हणून साहेबांना घाबरणारा नव्हता. त्यांना दबेलही नव्हता. कामगार चळवळीचे काम तळमळीने करणारा असल्याने विकला जाण्याची शक्यता नव्हती. अखेर ही लढाई हे दोघे जिंकले. त्यांना सेवेत नियमित करावे लागले. पूर्वलक्षी प्रभावाने त्यांना त्यांचा दहा- बारा वर्षांचा नियमानुसार पगारही द्यावा लागला. साहेबांसारख्या मातब्बर नेत्याच्या संस्थेविरुद्ध लढताना खूप कष्ट करावे लागले. त्यातून हे दोघेही घोटून घोटून तयार व्हावे तसे झाले. त्यांना कायदेही पाठ झाले अन् साहेबांच्या शैक्षणिक अन् इतर संस्थांच्या पसाऱ्यात कोण कसे, कुणाला कसे मॅनेज करायचे हे देखील त्यांना कळलेले. कामगार कायद्याची कलमंही पाठ.

''हिरामण पाणी आण...'' असं कुणी आदेशात्मक भाषेत बोललं की हिरामण किंवा नारायण त्याला ''आमी पानी भरुन ठिवलं हाय. कामगार कायदा १३१ ड नुसार टेबलवर पानी आनून द्याले वाटरमन असते...''

असं हे सांगणार. कुणी बोलावून ''हा कागद नेऊन दे...'' असं म्हटल्यावर कागद किंवा पाकिट घेतील पण तो घेऊन तसाच आपल्या टेबलवर नेऊन ठेवतील. थोडावेळानं सांगणाऱ्याला कळायचं आपण दिलेला कागद योग्य त्या व्यक्तीकडे पोहचलेला नाही. तो विचारायचा, ''नारायण कागद नेऊन दिला नाही का?''

''जोऱ्यानं इचाराचं कारन नाही. तुमीनं कागद देलता, कोनाजवडं न्याचा हे कुठी सांगलं?''

''अरे पण तुला वाचता येत नाही का?''

''वाचता आलं असतं त तुमच्यावानी साहेब नसतो झालो का?''

''अरे पण वाचून नेऊन द्यायचं ना...''

''चपराश्याले वाचता याले पाह्यजेन असं कोन्या कायद्यात लेहलं हाय साहेब?''

आता एवढा वाद घालण्यापेक्षा आपलं काम आपणच करुन घेणं शहाणपणाचं असल्याचं त्या कर्मचाऱ्याला कळायचं. त्यामुळे हिरामण अन् नारायण यांच्या नेतृत्त्वात चपराशीपुरा असल्यावर ऑफिसमधली कामं बिनबोभाट चालायची. त्यांना कामे सांगण्यापेक्षा स्वावलंबन बरे, हे साऱ्यांना कळले असल्याने अन् हे दोघेही बेइलाज असल्याने सारे आपली कामे जमेलतेवढी करुन घ्यायचे. उरलेली नवे चपराशी करायचे. हिरामण आणि नारायण हे चपराश्यांची विद्यापीठं होती. नवा चपराशी आल्यावर काही दिवस तो फारच कष्टाने कामे करायचा पण काही दिवसांनी तो हिरामण किंवा नारायण यापैकी एक विद्यापीठ जॉइन करायचा अन् मग तो देखील दुपारी अडीच ते साडेतीन गायब असायचा. कुणी विचारले तर थेटच सांगायचा, ''जेवाले गेलतो...''

''जेवायला म्हणजे?''

''म्हनजे आठ तासाच्या ड्युटीत एक तास जेवन न रेस्टचा

अनुक्रमणिका

असतेच.'' असा नियम तो नवा चपराशी सांगायचा म्हणजे त्याने या दोनपैकी एक विद्यापीठ जॉइन केले हे समजून घ्यायचे. हिरामण आणि नारायण एकमेकांच्या प्रभावक्षेत्रात घुसखोरी करायचे नाही. आपसात त्यांची बोलाचालही अत्यंत तोकडी म्हणावी अशीच होती. पण एकमेकांच्या मागे मात्र ते एकमेकांविषयी वावगं बोलायचे नाही. आपल्यात फूट दिसली तर त्याचा हे गैरफायदा घेतील, हे त्यांना माहिती होते. आता मात्र हिरामण ऑफिसला आल्या आल्या नेहमीची कामे आटोपून तंबाखू दाढेत कोंबल्यावर त्यांन खुर्चीकडे पाहिलं साहेबांच्या. थोडं मागे रेलून पाय पसरवीत हात मागे नेत ''अरे, च्या आन घरचे मान्स हायत...'' असं म्हणण्याची साहेबाची अगदी खानदानी अदा होती. हिरामणला क्षणभर मोह झाला, खुर्चीत बसावं, बसूनच घ्याव साहेबांच्या खुर्चीत... कोणी पाहीलं तर? आता कोन पाहते बहीनमाय... पन सांगता येते का भाऊ? या अफीसात कोन कवा कोनाले लावन काहीच सांगता येत नाही... पन या टायमाले त आपूनच हाव ना, कोन नाही पाह्यनार...

हिरामणचे असे टूबी ऑर नॉट टुबी सुरू झाले. नारायनले याले टायम हाय अजूक... म्हंजे तसा थो आलेला असते या टायमाले हफीसच्या आवारात पन ड्यूटीवर तो अगदी काट्यावर काटा चढते... असा विचार करत हिरामणनं आजुबाजूला नीट पाहून घेतलं. अजूनतरी ऑफीसला कुणी आलेलं नव्हतं. हिरामण मग हळूच साहेबांच्या त्या खुर्चीत बसला. थोडा आक्रसला होता. साहेबांच्या खुर्चीत बसण्याची एक वेगळी अनुभूती चाचरत चाचरत तो घेत होता. कसलातरी आवाज झाला असे त्याला वाटले अन् तो दचकून उभा झाला. खुर्ची थरथरत राहिली. कुणीच नव्हते, आपणच घाबरलो. वरच्या फॅनचा आवाज झाला. पहिल्यांदा प्रेयसीचा हात धरतानाही घशाला कोरड पडली असते अन् अवघे अस्तित्त्व भितीनं गारठलेलं असते तसंच काहीसं हिरामणंच झालं होतं. त्यानं उभ्या जागेवरुनच पाहील, अजूनही कुणी आलेलं नव्हतं. आता मात्र तो अधिक आत्मविश्वासानं खुर्चीत बसला. मागे रेलला. त्यानं डोळे मिटले... अन् तो वेगळ्या दुनियेत गेला. तो साहेब झाला. मागे रेलत त्यानं हात वर नेले. पाय पसरले. बेल दिली. समोर साहेब चपराश्याच्या वेशात येऊन उभे राहिले.

''किती टायम?'' तो कुऱ्यातच म्हणाला. साहेब दीनवाणे हसत खाली बघत राहिले. ''चाल च्या आन अन् पानी नाई ठिवलं का पेला भरुन?''तो दरडावत म्हणाला. साहेब आपले, ''आन्तो ना जी...'' म्हणत केबीनच्या बाहेर सटकले. आणखी बरेच काही करता यण्यासारखे होते. खास म्हणजे सिन्हा मॅडमला केबीनमध्ये बोलावून जरा दाटायचे होते पण तेवढ्यात टिचक्या ऐकू आल्या. 'आनंद पोटात माह्या मायीना...' म्हणत राऱ्या येत होता. हिरामण मग सटकन् उभा झाला. नारायण तेवढ्यात आलाच तिथे. थरथरणारी खुर्ची अन् चेहरा सामान्य करण्याची कसरत करीत उभा असलेला हिरामण पाहून नारायण काय समजायचे समजला.

''काय म्हन्त? आज लवकर आला का?'' हिरामण आवाजातली थरथर शांत करण्याचा प्रयत्न करत म्हणाला.

''टायमावरच आलो.'' त्याच्याकडे रोखून बघत नारायण म्हणाला. तो आपल्याकडे असा का बघतो आहे, असा विचार करुन हिरामणच्या चेहऱ्यावर जरा मुजोरीचे भाव आले. म्या का चोरी केली का?

''एकलाच होतास हे बरं झालं...'' नारायण खास लहजात म्हणाला. खरंतर त्या खुर्चीत बसून पाहण्याचा विचार त्याच्याही मानत येऊन गेला होता. हिऱ्यानं डाव साधला बेट्यानं... असा विचार करत तो त्याच्या कामाला गेला. ऑफीस गजबजलं. नेहमीसारखं कामाला लागलं. मोठे साहेब तर नव्हते आज पण दर्शन, जय दोन्ही धाकले मालक होते. दर्शन साहेबांच्या केबीनची बेल वाजली. हिरामण आत गेला.

''किरण हाय का त पहा न पाठव...''

हा बाहेर आला. किरण जागेवर नव्हता. तेव्हा त्याला कळलं की आपल्याला का सांगितलं ते. फोन वाजवला असेल दर्शन साहेबांच्या सेक्रेटरीनं पण इकडून काही प्रतिसाद नसेल म्हणून आपल्याला सांगितलं. याचा अर्थ आपण किरणला शोधायचं आहे. मोठे साहेब नाही म्हणजे का यानं यायचंच नाही का ऑफिसला? कारण तो साहेब असले की त्यांचा पीए असायचा नसले की मग जिथे गरज असेल तिथे क्लर्क म्हणून काम करायचा. सहसा तो संस्थेच्या शाळेचा क्लर्क म्हणून काम बघायचा. दर्शन साहेबांच्या मिसेस देवीका मॅडम ही शाळा बघायच्या. हिरामणनं तिकडे जावून पाहीलं. किरण तिकडेही नव्हता. मग त्यानं गेटवर विचारलं, किरण आला होता का? तो आलाच नव्हता. सुरक्षा अधिकाऱ्याने मग सांगितलं की त्याचा अपघात झालाय्.

''ॲडमिट आहे तो तिकडे...''

काय झालं, कसं झालं... हे काहीच माहीती नव्हतं त्यालाही नीट. मग हिरामणनं त्याचा नाद सोडला. किरणच्या मोबाइलवर फोन लावून पाहिला. त्याच्या भावानं तो उचलला. सगळी हकिकत कळली. हिरामण तडक दर्शन साहेबांच्या केबीनकडे गेला. सिन्हा मॅडमला सगळे सांगितले.

दुपारी जागेश्वरजीचा निरोप आला. ''जागेश्वर साह्यब

अनुक्रमणिका

बलावतेत तुमाले.'' एक ज्युनियर चपराशी सांगता झाला. जागेश्वरजी नुकतेच किरणला भेटून आले होते.

''बसा हिरामणरावऽऽ'' ते म्हणाले. आजचा स्वर अधिक जवळचा, समानता दाखविणारा होता. जागेश्वरजी तसे फार साहेबी थाटात वावरत नव्हते तरीही त्यांच्या या मैत्रीपूर्ण वागण्याने हिरामण थोडा सावधच झाला. समोरच्या खुर्चीत तो बसला.

''रीलॅक्स... आता तुले बसाचंच हाय खुर्चीत.'' ते म्हणाले. हा भयानकच दचकला. आपण साहेबांच्या खुर्चीत बसलो याची काडी त्या नाऱ्यानं केली की काय? त्यानं पाहिलं नव्हतं पण अंदाज नक्कीच आला होता नाऱ्याला...

''नाही, तुमी बसा म्हनलं म्हून बसलो.'' हिरामण उठत म्हणाला.

''अहो नाही हो हिरामणजी... मी नेहमी म्हनतो ना का मानसानं काही सिकून घेतलं त वाया जात नाही. तुमी केस लढत असतानी दहावी, बारावी केलं. काम्प्यूटरबी सिकले. आफिसात काहीबी वातावरन असीन तुमच्या बद्दल... थे जावूद्या पन तुमी मधंमधं किरनले मदत करता त्याच्या कामात...'' जागेश्वरजी बोलत होते.

''अं, तेच्यात का, आपून सिकलो तर त्याचा फायदा नोको का व्हाले पाह्यजेन? न साहेब आपून लढलो आपल्या न्यायासाटी. याचा अर्थ हे संस्था आपली दुस्मन हाय, साहेब आपले शत्रू हाय असं नाही. तुमी आपले अन्नदाते हायत. न्याय भेटला, आपला झगडा संपला. कामात कई कुचराई करतच नाही ना आपून...'' हिरामण म्हणाला.

''म्हूनच त किरन आता तीनेक महिने येनार नाही. कामाचे दिवस हायत. आता ऐन टायमाले किरनच काम करू सकनारा, जाननारा मानूस आनाचा कुठून?'' जागेश्वरजी हा प्रश्न करुन थांबले. अर्थात त्यांचे बोलणे पूर्ण झालेले नाही. प्रश्न विचारुन त्यांनी एक विराम घेतलाय. उत्तरही तेच देणार आहेत, हे हिरामणला माहिती होते. तरीही त्याने ''होव ना...'' एवढा प्रतिसाद दिला.

''राजनभाऊ, सिन्हा मॅडम न मी चर्चा केली. तुमचं नाव निंघालं. तीन मयने तुमाले किरनचं काम करा लागीन.'' असं म्हणून ते थांबले. हिरामणनं चमकून पाहिलं न मग त्याच्या डोळ्यात असंख्य प्रश्न तरळलेले जागेश्वरनी पाहिले. निस्तच काम कराच का, पगारई थोच मियन का, तसी लेखी आडर मियन का...

''दर्शन मालकबी म्हने हिरामन हो म्हनत असीन त योग्य काम होइन...''

''थे सब बराबर हाय...''

''पन, तीन मयन्याच्या डेप्युटेनशनचं पत्र देऊ, येचा अर्थ पगार भेटन थोच न रेकार्डबी बनन ना तुह्या नावाचा...'' त्याला तोडत जागेश्वरजी म्हणाले.

''कई पासून?''

''आत्ता पासून...पत्र तयार हाय. हे घे, न सही कर.''

''म्हंजे उद्यापासून...''

''ह्या डरेस घालून येन्याची गरज नाही...'' जागेश्वरजी हसत म्हणाले.

हिरामण त्यांच्या कक्षातून बाहेर पडला. आता ऑफिशिअली नारायणला हे सांगितले जाणारच. कारण त्याला चपराशी विभाग मग एकट्याने सांभाळायचा तीन महिने. तरीही आपण आपल्याकडून हे सांगून टाकले पाहिजे...

''नारायन चाल तुले दोसा खावू घालतो.'' हिरामण म्हणाला.

''बाप्पा! लाटरी लागली का?''

''तेच्यासाटी लाटरी कायले लागा लागते? अबे, तीन मयने माहं प्रमोशन झालं हाय. मी किरनचं काम करनार. म्हनलं पयले तुले सांगाव. काहूनका आपून जे भोगलं ते कोनीच नाही भोगलं ना अठी...'' हिरामण हे सगळं सांगत असताना नारायणसारखा साहेबांच्या त्या खुर्चीकडे बघत होता. हिरामणच्याही ते लक्षात आलं. केवळ दहा मिनिटेही नसेल बसलो आपण या खुर्चीत तर एकदम तीन महिन्यासाठी का होइना पण आपण क्लर्क झालो. तेही थेट साहेबांच्या हाताखाली... नारायणकडे बघताना हे जाणवत होतं की तो देखील हाच विचार करतोय. साला नाऱ्या नक्की बसणार या खुर्चीत. आता तर आपणही नाही. आपला धाक होता. आपण दहाच मिनिटे बसू शकलो. हा तर दुरुस्तीला जाण्याआधी कितीहीवेळ बसू शकतो... बापरे! म्हंजे ह्या सायाचा बसन या खुर्चीत अन्...

हिरामणनं नारायणला, ''खाली कँटीनमध्ये सगळ्यांना घेऊन जा, मी येतोच''असं सांगितलं अन् तो जागेश्वरजीकडे पळाला.

''या, याऽऽ बाबूसाहेबऽ'' जागेश्वरजीनं हसून स्वागत केलं. ''पत्र घेतलं का सिन्हा मॅडमकडून?''

''घेऊ ना तेच्यात का हाय?''

''मंग लगबग कायची?''

''माह्या डिपार्टमेंटच्या मान्सायले पार्टी... थेबी नाही पन एक सांगाचं हाय, थ्या दिसी तुमी म्हने का साहेबाची खुर्ची दुरुस्तीले

टाकेवरी तठी ठेवली हाय...''

''होव, मंग तेचं का अठी?'' जागेश्वरजीनं तंबाखूची डबी काढून टेबलवर ठेवली. हिरामणनं काय ते ओळखून तंबाखू घोटणं सुरू केलं. ''चूना पाहून घ्या...'' असं म्हणत त्यानं तळवा जागेश्वरजींसमोर धरला. तंबाखूच्या उग्र दर्पानं ते किंचीत मागे सरले.

''त खुर्चीच म्हनत होतो साहेबाच्या. तुमी म्हने चुकूनही बसू नोका तेच्यावर. आता मी नाही तिकडं तीन महिने...''

''अच्छा, त मंग? नारायन हाय ना?''

''सकायच्या टायमाले कोनीच नसते. नारायनच बसला त?'' हिरामण म्हणाला. त्यानं तळव्यावर तंबाखू पाखडला. चुना झाडून टाकला. परत त्यावर बोट चोळू लागला. जागश्वरजीनं त्याच्या चेहऱ्याचा अदमास घेण्याचा प्रयत्न केला.

''नारायन बसलं म्हनतं?'' ते म्हणाले.

''आता नाहीच बसनार याची तुमी खात्री देऊ सकता का?'' हिरामणनं गुगली टाकत स्वतःची सोडवणूक करुन घेतली. मग थोडावेळ थांबत तोच म्हणाला, ''नारायनले आपला समजन्याची चूक करू नोका. माहं काही बिघडत नाही. थो माह्यासी वाईट वागत नाही पन तो तिकडं राजेनबाबूकडं जावून बसते. आता तुमी मले ह्या चानस देनार हे त्याले आधीच कसं समजलं असीन?'' हिरामण म्हणाला. त्यावर जागेश्वरजी विचार करत राहिले. त्याचा फायदा घेत हिरामणनं नारायणचा आणखीच बंदोबस्त केला. ''आता अस्या गोष्टी बोलाव नाही पन तुमच्या बद्दल आपुलकी वाटते म्हून बोलतो... होव, आपल्याले जे वाटते ते आपून खुलेआम कबुल करतो. तुमी गावाच्या राजकारनात रस घेत हात, हे साहेबावरी कसं पोहचलं असीन? मी बोललो राजेनसाहेबाले का जागेश्वरची त्याहीच्या गावचे सरपंच झाले त साहेबाच्या राजकारनालेच बळकटी येनार का नाही? आता थे साहेबाचे राजकीय सल्लागार न त्याहीचे सल्लागार आपले नारा... जाऊद्या तोंड नका उघडू साहेब माहं. तुमाले काहीच नाही माहीत कोन कसे हायत त.'' त्यानं घोटलेला तंबाखू जागेश्वरजीला दिला. त्यांनी तो तळहातावर घेत सारखा केला अन् मग ओठावर पंजाचा तळ ठेवत तंबाखू दाढेत ओतला. तंबाखूची चिमूट यानंही तोंडात टाकली. राजेनबाबू पत्रकारिता सोडून इकडे आल्यापासून आपलं महत्त्व कमी झालं असं जागेश्वरजीला वाटत होतं. त्यामुळे जागेश्वरजी नेहमी संशयानं पछाडलेले असायचे. याचा फायदा हिरामणनं घेतला. ''ते जावूद्या, राजेनबाबू आताच डमी खासदार हायतच...'' असं म्हणत त्यानं जागेश्वरजीच्या जखमेवर मिठ चोळलं. ''पन आता ते खुर्ची सांभाळा. लकी हाय ते. तेच्यावर नाऱ्या बसला त काहीनाही पन त्यानं राजेनबाबूले...'' उगाच वाईट बोलू नये म्हणून हिरामणनं आपल्या तोंडावर हात ठेवला. ''जावूद्या...सालं आपून लहान मान्स...'' असं म्हणत त तिथून सटकला. सगळ्या चपराशी विभागाची आलूबोंडा-तर्री वाली पार्टी झाली. चहा झाला. ते परत वर आले. अडीच ते तीन असा लंच अवरच होता. वर येत नाही तोच जागेश्वरजींचा कॉल वाजला मोबाईलवर.

''कोनी नाही ना आजुबाजूले?'' त्यांनी विचारले.

''नाही, बोला ना...'' हिरामण म्हणाला.

''मी का म्हनत होतो का थे खुर्ची इकडं माह्या केबीनमंध आनून ठेऊ का?''

''एकत आदीच ते इकडं ठिवाले नोती पाह्यजेन. आता तुमी थे तुमच्या तिकडं नेली त चर्चा व्हईन.''

''मंग आता? ते तिथंच ठेवाची न बसू द्याचं कोनालेबी?'' जागेश्वरजी त्या खुर्चीवर राजेन बसला अन् झालाच साला आमदार त का करा, या भीतीनं पछाडले होते.

''नाही, सिनम्यात दाखवतेत जुन्या वाड्यातलं पुरानं फर्निचर पांढऱ्या चादरीनं झाकून ठिवतेत. तसं करू. तुमी मले आडर द्या सर्वासमक्ष, म्हंजे मी करुन घेतो...''

एकतर कॉलेज- शाळा प्रवेशांची गडबड. त्यात सार्वत्रिक निवडणुकांचा माहोल सुरू झाला होता. त्यामुळे ती खुर्ची सोहबांच्या खास विश्वासातल्या पी. बालू अँड कंपनीकडे दुरुस्तीला टाकण्याचे काम तितके प्राध्यान्यक्रमाचे राहिले नव्हते. त्यातल्या त्यात पी. बालू तिरुपती करुन त्याच्या केरळातल्या गावाकडे गेला होता. जागेश्वरजीनं ठरल्याप्रमाणे आदेश दिला, ''हिरामन, उद्यापासून तिकडं जॉईन व्हाच्या आदी साहेबाची हे खुर्ची झाकझूक करुन ठिवा.'' त्यांनी हे नारायणसमोरचं सांगितलं. मग हिरामणनं अगदी साळसुदपणे पांढऱ्या चादरी आणून त्या नारायणच्या मदतीनंच त्या खुर्चीला बांधल्या. बांधताना ही काळजी घेतली की सहजी कुणाला तरीही त्यावर बसता येऊ नये अन् बसलेच कुणी तर लक्षात यावे...

साहेबांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसाचा अभिष्टचिंतन सोहळा दणक्यात झाला. दिनेशबाबूंनी खास पुढाकार घेतला. दिनेशबाबू म्हणजे सगळ्याच पक्षांच्या नेत्यांना खिशात ठेवणारे प्रस्थ होते. विभागाचे सांस्कृतिक क्षेत्र बाबूंनी पुरते वेढून टाकले होते. साहेबांच्या मित्रपक्षात ते होते. दोन्ही पक्ष आघाडी करुन सरकारात होते. दिनेशबाबू म्हणजे तोंडात खडीसाखर अन्

डोक्यावर सतत थंडगार तेल चोळूनच असतं. आपल्या खिशातून कवडीही न काढता मोठे सत्कार समारंभ घडविणे, पुरस्कार वैगरे देणे यात त्यांचा हातखंडा होता. साहेबांकडून त्यांनी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष करुन २५ लाख रुपये काढले होते. तेव्हाच साहित्य संमेलनाच्या समारोपाच्या कार्यक्रमात बोलताना दिनेशबाबूंनी या अमृतमहोत्सवी सत्काराचे सुतोवाच करुन टाकले... ''साहेबांबद्दल काय बोलायचं, ते एका हाताने दान करतात ते दुसऱ्या हाताचा माहिती होऊ देत नाहीत...'' सभामंडपात समोरच बसलेल्या साहेबांकडे बघत दिनेशबाबू म्हणाले, ''तुम्ही रागवाल साहेब मला पण आता मला हे सांगू द्या की या संमेलनासाठी तुम्ही २५ लाख रुपयांची देणगी दिली. त्याची साधी चर्चाही केली नाही. स्वागाध्यक्षपदाची माळही त्यांनी माझ्या गळ्यात घातली. लोक चाराणे देत बाराणे वसुल करतात साहेब रुपया देतात अन् चर्चाही करत नाही. परत श्रेय माझ्यासारख्या एखाद्या फाटक्या कार्यकर्त्याच्या झोळीत टाकतात निरपेक्षपणे. इतकं सगळं करुन हा माणूस साहित्यिकांच्या व्यासपीठावर राजकारणी कशाला, असा सवाल करत खाली बसतो. तुकोबांशी ज्यांनी नाळ वर्तनाने जुळली आहे, अशीच माणसे इतकी नम्र असू शकतात. मी साहेबांना विनंती करतो की त्यांनी या व्यासपीठावर यावे... आयोजकांची, साहित्यिकांची अन् खास म्हणजे इथे जमलेल्या लाखभर रसिकांची ही विनंती आहे...''

टाळ्यांच्या कडकडाटात साहेब व्यासपीठावर गेले. अशी खास एन्ट्री अन् सत्कारही. साहेबही सुखावून गेले. साहेब स्थानापन्न झाल्यावर दिनेशबाबू परत बोलते झाले...

''स्वत:ला कायम कार्यकर्ता समजणाऱ्या अशा कृतीशूर नेत्याचे आपणही काही देणे लागतो, याची नम्र जाणीव जनतेने ठेवली पाहिजे. साहेब माझ्या मित्र, स्पर्धक पक्षातले नेते आहेत पण मला वडिलांसारखेच आहेत. येत्या सप्टेबर मध्ये साहेबांची पंच्याहत्तरी येते आहे. ते तयार होणारच नाहीत पण आपणा सर्वांच्या साक्षीने मला साहेबांना एक गळ घालायची आहे की त्यांनी अमृतमहोत्सवा निमित्त हा नागरी सत्कार स्वीकारावा. त्या संदर्भात उद्या या ठिकाणीच सर्वपक्षीय कार्यकर्त्यांची एक बैठक आयोजित केली आहे. सत्कार समिती आणि स्मरणिका समिती स्थापन करुन आतापासूनच कामाला लागू...'' टाळ्यांचा कडकडाट झाला. एका कोपऱ्यातून सुरू झालेल्या टाळ्या सभामंडपभर पसरल्या. ''हा खऱ्या अर्थाने नागरी सत्कार आहे, हे हा प्रतिसादच सांगतो आहे. मी देतो पैसे अन् करा माझा सत्कार, साहेब या गटातले नेते नाहीत. त्यामुळे सत्कार कोष उभा करू. प्रत्येकाने त्यात एक रुपया टाकला तरी हरकत नाही...'' परत टाळ्या. दिनेशबाबूंनी पुढचा कार्यक्रम ठरवला अन् कमाईचे साधनही, अी कुजबूजही झाली. आता ते कधी कुणालाही या सत्कारासाठी पैसे मागू शकतात अन् कुणी किती पैसे दिले हे कुणालाच कळत नाही, त्याचा हिशेबही होत नाही. परत दिनेशबाबूंच्या प्रतिष्ठानाकडूनच हा सत्कार आहे, असेच दाखविले जाते. 'अमृतमहोत्सवी नागरी सत्कार समिती' आयोजक उमेशबाबू स्मृति प्रतिष्ठान...

ते काय असो. सोहळा दणक्यात झाला. सर्वच पक्षाचे नेते व्यासपीठावर होते. चर्चा हीच होती की साहेबांनी या पद्धतीने आपली निवडणूक यावेळीही निर्वेध करुन घेतली आहे. खरेतर साहेबांनी सक्रिय राजकारणातून आता निवृत्त व्हावे अन् नव्या पिढीच्या हाती सत्ता द्यावी, अशी कुजबुजती मागणी होतीच. घरीच जेष्ठपुत्र दर्शनने मातोश्रींकडे ही कुजबूज केली होती. लहान्या जयला राज्यात अन् मला दिल्लीत नांदू द्यावे, असे त्याचे म्हणने होते. हेच असे वावरत राहिले अन् आता वय झाले आहे कधीही काही झाले तर आपले घराणे राजकारणातून उपटून बाहेर फेकले जाइल, त्यामुळे अण्णांनी त्यांच्या हयातीतच ती तजवीज करावी, असे दर्शनचे म्हणजे होते. मातोश्री सुमतीबाईंना देखील हे पटत होते. ''या सत्काराचे मायलेज हाय ना तो दिनेशबाबू घेऊन जानार. बाबा नाही लढले ना त तो बंडखोरी करुन उभा राहील...'' दर्शन म्हणाला होता. प्रत्यक्ष सत्काराला उत्तर देताना साहेबांनी घोषणाच करुन टाकली, ''खरा माझा पिंड समाजसेवेचाच. राजकारणाच्या माध्यमातून समाजसेवा का नाही करता येत, असा प्रश्न मला पडला अन् मी राजकारणात आलो. समाजसेवा करुन दाखविली. आता मात्र सक्रीय राजकारणाचा कंटाळा येऊ लागला आहे...'' असे म्हणत साहेबांनी बाजूला उभ्या हिरामणकडून नॅपकीन घेतला. घाम पुसला. पाणी प्यायले. अगदी वीसेक सेकंदही नसतील लागला वेळ या क्रियांना मात्र साऱ्या सभागृहाचा श्वास अटकला होता. ''मी निवडणुकीच्या राजकारणातून निवृत्ती घेत आहे. पक्षश्रेष्ठींना मी कळविले आहे की मी ही निवडणूक लढणार नाही. नव्या दमाच्या कार्यकर्त्याच्या खांद्यावर ही जबाबदारी टाकावी...'' असे म्हणून साहेब थांबले. हिरामण मागेच उभा होता. आता तो तीन महिने तरी किरणचे काम बघणार असल्याने तो साहेबांचा मतदारसंघातला पीए होता. त्याने साहेबांना जबरदस्त, असा इशारा केला. उपस्थितांना कळत नव्हते की टाळ्या वाजवायच्या की शांत बसायचे... साहेबच म्हणाले, ''अरे, क्रिकेटपटू निवृत्त होतो तर त्याला स्टँडिंग ओव्हेशन की काय म्हणतात ते देतात मग आज मी ही घोषणा केली तर किमान टाळ्या तर वाजवा...''

''काय आहे साहेब राजकारण्याच्या घोषणा म्हणून लोक

अनुक्रमणिका

विश्वास ठेवत नसतील...'' दिनेशबाबू म्हणाले. सभागृह गादगदून हसले. व्यासपीठावरची मंडळीच उभी राहून टाळ्या वाजवू लागली मग सगळे सभागृह उभे झाले. टाळ्या दहा मिनिटे वाजतच होत्या. साहेबही गहिवरले. नंतरचे भाषण त्यांनी असे केले की सभागृहाच्या डोळ्याला अश्रूंचे पाझर फुटले...

नारायणं त्या झाकून ठेवलेल्या साहेबांच्या खुर्चीकडे बघत होता. खुर्ची झाकण्याचे आदेश नेमके आताच का देण्यात आले, हे न समजण्याइतका तो काही भोळा नव्हता. एक त साल्या हिऱ्यानं खुर्चीवर वसून सोताचा फायदा करुन घेतला. आता थाटात फिरुन राह्यला साहेबांसोबत. आज साहेबाच्या सत्काराच्या कार्यक्रमात साला मांग उभा व्हता. टिव्हीत साहेब दिसले की ह्या दिसेच. सारखा कानासी लागत होता सायबाच्या. म्हंजे असं दाखवत होता का साहेबाचा तो किती खास हाय थे... अस्वस्थ चाळा म्हणून नारायणनं खिशात हात घातला. त्याला खिशात ठेवलेली केव्हा बांधून आणलेली पानंच लागली. राजनसाहेबाची पानं... मॉलीश केल्यावर डोकं तसं सणाणत धावू लागतं ना तसं डोक्यात रक्त सळसळू लागलं. तो पानं घेऊन राजनसाहेबांच्या केबीनकडे गेला. जाताना त्यानं त्यांना कॉफी पाठविली की नाही, हे पाहून घेतलं.

राजनसाहेबांनी कॉफीचा कप खाली ठेवला अन् नारायण पोहचला. त्यानं पानाचा पुडा समोर धरला. जर्दा दरवळला.

''ऑहाऽऽ नारायणऽऽ'' राजनसाहेबांनी पान तोंडात टाकलं अन् दाद दिली.

''येतानीच आनून ठेवले होते सर पानं पन आता एकदम खयाल आला.'' नारायण म्हणाला.

''चांगला आहे तुझा हा खयाल.''

''पन तुमचा कुठीच खयाल नसते ना...'' नारायण पुटपुटला.

''काय, काय, काय म्हणालास?''

''नाही, म्हनजे आजच्या साहेबाच्या सत्काराच्या कार्यक्रमात कुठी दिसले नाही स्पष्टपने तुमी...'' आता या 'स्पष्टपने'वर त्यानं असा काही झटकेबाज जोर दिला की राजनासाहेबासारख्या पत्रकार राहिलेल्या राजकारण पंडिताच्या ते फटकन् जाणवलं.

''हंऽऽ होतो ना. अगदी पहिल्याच रांगेल होतो.''

''जागेश्वरजी स्टेजवर कोनट्यात उभे होते अन् हिरामन त सायबाच्या कानाशीच लागून होता. सायबानं घोसना केली निवडनूक न लढाची न तुमिबी आश्चर्यान पाहत राहिले... टिव्हीवर दिसलं आपल्याले हे...''

''हो खरंय्, मलाही धक्काच बसला साहेबांनी तसली घोषणा करुन टाकल्यावर...''

''हे आयकून मले ज्यादा धक्क बसला हाय. साहेबाची राजकीय सल्लागार तुमी न तुमाले न इशारता साहेब असी घोसना करुन टाकते याचा अर्थ समजते का तुमाले?'' नारायण म्हणाला. राजन थोडा अस्वस्थ होत खुर्ची मागे सरकवून भिंतीला डोके टेकवून बसला.

''हे पहा साहब तुमी आल्यापासून मोठ्या साहेबाच्या दरबारात कोनाचंतबी महत्त्व कमी झालं होतं. कोन ते तुमाले मालूम हाय. त्यानं पद्धतशीर गेम केला. हिरामनले साहेबाचा केला पीए. तुमचा पत्ता साफ...'' नारायणनं आणखीच स्पष्ट केलं प्रकरण.

''मग काय करू म्हणतोस?''

''आत्ता! आमाले सल्ला मांगता का?'' असं म्हणत नारायणंनं खिशातून तंबाखूची डबी काढली. मग जिभ चावत परत ती आत ठेवू लागला. राजननं डोळ्यानंच त्याला खाना तंबाखू, असं खुणावलं. तंबाखू घोटत तो म्हणाला, ''साहेबाची ते लकी खुर्ची बाहेर काढून ठिवली हाय दुरुस्तीले टाकाची हाय. हिरामन दोन मिन्टच बसला असीन त तीन मयन्यासाटी क्लर्क झाला. आता थे खुर्ची अल्लद जागेश्वरजीकडं जाइन... बांधून ठेवली हाय ना पांढऱ्या कपड्यात.'' नारायणानं परत पांढऱ्या कपड्यात, हा शब्द असा काही उच्चारला की त्यातून मर्तिकाचाच वास यावा. राजन थेट उठला. सहज फेरफटका मारावा तसा निघाला. तिकडे चपराशीपुऱ्याकडे गेला. अचानक भडकला.

''काय हे??'' त्यांन विचारलं. त्याचा तो अवतार पाहून तिथला एक चपराशी चाचरत म्हणाला, ''साहेबाची खुर्ची हाय मोठ्या...''

''ते कळते मला पण ही अशी पांढऱ्या कपड्यात गुंडाळून ठेवली?''

आता यावर नेमके काय उत्तर द्यावे हे त्या नव्या चपराशाला कळत नव्हते. तिथून जाणारा हिरामणच थांबला. त्यानेच उत्तर दिले.

''जागेश्वरजीच म्हणाले तेव्हा मीच इथून जाण्याआधी हे काम करुन गेलो...''

''आता काय बोलणार ना आपण? पांढऱ्या कपड्यात केव्हा बांधतात कळते ना? साहेबांनी सक्रिय राजकारणातून निवृत्ती जाहीर केली याचा अर्थ त्यांची खुर्ची अशी पांढऱ्या कपड्यात

बांधून ठेवायची? उद्या तुम्ही अंतयात्राही काढाल या खुर्चीची.'' राजनने कमालीचा संताप आणला होता. नेमका नेमका काय प्रकार आहे याचा अंदाज घेत तिथेच थांबण्याचा हिरामणचा विचार होता मात्र एकतर ही जागा दर्शन साहेबांच्या केबीनच्या जवळ होती. दर्शन साहेबांचे अन् राजन साहेबांचे चांगले संबंध होते. नारायण कुठे दिसत नव्हता. ही आग त्यानेच लावली असण्याचीच जादा शक्यता होती.

''जागेश्वरजींनी का सांगितले कळत नाही मात्र मला तो पांढरा कपडा खटकतो आहे...'' असे म्हणत राजन तिथून जात असतानाच नारायण अगदी काहीच माहिती नसल्यागत तिथे आला अन् त्याचे ते बोलणे ऐकून त्याने पांढरी चादर काढून टाकली. सगळेच म्हणू लागले, ''बराबर हाय, साहेब राजकारण नाही करनार म्हनजे त्यायले खुर्चीच नोको का?''

त्याचवेळी दर्शन आला. जाताजाता थांबला, काय प्रकार आहे? बाबांची खुर्ची? दुरुस्तीला का नाही टाकली मग? कारणही कळले. राजन अन् दर्शन साहेब बोलत बोलत त्यांच्या केबीनकडे गेले.

''काय झालं राजन, इतका का कल्ला केलात तुम्ही?''

''ठरवून केला साहेब मी तो. साहेबांची ती खास खुर्ची आहे. लकी खुर्ची. म्हणजे सम्राज्ञीला बाजारात बसवायचं बाजारबसवी म्हणून अशीच तिची गत केली. साहेबांचं सिंहासन ते. तो हिरामण चपराशी दोन मिनिटे काय टेकला त्या खुर्चीत तर तीन महिन्यासाठी कारकून झाला. तोही साहेबांचा थेट पीए... तेही निवडणूक जवळ आली असतानाच्या काळात.'' राजन म्हणाला.

''तो हिरामण खुर्चीत बसला बाबांच्या?''

''हे बघा, आता चिडण्यात काही अर्थ नाही. चपराश्यांच्या तिकडे ती नेऊन टाकल्यावर त्यावर ते बसून पाहणारच... तो बसला हे आपण सिद्ध करू शकत नाही. आणखी कुणी बसेल तर त्यांना रोखूही शकत नाही, पण ती खुर्ची खरेच लाभी आहे. तो दोन मिनिटे बसला तर कारकून झाला. आता साहेब निवडणूक लढणार नाही म्हणताहेत. अनेकांचा त्यांच्या या जागेवर डोळा आहे. लढाई आता होणार आहे...''

''अनेकांचा डोळा आहे म्हणजे? अरे! आम्हीच त्यांचे खरे वारस आहोत. त्यांची खासदारकीची जागा आम्हालाच मिळणार...''

''मग ती खुर्ची अशी मोकळी का ठेवता? दुरुस्तीलाच टाकायची असेल तरी...'' राजननं सूचक बोलला. दर्शनसाहेबांना ते नीट कळलं. राजन मग निघून गेला. त्याला साहेबांचे भाषण तयार करायचे होते. एका वर्तमानपत्रासाठी साहेबांची खास मुलाखत तयार करायची होती. साहेबांच्या सत्कारानिमित्त आलेल्या सर्वच पत्रांना उत्तरे द्यायची होती...

दर्शन साहेबांनी संध्याकाळी जाताना सहज सांगावं तसं सांगून टाकलं, ''नारायणऽऽ''

''होजी मालक...''

''ती बाबांची खुर्ची अशी उघड्यावर नको. माझ्या केबीनला ठेव...'' थोडा थांबून ते म्हणाले, ''हो, मला कळतं की अडचण होइल पण ती बाबांची मानाची खुर्ची आहे. जपायला हवी...' असं म्हणून दर्शन साहेब निघून गेले. नारायणला विलक्षण संताप आला.

'साला तो हिरामन सोता बसला अन् आता माहा वकत आला होता त असी खेळी खेळला. त्याच्या बापाचं काही खाल्लं होतं का म्या? आता हे खुर्ची एकदा का दर्शन साहेबाच्या हाती गेली का मंग काही आपल्याले भेटत नाही.' असा विचार करत तो स्वत:शीच म्हणत राहिला, काहीतबी करा लागते... राहू द्यावी का आताची इथेच? उद्या असे सांगू की विसरलो होतो. सगळे ऑफिसच्या बाहेर गेल्यावर आपण त्यावर बसून घेऊ... पण, त्याला माहिती होतं की दर्शन साहेब घरी पोहचण्या आधी रस्त्यात थांबून परत फोन करुन विचारणार, ''ठेवली का खुर्ची?'' त्यापेक्षा आधीच ती त्यांनी सांगितली तिथे ठेवावी...

...आजच चान्स आहे. सगळे जाण्याची वाट बघावी अन् मग हळूच बसून घ्यावे खुर्चीत.

पण, आज त्याला ते शक्य दिसत नव्हते. हिरामण साहेबांसोबत कुठे दौऱ्यावर असता तर शक्य होत पण आज साहेब दिल्लीला गेले होते आणि हिरामण ऑफिसलाच होता. तो काही आपल्याला तशी संधी मिळू देणार नाही... आता पाच वाजतच आले आहेत. त्यानं वळसा घेऊन कॅरीडॉरमध्ये पाहिलं. लांबवर पसरलेल्या कॉरीडॉरमध्ये अनेकांच्या केबिन्स होत्या. त्या या एकाच जागेवर उभे राहून पाहिलं की दिसायच्या. अरेच्चा! आज देवीका मॅडमची केबीन कशीकाय सुरू आहे? देवीका मॅडम गेले सहा महिने तरी इकडच्या या ऑफिसला येत नव्हत्या. असल्याच तर त्या मुंबईत असायच्या किंवा मग साखर कारखान्याच्या कॉलेजवर... या साहेबांच्या चुलत सुनबाई. साहबांचे लहान भाऊ जयवंतचा मुलगा सुमंतची ही बायको. जयवंत अचानक साप चावून मेला. त्यानंतर त्याची विधवा बायको अन् हा सुमंत यांचा सांभाळ साहेबांनी केला. सुमंत बापासारखाच शेतीवरच पडून असायचा. म्हणजे रानातली त्यांची शेती होती. तिथे मोठा वाडाही होता जुना. तिथेच सुमंत राहायचा. लग्न झाल्यावर तो गावातल्या वाड्यावर

राहू लागेल, असे सगळ्यांना वाटले होते. सगळ्यांना चूक ठरवीत तो रानातल्या शेतीत असलेल्या वाड्यावरच राहिला होता. देवीका सारखी देखणी बायको भेटूनही हा करंटा असे का वागतो, म्हणत सारा गाव हळहळायचा. देवीकाने मात्र सुरुवातीचे सहा महिने वाट पाहण्यात घालविल्यावर थेट साहेबांना गाठले, ''तुम्हाला माहिती होतं ना की हा असा आहे म्हणून मग माझं लग्न का लावून दिलंत?'' तिनं साहेबांना विचारलंच.

''हा असा आहे म्हणजे कसा?'' साहेबांनी शांतपणे विचारलं.

''मी कशी आहे?''

''तू सुंदर आहेसच...''

''मग माझ्यासारखी सुंदर बायको असूनही हा रानात राहात असेल तर त्याला काय म्हणायचे?'' तिने विचारले.

''हं, त्या अर्थाने तो असा आहे हे हे मला माहिती असण्याचे काही कारण नाही.''

''मग आता मी काय करू?''

''तू करशील तेवढं कमी आहे. इतकी कामं आहेत अन् करणारं कुणीच नाही...'' साहेब म्हणाले. त्यांनीच मग तिला कॉलेजकडे लक्ष ठेवायला सांगितले. साखर कारखान्याचा कारभार तिच्या हाती दिला. देवीकाबाई पण हुशार. सगळ्या गोष्टी तिनं आगोटून घेतल्या. सोबत साहेबांचे मुंबई आणि दिल्ली देखील ती सांभाळायची. पहिल्या वर्गातला मुलगा होता. लग्नानंतर पहिल्याच वर्षी तो झाला. तो अगदी साहेबांसारखाच दिसतो... असं लोक म्हणायचे. त्याच्याचमुळे सुमंत रानात निघून गेला, आधी तो नीट वागायचा पण त्याला सत्य कळले, आपल्या काकाने आपल्यासाठी बायको नाही तर स्वत:साठी...

लोक काय वाट्टेल ते बोलायचे पण हे मात्र खरे की साहेबांचा देवीकाबाईंवर जीव होता. युवराज ग्रुप मध्ये या बाईंचं खूप वजन होतं. साहेबांचं [illegible]जकारण बाईच नेणार पुढे...

नारायणला एकदम कल्पना सुचली. तो बाईंच्या केबीनकडे गेला. पाणी ठेवलं. रुम फ्रेशनर मारलं. बाई प्रसन्न हसल्या.

''ताई तुमीनं आल्याच आत्ता समजलं बघा मले...''

''नारायणराव, मी आलेच आत्ता...'' त्या म्हणाल्या.

''कॉफी आनू का?'' नारायण म्हणाला.

''आणा...'' नारायण बाहेर आला. त्यानं तिथूनच खूण करुन कॉफी बोलावली. कॉफी घेऊन तो गेला. ''इतक्या लवकर?''

''होव ना. आता हिरामनबी नाही तबी कामं झटापट होतेत.'' तो म्हणाला.

''हिरामण... हं, अच्छा तो बाबांसोबत दिसतो अलीकडे.''

''बाकी जावू द्या पन किमान या हफिसात का होते येच्याकडे लक्ष असू द्या कारनका अठी जे होते तेच्यावर साहेबाचं राजकारन कुठी जात हाय, हे समजते.'' नारायण म्हणाला.

''तुम्ही म्हणता ते खरंय नारायणराव.'' बाई म्हणाल्या. ''साहेबांनी निवृत्ती जाहीर केली हे साऱ्यांना नवीन होतं, इथे मात्र माहिती होतं म्हणतात साऱ्यांना...''

''माईत गी नोतं पन एक अंदाज होता. त्याहीही खुर्ची ते आपली लकी खुर्ची दुरुस्त कऱ्याले कहाडली बाह्यरं. त्या खुर्चीवर बसून जे सत्तेचं पद मांगलं ते भेटलं म्हने साहेबाले.''

''तर मग?''

''मग का, दर्शन साहेब सकायी म्हनले मले, बाबांची खुर्ची माह्या केबीनला ठेव. आलं का काही ध्यानात? आदी जागेश्वरजीनं ते खुर्ची झाकून ठेवली. राजनबाबूनं थे खुली कऱ्याले लावली. मंग त्याहीचं न दर्शन साहेबाचं बंद दाराआड का बलनं झालन मालूम नाही पन दर्शन साहेब म्हने खुर्ची माह्या केबूनले ठेव...'' तो काय सांगतोय अन् कशासाठी सांगतोय, हे देवीकाला कळत होते.

''आता कुठे आहे दर्शन?''

''लहान मालक त गेले मंघाच बाहेर...'' नारायण म्हणाला. तेवढ्यात देवीकाचा मोबाईल किणकिणला. पलीकडून एक पत्रकार होता. ''साहेब निवडणूक लढणार नाहीत मग त्यांचा हा वारसा कोण चालविणार? कुटुंबातच म्हणजे दर्शन साहेबांनाच साहेबांची ही जागा मिळावी, असे त्यांच्या परिवारातील सगळ्यांचे मत आहे, हे खरे आहे का?''

''मी अजून साहेबांशी या विषयावर काहीच बोलली नाही. मी त्यावर काहीच बोलणार नाही.''

''दर्शनबाबू आगे बढोच्या घोषणा सुरू झाल्या आहेत...''

''तसे असेल तर त्यावर काय तो निर्णय साहेबच घेतील...'' देवीका म्हणाली. दर्शनच का? मी का नाही? पत्रकारांना राजकीय अंदाजच बांधायचा असेल तर माझं नाव त्यांच्या डोक्यात का येत नाही? साहेबांची खुर्ची दर्शनच्या केबीनकडे सरकते आहे...

''नारायणराव, साहेबांची खुर्ची माझ्या केबीनला आणून ठेवा. काय आहे की दर्शनला त्याची अडचण होइल अन् मी तर नसतेच जवळपास या ऑफिसला. त्यामुळे मला काहीच त्रास होणार नाही. तुम्हाला हवी तेव्हा तुम्ही ती काढूनही नेऊ शकता.'' हे सांगण्यात मनात काहीही डाव नाही, हे अगदी निष्णातपणे चेहऱ्यावर दाखवीत देवीका म्हणाली.

''ज्यमते, ज्यमते...'' नारायण म्हणाला. त्याला काय म्हणायचे आहे ते देवीकाला कळले. ती हसली. त्यानं ती खुर्ची ढकलत आणून देवीकाच्या केबीनला आणून ठेवली.

''मी दर्शनशी बोलून घेऊन या संदर्भात...'' जाताना ती म्हणाली.

विलास मानेकर च्या व्हीएम ट्रायव्हल एजन्सीच्या कार्यालयाजवळ त्याची लँड क्रूझनर येऊन थांबली. तसे हे नावालाच कंपनीचे ऑफिस होते, विलास मानेकरचे ते जनसंपर्क कार्यालयच. दणकट शरीर आणि हटेला दिमाक हे विलासचे भांडवल होते. मारामाऱ्या, गुंडगिरी करता करता तो साहेबांचा कार्यकर्ता झाला. मग अगदी खास कार्यकर्ता झाला. पालिकेत निवडून आला. नगराध्यक्ष झाला. पालिकेचे सत्ता त्याच्या हाती होती. सध्या तो विरोधपक्ष नेता होता पण सत्ता त्याच्याच हाती होती. हा केव्हाही मारू शकतो म्हणून कुठलाही अधिकारी त्याला वचकून असायचा. त्याचे काम आधी व्हायचे. लोकांची कामे तो अशीच करायचा.

''भाऊ तो देवतळे काम नाही करुन रायला भाऊ, मोजमापाचे काम होते नुसते...''

''हाय का फोन? लाव साल्याले...'' फोन लावला की हा देवतळेला शिवीगाळ करत थेट ऑक्सीजनवरच ठेवायचा.

''साल्या काम नाही केलं तर तिथ्थं येऊन मारीन...'' ही त्याच्या काम करण्याची पद्धतच होती.

साहेबांचा निवडणुकीचा प्रचार सगळाच विलासच्या हातात असायचा. साहेबांचा तिसरा मुलगा, असेच म्हणायचे सगळे त्याला. त्याचे दर्शनशी बिनसले नव्हते पण दोघांनीही सुरक्षित अंतर ठेवले होते. दर्शन पब्लिकमध्ये उतरुन काहीच करू शकत नाही, हे साहेबांनाही माहिती होते अन् विलासला देखील. दर्शन परिषदेवर निवडून गेला. विधानसभेची तिकिट विलासच्या वाट्याला आली होती. तो थोडक्यात पडला. साहेबांच्या विरोधकांनी विलासला साथ दिली नाही. विलास एकदा निवडून आला की मग इथली आमदारकीची सीट तो पुढच्या पाच-सात निवडणूकांपर्यंत काही सोडत नाही, हे साऱ्यांना माहिती होते. साहेबांनीच त्याला पाडले, असाही काहींचा अंदाज होता. त्याला आमदारच करायचा होता तर परिषदेवर नसता का केला? पण विधानसभा दिली अन् पाडले की मग तो काही वर्षे तरी तोंड वर काढत नाही. पुढच्या निवडणुकीत लहान जय तयार होतो. त्याला विधानसभेत पाठविण्याचा हा मार्ग होता. तेव्हा विलास ओरड करू शकणार नव्हता. एकदा संधी दिली होती. साहेबांचा मतदारसंघातला कारभार विलासच बघत होता. आता मात्र साहेबांनी अचानक निवृत्ती घोषित केली होती.

विलासनं त्याच्या ऑफिसमधल्या गजानन महाराजांच्या मूर्तीसमोर दिवा लावला. डोळे मिटून नमस्कार केला. तो वळला तर समोर जय.

''बाप्पा! कोनाले हात जोडावं... समोर तुमी न वाजूले गजाननबाबा...'' विलास हसून म्हणाला.

''योग्यवेळी आलो. गजाननबाबांच्या आशीर्वादाची गरज आहेच आपल्याला अन् तुझ्या सहकार्याची.'' जय म्हणाला. जय अन् विलासचे तसे पटायचे. पालिकतले काही ठेके दोघांनी संयुक्त घेतले होते. मुंबईतही दोघे भागिदारीत कंपनी चालवायचे. म्हणजे किमान कागदावर तरी तसे होते.

दोघेही केबीनमध्ये आले. दार बंद करत विलासनं ओरडून सांगितलं, ''कोनाले येऊ नोको देऊ इकडं रेऽऽ''

''कसे का आले बा मालकलोक इकडे....''

''हे बघ मी तसा नेहमीच येतो. आता आल्याचे त्यामुळे वेगळे चर्चा करायला नको. हं, आलो मात्र यावेळी कामानंच.'' जय म्हणाला.

''मंग का हायत सांगाना...''

''बाबांनं त सांगलंच का आता लढत नाही. त्याहीची हे जागा आपल्याले पाहिजे. तेच्यासाटी तुहा पाठिंबा पाहिजे.'' जयनं एका दमात सांगून टाकलं. आता तोही मायची भाषा बोलत होता. विलासकडे असं येण्याची ही कल्पना मूळात हिरामणची होती. विलासच खऱ्या अर्थाने साहेबांचा राजकीय वारस होता. असं लोकच म्हणायचे अन् जनतेचं मत महत्त्वाचं. त्याच्याकडे जावून त्यालाच सांगायचं की बाबांची जागा मला मिळवून दे... कारण विलासचं तसं पक्षातही बऱ्यापैकी वजन, संबंध होते. जयच्या या पवित्र्याने विलास गोंधळला.

''आपून का करनार? आपून लहान मानूस... बरं, साहेब बोलले. मले नाई वाटत का ते खरंच थांबतील. पक्ष त्यायले थांबू देनार नाही. मले आश्चर्य वाटत हाय का तुमी त्याहीचा लेक असूनबी लगेच फसले या साऱ्यायले. थोडे थांबा. अंदाज येऊ द्या.'' विलास म्हणाला.

''मी बाबांशी बोललो. खरं सांगायचं म्हंजे मागच्या इलेक्शनलेच दर्शन मांग लागला व्हता का आता थांबा तुमी न मले म्हनजे त्याले चान्स द्या... हे इलेक्शन आले न आता चर्चा पुन्हा सुरू झाली. बाबा बोलले, आता मी निवडणुक नाही लढणार. आजवर ते असे नाही बोलले. मी बोललो त म्हने मी दिल्लीवरुन आल्यावर बोलू...'' जय म्हणाला.

''मी थेच म्हनत हाव ना का सायबाले दिल्लीहून येऊ देना...'' विलास म्हणाला.

''कमालच हाय. मी इतका उतावीळ अन् मूर्ख वाटलो का की तुह्याजोडं येनार? आपून आताच फिल्डींग नाही लावली त गेम हातचा जाइन...''

''तू आला म्हूनच मीपन आता तेच्यावर सिरीयसली इचार करत हाव.'' विलास म्हणाला.

मग जयने त्याला ऑफिसमध्ये सुरू झालेले राजकारण सांगितले. साहेबांची ती लकी खुर्ची अन् आता तिच्या दुरुस्तीच्या निमित्ताने ऑफिसला काय काय सुरू आहे हे देखील सांगितले.

''अच्छा! आता तुमच्या देवीका वह्यनीबी उत्सुक हाय म्हनता.'' विलासला हा नवाच साक्षात्कार होता.

''नाही त काय... वह्यनीसाहेबानं बाबांची खुर्ची त्याहीच्या केबीनमध्ये नेऊन ठेवली. ते पण दर्शनले डावलून.'' जय पोटतिकडकीनं सांगत होता. त्याला हेच म्हणायचे होते की दर्शन, देवीका वहिनी असे तगडे पहेलवान घरातच आहेत. त्यात जोगेश्वरकाका सारखा माणूसही छुपे खेळ खेळतो आहे. पक्षात आणखी कितीतरी लोक त्या दिवशी सभागृहातच खुश होताना दिसले. दिनेशबाबू हाच मोठा काटा आहे. त्यात माझा ठहराव कुठे होणार? ही साधार भीती त्याच्या बोलण्यात जाणवत राहिली.

''हं, ते खुर्ची मले महत्त्वाची वाटते. तेच्यावरुन आताच दर्शन न तुमच्या वह्यनीसाहेबाचं वाजलं असीन ना?'' विलासनं विचारलं.

''नाही वाजलं नाही पन दोघायनं लय प्रेमा प्रेमानं एकमेकायले मस्त धमक्या देऊन घेतल्या आहेत हसत हसत.'' जय म्हणाला. ''आता त्या खुर्चीले आपून हात घालनं म्हनजे...''

''काहीSSही होत नाही. दुरुस्तीला टाकाची हाय ना? मंग तेच्यावरुन घरात असे गैरसमज होन्यापरिस ते दुरुस्तीले नेऊन टाक.'' विलासनं चहा बोलावला. सिगारेट सिलगावली.

''म्हंजे सारा गाव बसून त्या खुर्चीवर अन् मी खरा वारस असून मीच नाही बसनार...''

''तिथून उचलं न माह्या ऑफिसच्या मांग माहं गोडावून आहे ना? तठी आनून ठेव. तुले वाटन तवा तेच्यावर तू येऊन बसत जा.'' थोडावेळ थांबून जयच्या चेहऱ्यावरची शंका वाचत विलास म्हणाला, ''मी नाही बसनार. माहा नाही इस्वास अस्या गोठीवर.''

''आमचा हाय ना पन, मले ते कांड आताच करा लागीन कामूनका थे बाई जावून बसली तेच्यावर का झाला ना तिचा बेडा पार... नाहीत तिच्या मांग आमच्या दर्शनदादोजीनं खुर्ची पुना आपल्या केबीनमंध नेली त झालंच.'' असं म्हणत जय तिथून तातडीनं उठला.

'दादासाहेब लढणार नसतील तर ही जागा आमच्या पक्षाला हवी' अशी बातमी त्या दिवशीच्या सर्वच वर्तमानपत्रात प्रकाशित झाली होती. मित्रपक्षाचे प्रदेशाध्यक्ष भाऊसाहेब ठाकरे यांच्या पत्रपरिषदेचे ते वृत्त होते. गणेश डेकाटेने ती बातमी वाचली. तो अगदी कसलेला राजकीय विश्लेषक. वार्ताहर होता. त्यानं दादासाहेबांना फोन लवाला.

''साहेब गणेश बोलतो.''

''बोला गणेशराव, काय म्हणता? दिल्लीत आहे मी...''

''तुम्ही काडी टाकून देता अन् मग गावाबाहेर जाता. इकडे गाव परेशान ना दादा...'' गणेश म्हणाला. हा गणेश चांगला राजकीय वार्ताहर आहेच पण सोबत जोडजंडतरही करत असतो. यावेळी त्याच्यासोबत कोण बसून असेल काही सांगता येत नाही याचा अंदाज घेत दादासाहेब जरा सांभाळूनच बोलत होते.

''काय बाबा, काय झालं आता? आता तर मी सक्रिय राजकारणातून निवृत्त झालो आहे...''

''तेच तर, आता तुमचा मित्रपक्ष म्हणतो की ही लोकसभा दादासाहेब लढणार नसतील तर आमच्या पक्षाला हवी...''

''ती त्यांची जुनीच मागणी आहे ना.'' साहेब म्हणाले.

''हो, पण तुमचं काय म्हणनं आहे?'' गणेशनं बोलणं सुरू ठेवलं.

''मी काय म्हणणारं? एकदा निवृत्ती जाहीर केल्यावर परत प्रवृत्तीपर असं का वागायचं? त्यांची ती मागणी आहे, त्यावर दोन्ही पक्षाचे श्रेष्ठी योग्य तो निर्णय घेतील ना.'' दादासाहेब म्हणाले. ''खरंतर या विषयावर तू श्रेष्ठींशी बोलायला हवे...''

''नाही, पण तुमच्या मनात कुणी उत्तराधिकारी आहे का?'' गणेशनं थेटच प्रश्न केला. ''किंवा, पक्षात कुणाला असं वाटत असे, ना की दादासाहेबांनंतर आपणच या जागेवर असायला हवं...''

''वाटू शकतं. वाटावंही. राजकारण काही निरीच्छ संतांचं काम नाही. मी मात्र कुणाचं नाव सुचविणार नाही.'' दादासाहेब सहज बोलल्यागत बोलले पण त्यांनी सूचकपणे सांगितलं होतं.

''दिनेशबाबूंना तुम्ही आपले मानसपुत्र मानता. आता ही जागा

अनुक्रमणिका

त्यांचा पक्ष मागतोय्, अशावेळी...''

''ही जागा त्यांच्या पक्षाकडे देण्याचा निर्णय झाला तर त्यांच्याकडून कुणाला उमेद्‌वारी द्यायची, हा त्यांचा प्रश्न आहे. दिनेशबाबूंना दिली तर किनवा नाही दिली तरी मित्रपक्ष म्हणून त्यांच्या उमेदवाराच्या मागे उभे राहणे आमचे कर्तव्य ठरते...'' दादासाहेब खूपच अंगाला तेल लावून बोलत होते. अगदीच सापडत नव्हते.

''देवीका मॅडम, दर्शन... यापैकी कुणी दावा सांगितला तर?''

''तो त्यांचा अधिकार आहे. या देशाचे नागरिक आणि पक्षाचे कार्यकर्ते म्हणून ते दावा सांगू शकतात...'' दादासाहेब म्हणाले.

''कोण कोण समोर येते, दावा करते हेच बघयाचे, असे तुम्ही ठरविलेले असेल अन् मग लावाल एकेकाची सोय...''

''तसे करण्याची मला काय गरज? मी लढतो म्हटले तर कोण नाही म्हणणार होते?''

''नाही पण, अधून मधून खुटा बळकट करायचा असतो ना...''

''तशी काहीच चाल मी खेळत नाही. आजची ती माझी गरजही नाही...'' दादासाहेब हसत म्हणाले. ''अन् तू माझ्या तोंडी नसती वाक्य घालून स्वत:चा अर्थ माझ्या डिस्काऊंटवर टाकू नको.'' असं म्हणत त्यांनी फोन ठेवला. दिनेशबाबूंनी सावध भूमिका घेतली. पक्षाला जागा अद्याप मिळायची आहे. ती मिळाली तर मग बरीच इच्छुक मंडळी असतील. आहेत. त्यांचे कामही माझ्यापेक्षा मोठे आहे त्यामुळे मी आजच कुठली मागणी करत नाही. पक्ष सांगेल तसा मी वागत असतो...

दादासाहेबांच्या पक्षाचे राज्य अध्यक्ष म्हणाले, ''दादासाहेबांशी पक्षपातळीवर अद्याप चर्चा व्हायची आहे. तरीही ही जागा म्हणजे आमच्या पक्षाचा गढ राहिला आहे. गेले चार टर्म दादासाहेबांनी तो राखला आहे. त्याआधी देखील ही जागा तशी आमच्याच पक्षाकडे होती. त्यामुळे ती आता दुसऱ्या कुणाला देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.'' झाले गणेशला कॉपी मिळाली होती. इच्छुकांच्या नावांसह दुसऱ्या दिवशी ही बातमी झळकली.

ती वाचत असताना बाबांच्या खुर्चीची झालेली पळवापळव दर्शनला अस्वस्थ करुन गेली. नाश्त्यासाठी जय अद्याप यायचा होता. आता ती खुर्ची आपल्या ऑफिसलाच नाही, हे कळल्यावर तर कमालीचा गोंधळला होता. मोबाईलवर बोलतच जय आला. बसल्यावरही तो मोबाइलवरच बोलत राहिला. दर्शनला देखील मिटींगला जायचे होते. त्यानं जयला खूण केली. एकतर तो आज उशिरानं नाश्त्यासाठी आला होता. त्यात हे असं घोड्यावर बसल्यागत घाई करत होता. आमदार आपण आहे अन् हा काहीच नसूनही उगाच ॲटीट्युड दाखवितोय्...

अखेर त्यानं मोबाइल ठेवला.

''इतका महत्त्वाचा कॉल होता का?'' दर्शनच्या आवाजाला धार होती. आता यावर काय बोलावे, असे अवघडलेपण जयनं दादखविले.

''मुद्दाम बोलत नव्हतोच ना मी...''

''डोन्ट बी इरीटेट... मी तसं काहीच बोललो नाही.'' दर्शननं त्याची रिकामी प्लेट बाजूला केली. अगदी जोरातच.

''उशीर झाला मला आज पण... एवढं चिडण्यासारखं काहीच नाही. कॉलेजच्या मिटिंगची सारीच तयारी मी काल करुन घेतली आहे. सिन्हा मॅडमकडे सगळे डिटेल्स आहेत. त्यामुळे तुला काही अडचण जाणार नाही...'' जय म्हणाला.

''हळू, हळू खा...'' दर्शन म्हणाला.

''हळूच तर खातोय्...''

''नाही घाई होतेय्... ठसका लागेल. छोट्यांनी छोटे घास घ्यावेत.'' दर्शनच्या बोलण्याचा नेमका अर्थ जयला कळला होता. त्यांच्या बायकांनाही. नाश्त्याच्या टेबलवरच तणाव निर्माण झाला होता. त्यांना तो नको होता, असे नाही पण इथे नको होता. दर्शनचे सासरे पश्चिम महाराष्ट्रात बडे नेते होते. माजी आमदार होते. त्यांच्या मुलाच्या हाती राजकारण देऊन ते आता संस्थांचा कारभार बघत होते. त्यांचीच इच्छा होती, आता दर्शननी दादासाहेबांची जागा घ्यावी... दादासाहेबांनी घोषणा केल्यावर जयचा सासराही सरसावला होता. दादासाहेबांच्याच मतदारसंघात आमदार होते विरोधी पक्षाचे ते मागच्या टर्मला. नंतर पडले होते. त्यांचे वडील फार पूर्वी याच मतदारसंघात खासदार होते... जयची उमेदवारी तिकडून आली होती.

''आज पेपरला आलेल्या बातमीचं म्हणत असशील तर जस्ट स्पेक्युलेशन आहे ते. तुझंही नाव आहेच त्यात.'' जय म्हणाला.

''हो, पण मी आहेच उत्तराधिकारी बाबांचा...'' दर्शन म्हणाला. आता सगळं थेट सुरू झालं होतं अन् दोघांच्या बायकांच्याही त्यावर तिखट प्रतिक्रिया दिसू लागल्या होत्या.

''मग गणेशसारख्या बड्या पत्रकाराला मी देखील त्यांचा उत्तराधिकारी आहे, असे वाटले असेल. दर्शनला आमदारकी दिली आहे, त्याला राज्यात मंत्री करुन लहान्या जयला दिल्लीचे

अनुक्रमणिका

राजकारण करू द्यावे, असे दादासाहेबांना वाटत असेल... असे त्या वातमीतच लिहिले आहे.''

''बातम्या कशा लिहिल्या जातात ते कळतं मला. ते जावू दे, बाबांची खुर्ची?''

''हं, त्या बयेच्या केबीनमध्ये जाण्याऐवजी ती दुरुस्तीलाच टाकावी, म्हणून नेऊन टाकली मी ती.''

''विलासकडे? तो देखील दावा सांगतोयू, बाबांच्या जागेवर. ते पण वातमीत आहे या...''

''मला वाटतं दादा आपण उगाच वाद घालत आहोत. उद्या बाबा येतील. दिल्लीतच आहेत ते...

दादासाहेब दिल्लीहून आले. नंतरचा प्रत्येक दिवस त्या लोकसभा मतदारसंघाला गदागदा हलविणारा होता-

निवडणुकीचा माहोल गरम झाला होता. विरोधी पक्षही संभ्रमात होता. छुटपूट उमेदवारांचे अर्ज दाखल करणे सुरू झाले होते. दादासाहेबांचा मुलगा जय हा विरोधीपक्षात जाणार, हा बातमीच खळबळजनक होती. त्यानेच तशी घोषणा केली होती.

''बाबांचे राजकारण वेगळे, माझे वेगळे. बाबा आता निवृत्त झाले आहेत. त्यांच्या पक्षाकडून उमेदवारी मी मागणार नाही. माझे वडिलबंधू मागतात काय, त्यांना ती भेटेल का, हा प्रश्न आहे. भेटली तर माझी काहीच हरकत नाही. दर्शनने मुलाखतही दिली आहे. मी दिली नाही. मला लोकसभाही लढायची नाही. त्यामुळे लोकसभेच्या तिकिटासाठी मी इकडे आलो, असे नाही. मला या पक्षाची तत्त्वं पटली. वडिलांच्या कृपेने नव्हे तर स्वकर्तृत्त्वावर नेतृत्त्व उभे करावे म्हणून मी माझा हा मार्ग स्वीकारला आहे. बाबांचे आशीर्वाद मी घेतले आहेत. जयनं प्रेसला हेच वक्तव्य दिलं.

दोन दिवस आधीच नरसापूरच्या साहेबांच्या फॉर्महाऊसवर जयचा सासरा अण्णासाहेब अन् साहेबांमध्ये चर्चा झाली होती. साहेब उभे राहणार नाही मग अण्णासाहेब त्यांच्या पक्षाकडून उमेदवारी मागतील... खरेतर अण्णासाहेब आले होते जयला तुमच्या पक्षाकडून तुमचा उत्तराधिकारी म्हणून उमेदवारी द्या, अशी मागणी घेऊन. दादासाहेबांनी ''जय अद्याप लहान आहे. त्याला खालचं राजकारण कळू द्या. तुम्ही का नाही लढत? आम्ही सपोर्ट करतो. तुमच्या मतदारसंघात आमदारकीसाठी तुम्ही जयला पुढे करा.'' अण्णासाहेबांचे डोळे चमकले. जय विरोधी पक्षात जाइल. तिथे तो येत्या विधानसथेला आमदारकी मागेल. अण्णासाहेबांनी ही लोकसभा लढायची. जयचे त्यांच्या पक्षात असणे पुरेसे बोलके असेल. त्यामुळे दादासाहेवांची मते त्यांना मिळतील...

दादासाहेबांची दुरुस्तीला काढलेली खुर्ची विलासकडून नेऊन ती अण्णासाहेवांच्या खास असलेल्या एका मेकॅनिककडे टत्तकल्या जाणार म्हणून जयने ती स्वतः गाडीत टाकून नेली...

दादासाहेबांची ही खुर्ची मी दुरुस्त करुन देतो अगदी चकाचक, असे म्हणत दिनेशबाबूंनी ती खुर्ची जयकडून नेली. मला तर लढायचे देखील नाही, मी रेसमध्येच नाही. माझा काहीच राजकीय स्वार्थ नाही, असे सांगत ही खुर्चीमाझ्याकडेच सुरक्षित राहील, असे दिनेशबाबू म्हणाले.

जयचे पक्षांतर हा दोन दिवस चर्चेचा विषय होता. लोकसभेची ही जागा मित्रपक्षाला द्यायची नाही, असा निर्णय दादासाहेबांच्या पक्षाने घेतला. तसे नसते झाले तर दिनेशबाबूंनी त्यांच्यासाठी पूर्ण फिल्डींग लावली होती. दादासाहेबांच्या पक्षाकडून पंडितकाका काकडे, पक्षाचे राज्य अध्यक्ष ठाकरे उत्सुक होते. काकडेंच्या कारखान्यात पाच वर्षांपूर्वी एका महिलेचा जळून मृत्यू झाला होता. ते प्रकरण अचानक परत चर्चेत आले. तो खूनच होता अन् काकडेंच्या मुलाने तो बलात्कार करुन केला, असा आरोप नव्याने करण्यात आला होता. दादासाहेबांनी त्यावर प्रतिक्रिया दिली. ''मला नाही वाटत काकडे असे वागतील. योग्य ती चौकशी होऊन ते निर्दोष असलेल्याचे सिद्ध होइलच पण पक्षाने वाद टाळून उमेदवारी द्यायला हवी...''

ठाकरेंना दिल्लीकरांनी एवढेच विचारले, ''खासदार मोठा की मुख्यमंत्री?'' नंतर ठाकरे गप्प बसले. साहेबांच्या पक्षाकडे सक्षम उमेदवारच नाही...? बातमी आली की दिनेशबाबू बंडखोरी करणार. साहेबांच्या पक्षाकडून कुणीही उभे राहो, ते मित्रपक्षाकडून बंडखोरी करणार. पक्षाने काढून दिले तरी बेहतर... खरेतर त्यांना ही बंडखोरी करण्यात पक्षश्रेष्ठींचेच बळ आहे, असाही अंदाज असणारी बातमी आली. साहेबांच्या पक्षाकडून विलासचे नाव समोर आले. तरुण, तडफदार आहेच शिवाय साहेबांच्या मर्जीतला आहे. म्हणजे लढत आता अण्णासाहेब, दिनेशबाबू आणि विलास यांच्यात रंगणार...

साहेबांची खुर्ची दिनेशबाबूच्या गोडाऊनला होती. केवळ खुर्ची नेली तर माणूस रेसमध्ये आला... विलासने ती खुर्ची रात्री गडाऊन फोडून पळविली. सांग म्हणा, काय चोरी झाली ती. बातमी एवढीच होती, दिनेशबाबूंचे गोडाऊन फोडले.

तिकडे दर्शन बाबूनी फॉर्म टाकून ठेवला. पक्षाने आदेश दिला म्हणून डमी फॉर्म टाकून ठेवला, एवढेच दर्शन म्हणाला.

''हिरामणऽऽ'' साहेबांनी हाक मारली. हिरामण अलीकडे साहेबांसोबतच असायचा चोवीसतास. घरी देखील गेला नव्हता गेल्या महिनाभरात.

''जी साहेब...''

''पेपर वाचले का?''

''साहेब मले वाटते का दिनेशबाबूले आपल्या पक्षात आनलं पाहिजे आपून...'' गेल्या काही दिवसात साहेब हिरामणच्या राजकारणकौशल्यावर कमालीचे खूष होते. तो त्यांचा राजकीय सल्लागारच झाला होता. त्याच्या या एकाच वाक्यावर साहेबांची ब्रह्मानंदी टाळी लागली. नंतरच्या दोन दिवसात ही धक्कादायक बातमी-

दिनेशबाबू साहेबांच्या पक्षात जाणार. साहेबांचा उत्तराधिकारी ठरला, दिनेशबाबू...

दिनेशबाबू मुंबईला जाणार. तिथे पक्ष प्रवेश घेणार. नंतर मतदारसंघात येऊन फॉर्म भरणार. दोन गोष्टी झाल्या, दर्शनने तर पक्षश्रेष्ठींना विल्ड्रॉल देखील लिहून दिला होता. त्याला शब्द मिळाला, निवडणुकीनंतरच्या फेरबदलात मंत्रीपद...

विलासचा मात्र ही दिनेशाबाबूच्या संभाव्य उमेदवारीची बातमी ऐकून तोल गेला. त्याने विरोधी पक्षाशी संधान साधले अन् बातम्या आल्या की तो देखील दिनेशबाबूंच्याच दिवशी मुंबईतच विरोधी पक्षात जाणार...

दिनेशबाबूंचा पक्षप्रवेश झाला. पक्षाचा एबीफॉर्म जिल्हा मुख्यालयात साहेबांच्या हस्ते मिळणार. उद्या सकाळी दहा वाजता फॉर्म भरायचा आहे, हे दिनेशबाबूंना रात्री नऊला सांगण्यात आले. विमानाची तिकिटं तातडीने मिळाली नाहीत. ट्रेन सगळ्या निघून गेल्या होत्या. साहेबांचाच फोन आला, ''दिनेशबाबू पुण्याला जा. तिथे माझ्या उद्योगपती मित्राचे हेलिकॉफ्टर मिळेल... मी सोय केलीय्.''

दिनेशबाबूंना वाटले साहेब किती काळजी घेत आहेत. दिनेशबाबू पुण्याला गेले. रात्रीचे तीन वाजून गेले होते. त्यांना सांगण्यात आले, ''आराम करा, सकाळी सातला हेलिकाफ्टर खास तुमच्यासाठीच निघेल. सहा तासात तुमच्या मतदारसंघात...''

जीवात जीव नव्हता. सकाळी नऊ वाजून गेले तरीही हेलिकाफ्टरचे कळत नव्हते. साहेबांना फोन केला तर ते म्हणाले, ''निघेल, काळजी करू नका. उदयनजींच्या आईची प्रकृती बिघडली रात्री...''

संध्याकाळी पाचच्या आधी पोहचायचे होते. कसेबसे एक वाजता हेलिकाफ्टर निघाले. आपण सकाळी दहाला पोहचायचे म्हणून मुंबईतून निघालो... आजचीही तिकिटं नव्हती विमानाची.

एकला निघालो तरी पाचच्या आत नक्की पोहचू... साहेब म्हणाले, पॉझेटिव्ह विचार करा. व्वा! गाव दिसतेय आपले. आता लँडींग... पायलट मात्र इथेच फिरवतोय हेलिकाफ्टर. का? राष्ट्रपतींचा दौरा आहे म्हणे... देवाऽऽ

अखेर साहेबांवरच दबाव आला, यावेळी तुम्ही लढा. दिनेशबाबू तर हवेतच लटकले होते. एबी फॉर्म साहेबांनाच स्वीकारावा लागला. 'पक्षाचा आदेश शिरसावंद्य!' म्हणत साहेबांनी तो स्वीकारला. अण्णासाहेब अन् विलास दोघांनीही विरोधीपक्षाकडून फॉर्म भरले. दोघेही मीच अधिकृत उमेदवार, असा दावा करत होते. पक्ष आपली भूमिका जाहीर का करत नाही, म्हणून अण्णासाहेब कासावीस झाले होते. त्यांचे पक्षनिरीक्षक पाहणीसाठी आले. मुंबईला जावून निर्णय देऊ म्हणाले. (साहेबांसोबत त्यांचे सेटींग झाले, अशी चर्चा होती.) पक्षश्रेष्ठीतच भांडणे लागली, हा म्हणे अण्णासाहेबांचा फॉर्मच खरा, तो म्हणे विलासचाच खरा...

अखेर अण्णासाहेबांनी फॉर्म मागे घेतला अन् विलासचा फॉर्म चुकीचा आहे म्हणून निवडणूक आयोगाने रद्द ठरविला.

हिरामणने दादासाहेबांची खुर्ची दुरुस्त त्यांच्या स्वाधीन केली. ती त्यानं चादरीत झाकतानाच तिथून काढली होती. चादरीत मग डमी खुर्ची झाकली गेली होती.

साहेबांवर प्रचाराचाही ताण आला नाही... काही कारणच नव्हते.

हिरामण पंचायत समिती सभासद झाला नि पहिल्याच टर्म मध्ये सभापती देखील. साहेब आले होते त्याच्या पदग्रहणाला. तेव्हा त्यांना जुनं काही आठवलं का ते माहिति नाही. त्यांना लहान लहान गोष्टी आठवत नाही. ते आता केंद्रात ग्राम विकास मंत्री आहेत!

❚ श्याम पेठकर
वत्सल अपार्टमेंट,
७६, इन्कटटॅक्स कॉलनी,
प्रताप नगर, नागपूर- ४४० ०२२
भ्रमणभाष : ८५५४९८२६७७

अनुक्रमणिका



।। सात कविता ।।

दासू वैद्य

■

लाल रंग बर्फ गोळ्यावरचा

महाराष्ट्र दिन
कामगार दिन
शाळांचे निकाल
असे झेंडे फडकवत
उगवला एक मे

प्राथमिक शाळेसमोर गर्दी
पालकांची आणि निरागस पोरांची,
वडिलांची आधाशी नजर
नुकत्याच मिळालेल्या गुणपत्रकात,
मुलगा टक लावून ˙ तोय
आईस्फ्रूटवाल्याच्या बर्फगोळ्याकडे

आता गुणपत्रिका झाली
रेसकोर्स मैदान,
प्रत्येक रकान्यात मुलाची पिछाडी
वडिलांचा चेहरा उतरलेला,
मुलाच्या चेहऱ्यावर मात्र पसरलाय
लाल रंग बर्फ गोळ्यावरचा
तो केव्हाचा उभा आहे
बर्फगोळ्याच्या गाडीला खेटून •••

एक मरणासन्न


एक मरणासन्न
पडून आहे खाटेवर,
एकीचा एवढ्यातच
बंद पडेल श्वास
आणि तिला पोचवायला
चौघेजणही हजर नाहीत,
धर्माच्या नावाखाली
एक कुस्करली नराधमांनी,
सूर्याची किरणं तोलून धरणाऱ्या
घनदाट सावलीत
ज्या नाचत होत्या आदिम तालावर
त्या चेंगरल्या गेल्या
काळाच्या अजस्र पायाखाली,
वैमनस्यातून काहींना पेटवलं गेलं
दिवसाढवळ्या,
काही घुसमटल्या
राजाश्रयी महावस्त्रात
उलट काही क्षुद्र होऊन
बसून राहिल्या व्यवस्थेच्या पायाजवळ,
गुदगुल्या करून मनसोक्त रडवणं काय
किंवा वापरून रस्त्यावर भिरकावणं काय
घडलं मात्र इथं राजरोस,
एकीला तर सोवळ्यात ठेवूनच
विधवा केलं,
कॅन्सरग्रस्त अवयवासारख्या
काही पोगरल्या आतून
इथे... तिथे... सर्वत्र
......
नाही,
हे मी नेहमीप्रमाणे
बायकाबद्दल बोलत नाहीय
मी बोलतोय
बायका उद्या जिच्या आधाराने
व्यक्त होऊ शकतील
त्या भाषेबद्दल... •••

अनुक्रमणिका

समवयस्काच्या दारासमोर

अर्थाच्या गर्द सावलीत
पहूडलेले शब्द
नसतात उत्सुक
सांत्वनाच्या अंगणात यायला
मग आपण नुसतेच स्तब्ध राहतो
दिवंगताच्या दारासमोर,
थोडी माणुसकी
थोडा शिष्टाचार
कधी शेजारधर्म
म्हणून आपण रेंगाळतो
मेलेल्या माणसाच्या अंगणात,
पण कोणी समवयस्क गेल्यावर
जरा जास्तच रेंगाळतो आपण,
रडून थकलेल्या
समवयस्काच्या बायकोचा चेहरा
अचानक आपल्या बायकोसारखा
दिसू लागतो,
शोकाचा केंद्रबिंदू होऊन
झोपलेल्या समवयस्काची मुलं
काहीतरी हरवल्यासारखे
आतबाहेर करतायत
तेव्हा या मुलांच्या चपला-बुटांत
आपल्या मुलांचे पाय
सहज बसतील याचा विचित्र अंदाज
डोक्यात चमकतो,
आपल्याही नाका-कानात
कापसाचे बोळे असल्यासारखं
वाटू लागतं,
चितेत निवांत झोपलेला
विधीवत पेटवला जातो,
चारही अंगांनी पेटलेल्या चितेत
भुरूभुरू जळू लागतो समवयस्क

अंग मात्र आपलं गरम होतं. •••



बायका बसल्यात फतकल मारून

झाडझूड झालीय,
भाकऱ्याही झाल्यात बडवून,
रटरट शिजलेलं अन्न खाऊन
पुरुष जगरहाटीला घराबाहेर पडलेत
पिळलेलं धुणं दोरीवर झोके घेतंय
पोरं-सोरं खेळून-थकून ओसरीवर पेंगतायत
धान्य निसून-टिपून दळण तयार आहे
तुळसही पुजून झालीय

असं काही काही झालेलं नाहीय
तरीही बायका बसल्यात ऐन रस्त्यात फतकल मारून

कुठल्याशा पुतळ्याची विटंबना झाली
म्हणून त्या नाहीत बेभान झालेल्या
कुठल्याशा ग्रंथात राष्ट्रपुरुषाबद्दल
अवमानकारक मजकूर छापलाय म्हणून
त्या नाहीत संतापलेल्या
जाहीर सभेत ज्ञातीसंदर्भात
अनुचित उद्‌गार काढले गेले म्हणून
त्या नाहीत रस्त्यावर उतरलेल्या,
त्या आहेत पारोशा
पण नाहीत हौशा-गवशा

त्यांना असुर मर्दिनी अवतार संबोधून
नका होऊ कृतकृतार्थ
त्यांच्या हातात नाहीत रूढ अर्थाने कुठलेच विजयी शस्त्र
त्या केव्हाच्या
हातात पाण्याची रिकामी भांडी घेऊन बसल्यात
ऐन रस्त्यात फतकल मारून •••

अनुक्रमणिका

मी कित्येक दिवसात

मी कित्येक दिवसात
लिहिली नाही कविता

म्हणजे ती दार वाजवत राहिली
आणि मी उघडलच नाही असं नाही
तर कित्येक दिवसापासून
ती फिरकली नाही
माझ्या घरासमोरच्या रस्त्यावरूनही

कोरी कागदं भरपूर आहेत फडफडणारी
पेनांची आग्र शिवशिवतायत उमटण्यासाठी
तरी मी लिहिली नाही कविता

प्लॅस्टिक वेचणाऱ्या मुलीसारखा
शब्द शोधीत नाही फिरलो

घटनांच्यामध्ये होत्या जाणवत
अनेक शक्यता
अनुभव तर छतावरून पाल पडल्यासारखे
रपरपले अंगावर

दिवा लावून एकटाच बसून राहिलो
डोळे मिटून निवांत पडून राहिलो

खिडकीबाहेर पाहून झालं
शब्दांचं आभाळ भरून आलं
तरी आली नाही कविता

पेपरवाला
कचरेवाला
दूधवाला
घरचे-दारचे
सगळेच वाजवत राहिले दार

पण कागदावर उमटावेत पायठसे
अशी पावलं वाजलीच नाहीत दारात

कित्येक दिवसात
मी लिहिली नाही कविता •••

हे अभागी दिवस

आमच्या कुळातला
कोण पापी माणूस मुतलाय खळखळ झऱ्यात
म्हणून आम्हाला
स्वच्छ वाहतं पाणी नजरेलाही पडत नाहीय
नदीची खणा-नारळानी
ओटी भरत राहिलो
नदीही येत राहिली
माहेरवाशीण लेकीसारखी,
अंगावर तरंग खेळणारं
तुडुंब पाणी नांदलंच नाही कधी
तळ्याला मोजपट्ट्या लागल्या
नदीची वाळूसुद्धा उपसून नेली
धनदांडग्यांनी,
उपचाराच्या शोधात
जखमी माणसाला खांद्यावर घेऊन
फिरल्यासारखे
रिकामे हांडे घेऊन
पाण्याच्या शोधात अनवाणी पाय
ज्यांच्यात काही विकत घेण्याची
ताकदच निर्माण होऊ शकली नाही
त्यांनी पाच रुपयाला
हंडाभरून पिण्याचं पाणी विकत घ्यावं
हे एकेक दिवस जिवंत राहण्याची
परवानगी घेतल्यासारखं
विहिरीतल्या चिमूटभर
पाण्याभोवती वळवळणारे पोहरे
दगडी शस्त्र हातात घेऊन
शिकारी मागं पळणारा
नंगा माणूसच आवृत्त होतोय
टँकरमागं पळणाऱ्या माणसाच्या निमित्तानं
लागू नयेत मुंग्या म्हणून
कोरड्याठण्ण डोळ्याने
धरून ठेवलेली ओल
त्यात तडफडतायत
हे अभागी दिवस •••

अनुक्रमणिका




पोस्टकार्ड

वयाच्या पंचाहत्तर
पायऱ्या चढून आल्यावर
कुरकुरू लागले वडिलांचे गुडघे,
भयाण पसरलेल्या शहरात
पूर्वीसारखे गाठता येईनात
त्यांना इप्सित ठेपे,
सवयीच्या लोकांजवळ
सहानेवर गंध उगाळल्यासारख्या
मारायच्या असतात त्यांना गप्पा,
उगाळलेला दैववाद
भक्तिभावे कपाळी लावल्यावर
थोडे स्थिर होतात थरथरते हात,
नाकाने पाणी पिणाऱ्याकडे पाहावे
तशा उत्सुकतेने पाहतात लोक
या जमान्यात
पोस्टकार्ड लिहिणाऱ्या वडिलांकडे,
पोस्टमनच्या समजुतदारपणावर
विश्वास ठेवून वडील
सुचेल तसा लिहितात ढोबळ पत्ता,
उदाहरणार्थ :
त्यांना माहीत असलेले वाचनालय
पाडून तिथे बांधलेले असते
मोठे डिपार्टमेंटल स्टोअर
तरीही वडिलांच्या पत्त्यातलं
वाचनालय कुणीच हटवू
शकत नाही,
वडील पत्र लिहून होतात मोकळे
फळाची अपेक्षा नये करू
तशी पत्रोत्तराची अपेक्षाही
नाही ठेवत ते,
मी लगबगीने निघतो बाहेर
तेव्हा शब्दांनी काठोकाठ भरलेली पत्रं
पोस्टात टाकण्यासाठी देतात हातात
गंगेत भक्तीभावे नाणं टाकावं तसं
मीही टाकून देतो कार्ड
पोस्टाच्या पेटीत,
वडिलांचे समवयस्क साथी
खात राहतात औषधी गोळ्या त्रिकाळ,
वडील मात्र मग्न असतात
विचारण्यात- कळवण्यात ख्यालीखुशाली
अक्षरांना पुढे करून,
आजकाल
वडिलांच्या गुडघेदुखीपेक्षाही
मला भिती वाटते
चलनातून पाच- दहा पैसे
गायब झाल्यासारखे
पोस्टकार्ड गायब होण्याची •••

(पॉप्युलर प्रकाशनाच्यावतीने प्रकाशित होणाऱ्या आगामी कवितासंग्रहातून)

दासू वैद्य
०३, श्रीराम अपार्टमेन्ट, ०४ - श्री कॉलनी,
पद्मपुरा रोड, कोकणवाडी,
औरंगाबाद ४३१ ००५
भ्रमणभाष : ९४०३५८४१११



।। चार कविता ।।

मिहिर चित्रे

■

काळा घोडा

काळा घोडा नाहीय् म्हणून नाही
किंवा त्याचा इतिहास जो तुझ्या तटबंदीच्या दगडांवर
मुलाम्यासारखा आहे
म्हणूनच नाही
तू ओळखला जातोस -
तुझ्या पुरातन असण्यामुळं
(अँटीक्वीटी जी तुला वाईन सारखं वागवते)
आणि ओळखला जातोस
निरसतेशी असलेल्या तुझ्या आकर्षक संबंधामुळं
तुझ्या संगीतमय आणि बहुभाषिक कानाकोपऱ्यांमुळे
तुझी ग्रंथालय आणि हिरवळी
आणि रस्ते जे लक्ष देत नाहीत त्यांच्याकडे
गल्ल्या वळलेल्या सँडविचेस आणि शेवपुरीकडे
आणि तुझ्या कनवाळूपणामुळं
ज्यात ओल आहे गार ऊसाच्या रसाची

तू काढतोस स्वतःचीच चित्रं
रोजच्या गोंधळाच्या भिंतींवर
आणि निशाचर शांततेवर
शोधत बॉम्बेची शरीर रचना
शहराच्या उलट्या भिंगांमधून •••

भिकारी

मी एक लहान पोरगा पाहिला रस्त्यावर
त्याचे डोळे संतापानं लालबुंद झालेले

खिशात थोडी चिल्लर आणि शिळ्या पावाचा तुकडा कोंबत
सिग्नलजवळ भीक मागितली त्यानं देवाच्या नावानं

वाहनांच्या गराड्यातून तो धावला
भक्ष्यावर तुटून पडणाऱ्या निष्णात सापासारखा

त्यानं अपमान झेलले, तो माखल्या गेला
रस्त्यालगतच्या धुळीनं आणि घाणीनं

उड्डाणपुलाखाली एक फाटका इसम होता
बिडी फुंकत लोळत पडलेला
जो बाप होता त्या पोराचा

तो घाणीत पडला होता
एखाद्या उद्ध्वस्त केलेल्या इमारतीसारखा

त्याची शाल दारिद्र्यानं जीर्ण झालेली
त्याच्या जराजर्जर 'स्व'च्या सांगाड्यासारखी

त्याच्या क्षीण डोळ्यात तीन दिवे चमकले सिग्नलचे
एकानंतर एक नियमित

तो बडबडला आणि थुंकला सिग्नलवर
त्याच्या आत एक धुंद बेफिकिरी निपजली


आणि त्यानं असह्य ओळी उच्चारल्या
ज्या वाहनांमधल्या शिळ्या हवेत परिणामशून्य वाजत
राहिल्या

पोरगा अजूनही सापाची भूमिका वठवत होता
तो कुविख्यात कलात्मक वेगवान धावणं होतं

शांतपणे तो निष्ठूर सूर्याशी झगडत राहिला
ज्यानं ह्या पोराचं बालपण नाहीसं होताना पाहिलं

जग पुढे निघून गेलं, हिरवा दिवा लागल्यावर
मी देखील पुढे गेलो एखाद्या षंढ बघ्यासारखा खजील
होऊन
एका अल्पजीवी मोठेपणाची उलट तपासणी करत. •••

अनुक्रमणिका



दोन सूर्यास्त

तू मला
केवळ दोन सूर्यास्त देणं लागतेस
ना एक किरण जास्त
ना एक किरण कमी
तू मला
केवळ दोन सूर्यास्त देणं लागतेस

दोन असंगत कहाण्या
कॉफीच्या मगाभोवती लपेटलेल्या
दोन खोल्यांचं राज्य
एका मिठीत विस्तारलेलं

एक केक कापलेला
काळाच्या तुकड्यांमधे
एकांताच्या लयीत
चवीनं चघळलेला

तू मला
केवळ दोन सूर्यास्त देणं लागतेस
कदाचित एक किरण जास्त
कदाचित एक किरण कमी
तू मला
केवळ दोन सूर्यास्त देणं लागतेस •••

अंधेरी

कोणत्याही घटना घडतील
अशी मूर्ख उपनगरी आहेस तू
तुझे उजाड रस्ते
गौप्य स्फोट करणारे बार
पराभूत आणि निराश करणारे
भिकार कानेकोपरे
क्षणभंगूर प्रेम कहाण्या
तुझ्या मॉल्स आणि बाजारपेठांवर पसरलेला
अस्वस्थ करणारा निसटता धूर
विव्हळताहेत न्यायासाठी-

त्या सगळ्यांचा खच पडलाय
तुझ्या प्रेम कहाण्यांसारखा. •••

मूळ इंग्रजीवरून अनुवाद

। श्रीधर नांदेडकर
०३, द्वारका रेसिडेन्सी,
शक्तीनगर, देवप्रिया हॉटेल मागे,
औरंगाबाद ४३१ ००१
भ्रमणभाष : ९४२३२३३६३१

मिहीर चित्रे : जन्म १९८८ (मुंबई), शिक्षण : बी.ई. (Information Technology), सध्या मुंबई येथे एका जाहिरात कंपनीमध्ये नोकरी. कथा आणि कविता लेखन, काही कथा आणि कविता प्रतिष्ठित देशी-विदेशी नियतकालिकांतून प्रकाशित, कॅनडा येथून प्रकाशित होणाऱ्या एका Anthology मध्ये कवितांचा समावेश. e-mail : mihirmumbaikar@gmail.com

अनुक्रमणिका

।। आठ गझल ।।

संजय इंगळे तिगावकर

गाव विकणे आहे...

गाव विकणे आहे बाबा, गाव विकणे आहे
रंक विकणे आहे, थोडे राव विकणे आहे

लोकशाही गाडा ओढे सावकारी हेले
मोडलेल्या संसाराचे डाव विकणे आहे

माय खाते खस्ता, आता बाप सस्ता झाला
काळजाचे चुकलेले हे ठाव विकणे आहे

कोपणाऱ्या सूर्यालाही पावसाळी बाधा
धूप विकणे आहे, थोडी छाव विकणे आहे

माणसाचे जगणे कवडीमोल केले ज्याने
देऊळीच्या देवाजीचे भाव विकणे आहे •••

जात्यातल्या जिवाला...

रामायणात म्हणती, गोडी अवीट आहे...
(निर्दोष राजगादी, दोषी परीट आहे)

अधिकार राखण्या ज्यांचा मी फकीर झालो
शाबूत काफले त्यांचे, संसार नीट आहे

आभार मानते ही उद्ध्वस्त काच माझी
दगडाहुनी जराशी मऊशार वीट आहे

होते, अजून आहे... लाखो कुबेर येथे
खुर्ची निलाम होता मग पायपीट आहे

आडून मुखवट्यांच्या फिरतात श्वापदे ही
आपापल्या घरी पण प्रत्येक नीट आहे

जात्यातल्या जिण्याला हसती सुपातले जे
त्यांच्या फुशारकीचे गळणार पीठ आहे •••

सांग मित्रा

गाव होत शांत, आता काय झाले, सांग मित्रा
दंगलीची क्रूर भाषा कोण व्याले, सांग मित्रा

सावली होण्या जगाची सोसला ज्यांनी उन्हाळा
सोबती त्यांच्या चितेवर कोण आले, सांग मित्रा

माणसाने आणली ही अंगणी आकाशगंगा
हरविले कोठे सुखाचे धुंद प्याले, सांग मित्रा

मी जरी ओठास माझ्या बोलण्या केली मनाई
का तरीही पापण्यांचे काठ ओले, सांग मित्रा

लाख डोळ्यांच्या सवालांनी जरी मज ठार केले
नाव कोठेही तिचे नाही निघाले, सांग मित्रा

मी कसा होतो जगाला हे उगा सांगू नको तू
माझिया गझलेत होते शब्द ओले, सांग मित्रा •••

देव

ओवळ्या - सोवळ्यांचे दिसे देव हे
काय साध्यासुध्यांचे नसे देव हे ?

जातधर्मास गोंजारती बापुडे...
नेमके माणसांना डसे देव हे

जे गरीबासही रोज लुटती इथे
हाय, त्यांचेच राखी खिसे देव हे

मी नवस बोललो ना कधी कोठला
का दिसे आज वेडेपिसे देव हे

माणसांना कळे ना इथे माणसे
काय कळले असे का, कसे देव हे

दे, जगाला तुझा फक्त आधार दे
सोबतीला अता माणसे, देव हे •••

अनुक्रमणिका

मखमल

तू सोबत असते जेव्हा हे उन्हळी कोमल होते
घामाचे होते अत्तर, काट्यांची मखमल होते

मी नाव तुझे घेताना, गंगेला फुटतो पान्हा
श्वासांची अवजड गाथा मग अलगद चंचल होते

कौतुक तारूण्याचे लखलाभ तुला ते होवो...
जे इतरांसाठी झिजते, वार्धक्यही मलमल होते

दुःखाचे लोचट मांजर, घुटमळते दारावरती
दरवाजा मिटण्याआधी ते नकळत दाखल होते

तो दिवस बुडायाआधी डोळ्यांना देतो स्वप्ने
अन् बघता बघता गोरी राधाही श्यामल होते

मी गातो केवळ आता ही अमरत्वाची गाणी
वाट्यास जरी माझ्याही फक्त हलाहल होते •••

गझले तुझ्याचसाठी

मी टाळले सुखाला गझले तुझ्याचसाठी
अन् जाळले स्वतःला गझले तुझ्याचसाठी

वाचून घे अता तू एकेक ओळ माझी
मी चाळले जगाला गझले तुझ्याचसाठी

कोणा असेल प्यारी वस्ती जरी फुलांची
कुरवाळले शुलाला गझले तुझ्याचसाठी

चकवे अनेक होते मजला भुलावणारे
सांभाळले मनाला गझले तुझ्याचसाठी

होते मला पुरेसे मातीत पाय माझे...
कवटाळले नभाला गझले तुझ्याचसाठी

दे आज, या क्षणाला, हातात हात माझ्या
फेटाळले 'उद्या'ला गझले तुझ्याचसाठी •••

अबोल ना

अबोल... ना उदास मी
तुझ्याच आसपास मी

फुलारतो मनी तुझ्या
गुलाब मी, सुवास मी

मला कशास भेटतो...
विचारतो सुखास मी

नकारशी कसे मला
तुझाच श्वास श्वास मी

आताच बोल जीवना,
उद्या असेल भास मी

समाज भोगतो व्यथा
करू कशी मिजास मी? •••

काजवे

काजवे धुंदीत कोण्या मग्न होते...
सूर्य माझा जाळण्याचे स्वप्न होते

माणसे साधीच होती भोवताही
माणसांना जाळणारे यज्ञ होते

लोक भगवे, श्वेत, हिरवे अन् निळेही
आपल्या घरट्यात सारे नग्न होते

तारण्या आला न कोणीही मुरारी
देव सारे सोवळे... स्थितप्रज्ञ होते

कापला माझा गळा पण रक्त नाही
ते असे माहीर होते, तज्ज्ञ होते •••

। संजय इंगळे तिगावकर
'मेघदूत' सर्कस ग्राऊंडजवळ,
रामनगर, वर्धा - ४४२ ००१
भ्रमणभाष : ९७६५०४७६७२

अनुक्रमणिका



॥ पुस्तक परीक्षण ॥

सत्तामदांध हत्तींच्या विकारवर्तन शैलीवर भाष्य

डॉ. सुरेश जोशी

■

आधुनिक मराठी वाङ्मयामध्ये दीर्घकविता विपुल प्रमाणात लिहिली गेली नसली तरी जी मोजकी उपलब्ध आहे ती सकस आणि चिंतनशील आहे. 'विरहतरंग' (माधव जूलियन), 'भग्नमूर्ती' (अनिल), 'मृगावर्त' (निकुंब) अशी मागच्या पिढीतील कवींची दीर्घकविता त्या काळात संस्मरणीय ठरली आहे. पुढच्या पिढीतील ना. धों. महानोर, रजनी परूळेकर वगैरेंनीः भावगर्भ दीर्घकविता लिहिली आहे. नव्वदोत्तर मराठी कवींमध्ये तिचे प्रमाण कमी आहे. दीर्घकवितेला चिंतनशीलतेचा मोठा आवाका कवेत घ्यावा लागतो. भावकवितेतील भावोत्कटेची कमान जशी उंच ठेवता येते तसे इथे घडत नाही म्हणून कदाचित चालू पिढीतील कवी अशा लेखनाकडे वळत नसावेत.

'आवानओल' या पुरस्कारप्राप्त कवितासंग्रहामुळे सुपरिचित झालेले कणकवलीचे कवी अजय कांडर यांनी अलिकडेच 'हत्ती इलो' ही दीर्घ कविता लिहून या प्रांतात दमदार प्रवेश केला आहे. दमदार प्रवेश एवढ्यासाठीच म्हणायचे कारण, ही कविता सभोवतालच्या वर्तमानावर भाष्य करणारी आहे. तिचे निमित्त दक्षिण कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यात गेली काही वर्षे जंगली हत्तींनी जो धुमाकुळ घालून उभ्या पिकाचे नुकसान केलेले आहे आणि या अ-मानवी संकटाला तोंड देणे अशक्य होऊन बसले आहे. नागरिक त्रस्त झालेले आहेत. ही वर्तमान घटना असली तरी या दीर्घ कवितेचे प्रयोजन वृत्तांतकथनाचे नाही. तिच्या आशयाचा आवाका चिंतनाची व्याप्ती सुदूरपर्यंत पोचणारा आहे. आजची उध्वस्तता ही उद्याचा भयावह विध्वंस ठरणार आहे. या व्यथागर्भ धोक्याची सूचना देणारी, ही दीर्घ कविता आहे. तिच्यातील चिंता आणि चिंतन खूप लक्षणीय आहे. तिने प्रादेशिकतेच्या कक्षा ओलांडल्या आहेत.

'आहारनिद्राभयमैथुन' या माणसांच्या मूलभूत दैहिक गरजा आहेत. अनादिकाळापासून भय ही भावना माणसाला अनेक स्तरावर त्रस्त करीत असते. लौकिक जगातील पोटापाण्याच्या प्रश्नापासून मानापमानापर्यंत आणि शारिरीक संरक्षणापासून आत्मिक मनःशांतीपर्यंत माणसाला भय त्रस्त करीत असेते. सर्वसामान्य माणूस सतत भयकंपित असतो. लहानपणी भूताखेताची आणि राक्षसाची भिती वाटते. प्रौढपणात दैवी आपत्ती, चोरीदरोडे, खूनमारामारी याबाबत भिती वाटते. आजकाल सार्वजनिक जीवनात सत्ताधारी, संस्थाप्रमुख यांचीही भिती संवेदनाशील मनाला त्रस्त करीत असते.

अजय कांडर यांच्या 'हत्ती इलो' या दीर्घ कवितेत सार्वजनिक जीवनातील सत्ताधाऱ्यांच्या विध्वसंक धुमाकुळीची भिती चिंतनगर्भतेने व्यक्त झालेली आहे.

आजकाल सार्वजनिक जीवनात, विशेषतः राजकीय क्षेत्रात सत्तामदांध हत्तींनी फारच धुमाकुळ घातला आहे. त्यामुळे अवघी समाज व्यवस्था उद्ध्वस्त होत आहे. आज गावागावांमध्ये राज्यकर्त्यांची सरंजामशाही उदयास येत आहे. कधी धर्मनिष्ठेचा झेंडा मिरवित तर कधी प्रादेशिकतेची वा भाषाप्रेमाची व्याज-अस्मिता गवनि पुकारित या सरंजामांचे चेले सामाजिक ताणतणाव वाढवित आहेत. आज लोकशाहीची जागा झुंडशाहीने घेतली आहे. एखाद्या सांस्कृतिक-धार्मिक उत्सवाचे निमित्त करून फंड-गुंड चेले सर्वत्र मनगटशाही फैलावत आहेत. अधिक क्लेशदायक बाब अशी की या झुंडशाहीने अनेक प्रसारमाध्यमे दिमतीला धरून, स्वतःची वृत्तपत्रे प्रकाशित करून जनसामान्यांचा मेंदूच ताब्यात घेतला आहे. त्यामुळे नागरिकांना असे वाटते आहे की हा हत्तीच आपले दैनंदिन जीवन सुखदायी करणार आहे.

अनुक्रमणिका

आपल्या गरजा भागवणार आहे. महामार्गावर पेट्रोलपंप आणि हॉटेल्स चालवून, तालुक्या-तालुक्यात उच्च शिक्षणाच्या संस्था काढून, वाढदिवसांचे दिवशी मेळावे भरवून हे हत्ती आपली सत्ता बळकट करीत आहेत. भल्याभल्या जाणत्यांची विवेकबुद्धी दुबळी करीत आहेत. एवढेच नव्हे तर हत्तीच आपले भले करणार आहे, तोच सर्वज्ञ, शहाणा आहे, आता आपणच आपला मेंदू तपासून घेतला पाहिजे. असे ही जाणत्यांना वाटू लागले आहे. कवी अजय कांडर यांची हीच खरी व्यथा आहे. दीर्घ कवितेच्या या प्रस्तावनेत त्यांनी सांस्कृतिक उद्ध्वस्ततेबद्दल विस्ताराने लिहीले आहे.

कवीने हत्तीच्या या प्रतिमेची विविध अंगाने मांडणी केली आहे. बालपणी 'ह' हत्तीतला गिरवताना प्रथम त्याची ओळख झाली होती. त्याचा धिप्पाडपणा मनात ठसला होता. 'गजराज येता घरा, तोचि दिवाळी दसरा' अशा पूज्य भावनेने त्याची पूजा केली जात होती. विद्येची देवता म्हणून गणराया सर्वत्र भेटत होता. पुढे स्वातंत्र्य चळवळीच्या काळात आणि नंतरच्या दोन दशकात खरोखरच हत्ती एवढ्या धिप्पाड विद्याव्यासंगाचे लोकनेते आले. त्यांची भाषणे ऐकली. त्यांचा जनकळवळा आणि दयाळूपणा अनुभवला. विरोधकांशीही सभ्यतेने, समंजसपणाने आणि सहकार्याने वागण्याची त्यांची सश्रद्ध वृत्ती अनुभवली. हत्तीचा भलेपणा थोराड वाटू लागला.

पण कालांतराने हत्तीची ती प्रतिमा बदलली. बालपणीची, त्याच्याबद्दलची पूज्य भावना बदलली. नव्या दशकातील हत्तीचे वर्तन संभ्रम निर्माण करणारे होते. खरं काय आणि खोटं काय हे कळेनासे झाले. पण त्याचे बलाढ्यरूप मात्र पदोपदी जाणवू लागले, मात्र जुन्या निष्ठा उरल्या नाहीत. पूर्वीच्या काळात हत्ती पिसाळला तर तो बंदुकीच्या निशाणीवर असायचा पण आजकाल लोकशाहीच्या न्यायव्यवस्थेत त्याला संरक्षण मिळू लागले. आजकाल त्याच्या रक्तातील उन्मादाची रग वाढली. तो उसळत राहिला. त्याच्या डोळ्यात असुरी आनंद साठवत राहिला. पूर्वीच्या नेत्यांची विचाराने विचाराशी लढायचे ही भूमिका लोपली. जशास तसे उत्तर , ठोशाला ठोसा एवढ्यावरच न थांबता विरोधकला नेस्ताबूस्त करण्यातच पराक्रम मानला जाऊ लागला. दहशत वाढली तशी भयभित जनता या हत्तीला देव मानू लागली. तसे पाठीराखे लाभले. त्यालाही आता सत्तेचे सोपान दिसू लागले.

या परिवर्तनाचे नेमके शब्दांकन टप्प्याटप्प्यावर कवीने केले आहे -

''हत्तीने विचार केला
या प्रदेशाचा सम्राट व्हायचं असेल तर
आपल्या आयुष्यात राजसत्तेचा योग
जुळवून आणायलाच हवा!
... ...
लोकांनीच हत्तीला
राजसत्तेच्या मार्गावरून चालल्यास
यशस्वी करण्याची ग्वाही दिली.''

हत्तीने बघता बघता अंगावरील पुरोगामित्त्वाची झूल उतरवली. देव, जात, धर्माची वर्गवारी करत त्याने सत्तेची स्वप्नं रंगवली. 'हत्ती आजच्या रोजीरोटीचा प्रश्न सोडवतो' असे लोकांनाही वाटू लागले.

''कल्पनेपेक्षा प्रखर असते वास्तव
त्या वास्तवातून चढत राहायची असते सत्तेची शिडी
असं हत्तीनं ठरवलं''
... ...
''हत्तीने आधी आपल्या समर्थकांची
एक एक फळी निर्माण करताना
फारच सावध भूमिका घेतली
त्याने आपल्या समर्थकांच्या
नैसर्गिक वृत्तीनुसार विभाग पाडले...
बनवला मुखिया-उपमुखिया''

आपल्या आप्तेष्टांकडून आपला आवाज दाबला जाईल हे ओळखून सावधपणे त्यांचीही एक वेगळी व्यवस्था लावली. वेळ आलीच तर कोणाला 'बळी' द्यायचे याचाही अंदाज बांधला. 'सत्तेच्या मार्गावर जाताना आधी दुष्मनाला मित्र करावयाचा असतो' हे त्याने जाणले. 'पैशाच्या खेळात सहज जिंकता येतो सत्तेचा डाव' हेही त्याने ओळखले आणि लोकशाहीचा चौथा खांब विकत घेतला. आता माणसाच्या मेंदूवरच आघात करणे सोपे झाले. 'लोकांना मारून टाकण्यापेक्षा त्यांचा मेंदू ताब्यात घेणं बरं' हे त्याला कळून चुकलं!

आणि मेंदू बधीर झालेले लोक हत्तीने 'गढूळ केलेलं पाणी सुद्धा तीर्थ म्हणून प्यायला लागले, हत्तीने स्पर्श केलेल्या जागेवर माथा टेकू लागले, मग हत्ती त्या भूमीचा भगवंत झाला.'

आपल्याला डोकं आहे पण त्यात मेंदू नाही हे कळणारे लोक आपल्याला मेंदूच नसल्याचा उत्सव साजरे करू लागले, हत्तीने त्यांचे पालकत्व स्वीकारले आणि घरीदारी आपलाच गुणगौरव होत राहील यावर पहारा ठेवला ! हत्तीच्याच गुणगौरवाचे उत्सव होऊ लागले. त्याच्या डोक्यावर फुले वाहून आरती ओवाळली जाऊ लागली, त्याच्या कथा गायल्या जाऊ

अनुक्रमणिका

लागल्या आणि मग हत्तीच होऊन बसला एक दंतकथा!

बघता बघता हत्तीने आपल्या भूप्रदेशाचा इतिहासच बदलून टाकला. त्याचा दहशतीचा एक एक शब्द म्हणजे लोकांना आचारसंहिताच वाटू लागली. त्या भागातील बुद्धिप्रभूंनी हत्तीचा इतिहास लिहायला घेतला. शहाण्यांना सुद्धा असे वाटू लागले की -

''हत्तीच्या कृपाशीर्वादाने
आता उगवेल नवी पहाट
घर-आंगण, गावच होईल एक गोकुळ!''

मग हत्तीने एक एक गाव काबीज केले. अपयश हा शब्दही त्याला दुष्मन वाटू लागला. सत्तेत अडथळा आणणाऱ्यांना किड्या-मुंग्यासारखे पायदळी तुडवू लागला. रात्री-अपरात्री कोणत्याही गावावर त्याची चाल होऊ लागली. माणसं जीव मुठीत घेऊन जगू लागली. विचारवंत बहिरे, आंधळे, मुके झाले. त्यांची लेखणी बंद झाली. माणसं प्रचंड भयभीत झाली.

कवी अजय कांडर यांनी दीर्घ कवितेच्या अखेरच्या छेदकात या भयभीततेचे, दहशतीचे फार प्रभावी शब्दात चित्रण केले आहे.

''आता हत्ती ज्या भूमीला स्पर्श करतोय
ती भूमीच नापीक होऊ लागली
बीजाने अंकुरण्याचे सोडून दिले
फुलांनी फुलण्याचे सोडून दिले
... ...
भूमी निर्वंश झाल्याचे दुःख मनात असतानाच
हत्तीने माणसांनाच निर्वंश करायला प्रारंभ केला
हत्तीच्या गर्जनेने
ओल्या बाळंतिणीचाही पान्हा सुकू लागला
उदरातील गर्भ गुदमरू लागला...''

माणसं मंद बुद्धीची झाल्याची खात्री झाल्यावर हत्ती अधिकच बोकाळला, माणसां .ढत्व लक्षात घेऊन त्यांच्याशी रोज नवा खेळ खेळू लागला! सत्तेच्या सिंहासनावर पाय पक्के रोवून खेळ खेळत राहिला!


अजय कांडर यांच्या 'हत्ती इलो' या दीर्घ कवितेचा आशय केवळ राजकारणापुरताच मर्यादित आहे, असे समजण्याचे कारण नाही. आजच्या जागतिकीकरणाच्या जमान्यात बलाढ्य झालेले कार्पोरेटचे जग, विनाअनुदान तत्त्वावर चाललेल्या शिक्षणसम्राटांच्या शिक्षण संस्था, रात्रीचा दिवस करणारे कॉम्प्युटर सेंटर्स यासारख्या उद्योगव्यवसायांमध्येही असे सत्तामदांध हत्ती सामान्य माण साचा मेंदू ताब्यात घेत आहेतच. लाचारीचं जगणं अनेकांच्या वाट्याला येत आहे. पूर्वीच्या काळी हत्तीवर अंकुश ठेवून माणूस त्याला आपल्या गरजेप्रमाणे त्याला फिरवित होता, खेळवित होता. त्याकाळात हत्ती हे राजसत्तेचे वैभव होते. आज परिस्थिती नेमकी उलटी झालेली आहे. वैभवदालने बळकावून आजचा हत्ती सर्वत्र मिरवित आहे. माणसावर अंकुश ठेवून दहशत वाढवित आहे. जरासा सुद्धा विरोध आढळला तर पिसाळलेल्या हत्तीप्रमाणे सोंडेने माणसांना उडवित आहे. पायाखाली घेऊन त्यांचा चेंदामेंदा करीत आहे. बुद्धिजीवी वर्गाला निर्वंश करीत आहे. त्याचा हा खेळ कितीकाळ चालू राहणार हाच वेदनागर्भ प्रश्न कवीने उपस्थित केला आहे. त्यादृष्टीने ही कविता आजचीही आहे आणि अंधारात दडलेल्या उद्याचीही आहे. तिचा तालबद्ध आविष्कार ढोलताशासारखा प्रभावी आहे. ढोलताशांनाही न बुजणारे रानटी हत्ती जसा धुमाकुळे घालीत आहेत तसा. नव्हे, त्याहून अधिक विध्वंस हे नागर हत्ती घडवित आहेत. त्यांना थोपवणारे नगारे कोठून आणायचे ?

कवी कांडर यांच्या या व्यथागर्भ आविष्काराला जुने जाणते नामवंत चित्रकार बाळ ठाकूर यांच्या रेषा - आविष्काराची जोड मिळाली आहे. रेषा आणि भाषा यांचे मीलन झाल्यामुळे या चौरस आकाराच्या पुस्तकाचा प्रभाव वाढला आहे. वाढता वाढता तो रसिकमनात वाढत गेला तर भविष्यात केव्हा तरी या हत्तीला जेरबंद करता येईल अशी अपेक्षा बाळगू या.

(**'हत्ती इलो'** अजय कांडर, शब्द पब्लिकेशन, मुंबई, प्र. आ. २०१२, मूल्य :१०० रू.)

। डॉ. सुरेश जोशी
'मानसी' मधली आळी,
देवरूख - ४१५ ८०४, जि. रत्नागिरी
भ्रमणभाष : ९४२३८७४७८१

अनुक्रमणिका



।। पुस्तक परीक्षणे ।।

तीन समीक्षाग्रंथ : काही विचार

डॉ. राजेंद्र नाईकवाडे

■

संतसाहित्य समीक्षेचे बीजप्रवाह

'संतसाहित्य समीक्षेचे बीजप्रवाह (स्वातंत्र्यपूर्वकाळ)' हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील मराठीचे प्राध्यापक डॉ.सतीश बडवे ह्यांचे अलीकडे वाचनात आलेले पुस्तक पुण्याच्या गुरूकुल प्रतिष्ठानने २०११ मध्ये प्रकाशित केले आहे. संतसाहित्याचे एक व्यासंगी भाष्यकार व गुरूकुल प्रतिष्ठानचे प्रमुख डॉ. अशोक कामत ह्यांच्या मार्गदर्शनाखाली सिद्ध कलेल्या 'प्राचीन मराठी भक्तिवाङ्मयाची स्वातंत्र्योत्तर समीक्षा : एक अभ्यास' या विषयावरील बडवे ह्यांच्या पीएच. डी. प्रबंधाच्या पूर्वार्धावर हा छोटेखानी ग्रंथ आधारलेला आहे. केवळ ११५ पानांच्या ह्या पुस्तकाचे स्वरूप अक्षरशः 'गागर में सागर' अशाप्रकारचे असून आधुनिक काळातील संतसाहित्यसमीक्षेचा प्रारंभकाळ त्यातल्या सर्व बारकाव्यांसह व पैलूंसह इथे साकारला आहे. मूळ प्रबंधलेखनाच्या गरजेनुसार केवळ आढावापर व संकलनात्मक असे त्याचे स्वरूप असल्याने साधार मूल्यामापन, चर्चा, स्पष्टीकरणे आणि लेखकाचे सविस्तर मतप्रदर्शन मात्र इथे नाही, परंतु त्यामुळे ह्या पुस्तकातील विलक्षण शिस्तबद्ध, स्पष्ट व सारांशरूप मांडणीचे महत्त्व कमी होत नाही. संतसाहित्याकडे आणि त्याच्या विविधांगी समीक्षेकडे जाऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक नव्या अभ्यासकास 'सबळ आधार' व 'योग्य मार्गदर्शक' ठरेल असा हा ग्रंथ आहे.

अलीकडच्या महाराष्ट्रातील संतसाहित्याबाबतचे 'जातीय' व 'संकुचित' वाङ्मयीन पर्यावरण बघता, जातिपातीवरून संतांची केली जाणारी उघड उघड निर्लज्ज विभागणी बघता व राजकारण्यांनी (मान्यताप्राप्त समजल्या जाणाऱ्या) जातीयतेची धुनी महाराष्ट्रभर जागोजागी पेटवत ठेवलेली बघता, डॉ. बडवे ह्यांची संतुलित, समन्वयशील व वस्तुनिष्ठ भूमिका चटकन नजरेत भरते. स्वातंत्र्यपूर्वकालीन संतसाहित्यावरील भाष्याचे स्वरूप सांगताना ते म्हणतात- ''विशेष म्हणजे वैयक्तिक आकसापोटी, गटातटाने एकत्रित येऊन दुसऱ्या गटाला विरोध करण्यासाठी हे लेखन झालेले नाही. त्यात प्रांजळपणा आहे. स्वमताचे यथार्थ समर्थन करण्याची भूमिका आहे... एकूण या कालखंडात विखारी वातावरण आढळत नाही. जिज्ञासा, कुतुहल, अभ्यास आणि संशोधनपरता या गुणवैशिष्ट्यांनी या काळातील संत साहित्य समीक्षा प्रेरित झाली आहे''(पृ.५) ह्यातला गर्भितार्थ लक्षात घेतला पाहिजे.

संतसाहित्यविषयक एखाद्या कोशासारखे स्वरूप लाभलेल्या ह्या ग्रंथात संतसाहित्यसमीक्षेचे चार प्रमुख बीजप्रवाह कल्पून त्यांची चार प्रकरणांमधून सूत्ररूपात मांडणी केलेली आहे.

पहिला बीजप्रवाह विचारसरणी व वाङ्मयेतिहाससापेक्ष असा एकला कल्पिला असून त्याचे दोन भागात वर्गीकरण केले आहे. विचारसरणीत राष्ट्रवादी व उदारमतवादी असे दोन उपप्रवाह कल्पिले असून त्याअंतर्गत अनुक्रमे विं. का. राजवाडे व म. गो. रानडे ह्यांच्या संतविषयक दृष्टीवर प्रकाश टाकला आहे. इथे रामदास व इतर संत यांच्या अनुयायातील भिंत कुठे व कशी उभी झाली हे दिसते. परंतु त्यातले समन्वयबिंदूही मांडायला डॉ. बडवे विसरत नाहीत जे, संतांच्या जातीवर राजकारण करणारे मात्र विसरतात! हे डॉ. बडवे यांनी विनोबांच्या आधारे पुढील बीजप्रवाहात मांडले आहे. विनोबा म्हणतात - ''राजवाड्यांचा हल्ला आणि रानड्यांचा बचाव दोन्हीही पाहण्यासारखे आहेत. दोघातही कळकळ ओतप्रोत भरलेली आहे'' (पृ. १००). डॉ. बडवे लिहितात - ''रानडे आणि राजवाडे यांच्यातील मतभेद वरवरचे असल्याचे विनोबांना वाटते'' आणि विनोबांचे पुढील उद्धरण देतात - ''राजवाड्यांना संतांविषयी आतून प्रेम होते. संतांच्या ग्रंथांचा

त्यांनी अभ्यास केला होता... पण आजची आमच्या राष्ट्राची दीनवाणी दशा, आळस आणि पुरूषार्थहीनता पाहून त्यांचे हृदय तळमळे. त्यातून संतांच्या वचनांचाही ह्या दुर्गुणांना आधार घेतला जातो असे दिसून आल्यामुळे 'इंद्राय तक्षकाय स्वाहा' या न्यायाने त्यांनी संतावरच हल्ला चढवला... पण माणूस त्रासला म्हणजे असे काहीतरी बोलून जातो, त्याचा अक्षरशः अर्थ घेऊ नये. भाव पहावा म्हणजे झाले''(पृ. १००). इथे जशी विनोबांची समन्वयवादी उदार भूमिका दिसते तशीच बडवे ह्यांचीही विधायक व सकारात्मक दृष्टी ह्या पुस्तकात सर्वत्रच दिसते. कुणी ह्यास परखडपणाचा, स्पष्टपणाचा अभावही म्हणू शकेल अथवा बोटचेपेपणाही म्हणू शकेल! पण प्रस्तुत ग्रंथात डॉ. बडवे ह्यांनी घेतलेली समन्वयवादी, शांततावादी सहअस्तित्वाची व एकात्मतेच्या वाढीसाठीची सकारात्मक भूमिका या पुस्तकाचे एक मध्यवर्ती वैशिष्ट्य म्हटले पाहिजे. अशाच प्रकारची वादविवाद टाळणारी भूमिका त्यांनी दुसऱ्या बीजप्रवाहातील म. फुल्यांच्या सामाजिक चिकित्सक दृष्टीचा परिचय करून देताना घेतली आहे. ''...ही विरोधी अंगाने व्यक्त झालेली प्रतिक्रिया तत्कालिन समाजजागृतीच्या दृष्टीने बघता येते. बहुजन समाजाची ही प्रतिनिधिक भूमिका नव्हती पण नवशिक्षणाने मिळालेल्या सामाजिक भानाचा तो उद्‌गार होता... ब्राह्मण संतांना टीकेचे लक्ष्य बनविणारे महात्मा जोतीराव गोविंदराव फुले यांनी संतांविषयी केलेली चिकित्सा हा स्पष्टोक्तीचा भाग आहे'' (पृ. ४५) इथे डॉ. बडवे वादात न शिरता सावध प्रतिक्रिया व्यक्त करताना दिसतात. यासंदर्भात संतांविषयी फुले 'विखारी भाषा' वापरतात पण ती शूद्रातिशुद्रांविषयीची तळमळ व्यक्त करणारी आहे असे सावध विश्लेषण बडवे करतात. महाराष्ट्रातले समकाळातले 'विखारी' वातावरण बघता आज कोणत्याही लेखकाला फारशी 'स्पष्ट' व 'वस्तुनिष्ठ' भूमिका घेता येत नाही हेच यामागचे उघड गुपित आहे.

चौथ्या बीजप्रवाहात बडवे यांनी काहीसा विस्ताराने घेतलेला गुरूदेव रानडे यांच्या वेगळ्या दृष्टिकोनाचा परामर्श महत्त्वपूर्ण ठरणारा आहे. यासंदर्भात बडवे ह्यांची निरीक्षणे वैशिष्ट्यपूर्ण ठरतात. ''अनुभूतीशास्त्राच्या आधारे संतकवितेचे परिशीलन करणारे ज्येष्ठ अभ्यासक आणि संतपरंपरेची पारमार्थिक शिकवण उलगडणारे तत्त्वज्ञ भाष्यकार'' असा रा. द. रानड्यांचा उल्लेख करून त्यांच्या संप्रदायनिरपेक्ष व्यापक भूमिकेचे वर्णन करताना बडवे लिहितात - ''संतकाव्याचे औपनिषदीय काव्याशी असलेले नाते आकलन होण्यास Constructive Survey of Upanishadic Philosophy हा रानडे यांचा ग्रंथ महत्त्वाचा आहे. साक्षात्कारवाद आणि समाजपरता यांचे नातेही या ग्रंथातून लक्षात येते... संतसाहित्याच्या आकलनासाठी व पर्यायाने समीक्षेसंदर्भातही महत्त्वाची ठरू शकेल अशी ही दृष्टी असूनही मराठी समीक्षेने त्याकडे आस्थेने वधितल्याचे आढळत नाही. या पार्श्वभूमीवर गुरूदेव रानडे यांची समीक्षा महत्त्वाची ठरते'' याच भागात शंकरराव देव, वि. भि. कोलते, इतर महानुभाव संशोधक, मा. गो. देशमुख, शं. दा. पेंडसे, न. चि. केळकर, ख्रिस्ती मिशनरी व विनोबा भावे ह्या विभिन्न अभ्यासकांच्या प्रयत्नांची ओळख ह्या पुस्तकात करून देण्यात आली आहे. संतसाहित्याविषयीचा थक्क करणारा विशाल आवाका त्यातून आपल्या डोळ्यापुढे उभा राहतो.

'बीजप्रवाह' ह्या शब्दसंज्ञेचा व संकल्पनेचा विचार करता डॉ. बडवे ह्यांनी सिद्ध केलेला संतसाहित्यासमीक्षेचा हा आराखडा मात्र सदोष वाटतो. वैचारिक अंगाने, वाङ्‌मयीन दृष्टीने, समीक्षाप्रकारच्या पद्धतीने, लेखनाच्या आकृतिबंधाच्या अंगाने खरंतर हे बीजप्रवाह मांडायला हवे होते. उदा. उदारमतवादी व राष्ट्रवादी विचारांची राजवाडे-रानडे ह्यांनी वैचारिक निबंधांमधून केलेली मांडणी (बीजप्रवाह १ मध्ये वर्णिलेली), चिपळूणकर, शिंदे, आपटे, भागवत ह्यांनी केलेली समीक्षा किंवा विनोबांसारख्याचे लेखन किंवा इतरही वैचारिक निबंधकारांचे लेखन हे वेगवेगळ्या बीजप्रवाहात टाकल्याने 'बीजप्रवाह' म्हणजे नेमके काय? आणि लेखकाची बीजप्रवाह म्हणण्यामागची भूमिका काय? हे स्पष्ट होत नाही. इथे एक-एक करून व्यक्तिसापेक्ष पद्धतीने संतसाहित्यविषयक अभ्यासाच्या विविध प्रयत्नांचे एकत्रिकरण केलेले दिसते. बीजप्रवाहांना दिलेली शीर्षक निश्चित 'प्रवाहा'चा किंवा एखाद्या विशिष्ट प्रवृत्तीची निर्देश करीत नाहीत. उलट एकाच प्रवाहात भिन्नभिन्न समीक्षापद्धतींची व विचारदृष्टींची सरमिसळ झालेली दिसते. इथे दिलेल्या रेखाकृतीवरून वाचकांना हे लक्षात येईल. अर्थात संपूर्ण संतसाहित्यसमीक्षेचा एक बृहद् आराखडा अभ्यासकांच्या पुढे अत्यंत निरपेक्ष व निरामय दृष्टीने साकारणाऱ्या डॉ. सतीश बडवे ह्यांच्या या प्रयत्नाचे मोल अशा उणीवांमुळे अजिबात कमी होत नाही.

(<u>संत साहित्यसमीक्षेचे बीजप्रवाह</u> - डॉ. सतीश बडवे, गुरूकुल प्रतिष्ठान पुणे, प्रथमावृत्ती २०११)

<u>साहित्यदिंडीचा वारकरी</u>

'साहित्यदिंडीचा वारकरी : मधुकर केचे' हा डॉ. कोमल ठाकरे यांचा ग्रंथ मार्च २०१२ मध्ये नागपूरच्या विजय प्रकाशनाने प्रसिद्ध केला. डॉ. अक्षयकुमार काळे ह्यांच्या मार्गदर्शनाखाली सिद्ध केलेल्या व नागपूर विद्यापीठाची आचार्य पदवी प्राप्त झालेल्या शोधप्रबंधाचे हे ग्रंथरूप असल्याने

त्यादृष्टीने ह्या पुस्तकाचे स्वरूप घडलेले आहे. चारशे पानांच्या ह्या ग्रंथात सुप्रसिद्ध वैदर्भीय कवी आणि साहित्यकार मधुकर केचे ह्यांच्या संपूर्ण वाङ्मयाचे परिशीलन आणि मूल्यमापन करण्याचा प्रामाणिक प्रयत्न जाणवतो. मराठी साहित्याच्या व समीक्षेच्या क्षेत्रात असणारी एक उणीव, केच्यांवरील स्वतंत्र समीक्षाग्रंथाची, या पुस्तकाने पूर्ण केली आहे आणि ती पूर्ण करताना केच्यांचे सामग्राने विश्लेषण केले आहे, हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य ठरते. या पुस्तकात एकूण सात प्रकरणे असून (डॉ. विलास खोले यांनी प्रस्तावनेत घेतलेल्या आढाव्यात अनवधानाने प्रवासवर्णनासंबंधीचे सहावे प्रकरण सुटलेले दिसते.) प्रबंधाच्या चौकटीनुसार व शिस्तीनुसार अनुक्रमे व्यक्तिमत्त्व, कविता, ललितलेख, व्यक्तिचित्रे, चरित्रलेखन, प्रवासवर्णने आणि कादंबरी अशी रचना आहे. प्रत्येक प्रकरणात संबंधित वाङ्मयप्रकारांच्या घटकांनुसार अशायाची व अभिव्यक्तीची विभागणी करून सोदाहरण, सविस्तर विवेचन-विश्लेषण करीत काहीशा बाळबोध पद्धतीने मांडणी झालेली दिसते. या प्रकरणांमध्ये सर्वाधिक पृष्ठे शंभरावर ही केचे यांच्या काव्यकर्तृत्त्वाच्या विश्लेषणावर खर्च करून औचित्य साधले आहे. कारण मराठी साहित्यात केचे ओळखले जातात ते प्राधान्याने कवी म्हणूनच!

पहिल्या 'अल्पचरित्र आणि व्यक्तिमत्त्व' या प्रकरणात केच्यांच्या व्यक्तिमत्त्वातील अंतर्विरोध लेखकाने दाखवून दिले आहेत. एकीकडे आध्यात्मिकता, भक्तिभाव, वितरागी महापुरूषांची प्रेरणा तर दुसरीकडे खाण्यापिण्यावरची आत्यंतिक आसक्ती त्यामुळे त्यांचे व्यक्तित्त्व काहीसे 'विक्षिप्त' असल्याची नोंद ठाकरे करतात. केच्यांचे काही पैलू वर्णिताना - ''...त्यांचे मन जात्याच स्त्रीवश होते. ...त्यामुळे प्रेमतुषार्तता आणि लैंगिक वासनेचा प्रक्षोभ त्यांच्या व्यक्तिमत्त्वात जाणवतो. तरीही केचे वासनामयतेत अडकून पडत नाहीत. त्यामुळे ते उत्तम संसारही करू शकले.'' असा हा 'प्रक्षोभ' प्रबंधलेखक ठाकरे यांना कशावरून जाणवला ते त्यांनी स्पष्ट करायला हवे होते. म्हणजे अशा विधानांमधली अनाकलनीयता व विसंगती टाळता आली असती. पण केच्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाची जडणघडण त्यांनी प्रकरणाअखेरीस व्यवस्थित उलगडून दाखविली आहे.

केच्यांच्या काव्यावरील प्रकरणातून आध्यात्मिकता आणि ईश्वरनिष्ठा हा केंद्रबिंदू ठाकरे यांनी नेमका हेरून विस्ताराने उलगडून दाखवलेला दिसतो. प्रारंभी एकेका संग्रहाचे कालक्रमाने 'दिंडी गेली पुढे', 'पुनवेचा थेंब' आणि 'आसवांचा ठेवा' ह्या संग्रहातील कवितांचे विश्लेषण करून त्यानंतर एकत्रपणे आशयाची वैशिष्ट्ये व अभिव्यक्तीची वैशिष्ट्ये असा विचार केल्याने स्वाभाविकपणेच विवेचनात पुनरावृत्ती व तोचतोपणा आला आहे. उदा. मर्ढेकरी शैलीचा स्वीकार, अनिलांशी वृत्तिसाम्य, ईश्वरशोध, कल्पनाचित्रे, विठ्ठलशोध, तुकारामांचा प्रभाव, निसर्गविषयक जाणिवा, मधुराभक्ती इत्यादी मुद्दे तर शीर्षकासकट पुनरावृत्त झाले आहेत. पृष्ठेच्या पृष्ठे विवेचन पुनरूद्धृत झाले आहे. प्रबंधाचे ग्रंथरूपात करताना हे दोष टाळता आले असते. त्याचप्रमाणे प्रकरणाच्या शेवटी पृ.१३३ व अचानक मध्येच आलेले काही निष्कर्षवजा मुद्दे कशाशी संबंधित आहेत ते कळत नाही. कदाचित इथे काहीतरी मुद्रणदोष दिसतो. तसेच पूर्वी केलेल्या मुद्देसूद व सविस्तर विवेचनाच्या पार्श्वभूमीवर प्रकरणाचे समालोचन विस्कळीत वाटते. त्यातही ग्रंथाच्या समारोपात आलेले काव्यविषयक निष्कर्ष आणि प्रकरणाच्या समालोचनातील तुलनेने प्रभावी निष्कर्ष ह्यांच्यात ताळमेळ दिसत नाही.

काव्यविवेचनानंतरची 'ललितलेख', 'व्यक्तिचित्रे' व 'प्रवासवर्णने' याविषयीची अनुक्रमे ३, ४ व ६ ही प्रकरणे एकाच 'ललितनिबंध' ह्या आकृतिबंधाशी संबंधित प्रकरणे आहेत. 'ललितनिबंध' किंवा 'ललितगद्य' (खरेतर 'ललितगद्य' ही संज्ञा अतिव्याप्त असल्याने ती योग्य नाही, पण तरी अनेक लोक आजही ती वापरताना दिसतात.) हा आकृतिबंध मूळातच वादग्रस्त असा आहे. आनंद यादव यांनी ह्या प्रकारची जी मीत्त्वाच्या व विषयवस्तुच्या प्रमाणाच्या अंगाने 'आठवणी-अनुभव', 'लघुनिबंध', 'प्रवासलेख', 'व्यक्तिचित्र' व 'ललितलेख' अशी उपप्रकारनिष्ठ मांडणी केली आहे ती जवळजवळ अचूक व अभ्यासकांनी अनुसरण्यासारखी आहे. तसा ठाकरे ह्यांनीही काही ठिकाणी यादवांच्या विवेचनाचा आधार घेतलेला दिसतो परंतु ह्या आकृतिबंधाबाबत त्यांचा सर्वत्र संभ्रम दिसतो. 'ललितलेख' ह्या प्रकरणांतर्गत चर्चेत 'ललितनिबंध' ही सुद्धा संज्ञा वापरलेली दिसते. तसेच त्यात प्रवासवर्णनात्मक, स्थळवर्णनात्मक, प्रदेशनिष्ठ, आत्मचरित्रात्मक, चिंतनात्मक, व्यक्तिचित्रणात्मक लेखांचाही विचार केला आहे. पुढे मग 'व्यक्तिचित्रे', 'प्रवासवर्णने' ही स्वतंत्र प्रकरणेही आहेतच. त्यातच खरेतर ह्या व्यक्तिचित्रणात्मक व प्रवासवर्णनपर लेखनाचा विचार व्हायला हवा होता. प्रकरणाला 'ललितलेख' हे शीर्षक देऊन त्यातल्या उपशीर्षकांत 'ललितनिबंधातील लेखकाचे व्यक्तिमत्त्व', 'ललित लेखांतील समाज टीकेचे स्वरूप', 'ललित लेखनातील उथळपणा' असे वेगवेगळे शब्दप्रयोग वापरणे इष्ट ठरत नाही. त्यातच 'विनोदी लेखांचा'ही परमर्श आला आहे, जो स्वतंत्रपणे घेता आला असता. असो. या काही सैद्धांतिक वाङ्मयीन संकल्पनांमध्ये थोडी शिस्त व स्पष्टता असती तर ठाकरे यांनी

अनुक्रमणिका

केलेल्या खूप सविस्तर आणि प्रभावी विश्लेषणास अधिक मोल चढते, एवढेच इथे सुचवायचे आहे. केच्यांच्या ललित निबंधांची वैशिष्ट्ये - (१) वैदर्भीय ग्रामजीवनाचा साकल्पाने परिचय (२) म्हणी, वाक्प्रचार इत्यादी लेखनातील ललित प्रकट करणारे (३) कल्पकता, सूक्ष्म निरीक्षण, भाषाप्रभुत्त्व, विनोदी वर्णनशैली (४) वैदर्भीय कुटुंबजीवनाचे यथार्थ चित्रण (५) वास्तवातील व्यक्तीचे स्वभावविशेष मार्मिकतेने रेखाटणे (६) एकसुरी लेखनपद्धती टाळली (७) व्यक्तिचित्रे जिवंत व अस्सल (८) व्यक्तिचित्रणात तरलता, काव्यात्मता, प्रासादिकता हे गुण सहज येतात (९) माणसांतील विसंगती टिपून रंगविण्याचे सामर्थ्य अशाप्रकारे ठाकरे सांगतात. हे सूक्ष्म विवेचन या ग्रंथाचे सामर्थ्य ठरते. एके ठिकाणी 'केचे-पु.ल' तुलना करताना ठाकरे लिहितात - ''पु. ल. देशपांडे यांच्या साहित्यातून प्रकट झालेल्या व्यक्ती या विनोदाचा भाग म्हणून किंवा आपल्या कल्पनेतून प्रकट झालेल्या आहेत, परंतु केच्यांनी रेखाटलेल्या व्यक्तिरेखा या वरूडच्या मातीचा अस्सल गुणधर्म लाभलेल्या जिवंत व्यक्ती व्यक्ती आहेत.'' पुलंच्या कल्पनाप्रधान (व्यक्ती आणि वल्ली) आणि वास्तवप्रधान (गणगोत, मैत्र, गुण गाईन आवडी, आपुलकी) व्यक्तिचित्रांच्या व त्यांच्या विनोदी लेखनातील अनेकानेक उत्तमोत्तम व्यक्तिरेखांचा नीट विचार न करता येणारी असली विधाने लेखनातील उथळपणा व बाळबोधपणा स्पष्ट करतात व एरव्ही उत्तम ठरू शकणाऱ्या समीक्षेस बाध आणतात. डॉ. विलास खोले यांनी प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे डॉ. ठाकरे ह्या प्रबंधरूप ग्रंथावरच समाधान न मानता पुढेही कसदास समीक्षालेखन करून मराठी साहित्याची सेवा करीत राहोत. ह्या शुभेच्छा !

(<u>साहित्यदिंडीचा वारकरी : मधुकर केचे</u> - डॉ. कोमल ठाकरे, विजय प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती ३१ मार्च २०१२)

<u>नरींद्र आणि भास्कर</u>

मराठी साहित्याच्या साठोत्तरी कालखंडात विचारवंत व साहित्यिकांची एक फळी अशी तयार झाली, जिने आधुनिक मराठी साहित्याचे मराठी व भारतीय विचार वाङ्मय परंपरेपासून तुटलेपण अधोरखित केले. ह्या सर्व विचारप्रक्रियेसाठी त्यांनी इंग्रजांच्या साम्राज्यवादी व वसाहतवादी धोरणास दोषी मानले. मराठी आधुनिक साहित्यातील कसदारपणाच्या अभावाची मूळे देशी परंपरेपासून विलगतेत त्यांनी मांडली, तसेच वसाहतवादी मानसिकतेतून मराठी वा अन्य भारतीय साहित्याच्या मूल्यांकनाच्या पाश्चात्य निकषांवर त्यानी हल्ल चढवला. प्राचीन-अर्वाचीन साहित्यातील विसरलेल्या अनुबंधांचे स्मरण करून दिले. एकप्रकारे भारतियांच्या वैचारिक - मानसिक गुलामगिरीवर नेमके बोट ठेवून त्यातून सुटण्याची धडपड आरंभली. १९८० नंतरच्या काळात ह्या 'देशी' विचारांची ग्रंथरूपे / लेखरूपे सिद्ध होऊ लागली. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे देशी संस्कृतींच्या उच्चाटनाची जी शक्यता निर्माण झाली त्याविरूद्धची ही भारतीय विचारवंतांची - साहित्यिकांची प्रतिक्रिया होती. ह्या प्रतिक्रियेचे खूप साम्य विसाव्या शतकारंभीच्या विवेकानंद - दयानंद - टिळक - गांधी ह्यांच्या पुनरूज्जीवनवादी (चांगल्या अर्थाने) व अस्मितावादी चळवळींशी होते. वसाहतवादी कालखंडामुळे भारतीय विचारकांना स्मृतिलोपाचा विकास जडला आहे आणि भारतीय प्रज्ञेला स्मृतिभ्रंश झाला आहे असे प्रमेय मांडण्यात आले. (उदा. प्रो. धर्मपाल, डॉ. गणेश देवी, डॉ. भालचंद्र नेमाडे, पवन वर्मा इ. विचारवंतांचे लेखन) या पार्श्वभूमीवर प्राचीन मराठीतील महाकाव्यांवर सिद्ध करण्यात आलेल्या व इ. स. २०११ मध्ये आज प्रकाशित झालेल्या डॉ. राजेंद्र डोळके यांच्या 'नरींद्र आणि भास्कर' ह्या स्वतंत्र समीक्षापर ग्रंथाचे महत्त्व आपोआपच अधोरेखित होते. नागपूरच्या लाखे प्रकाशनाने हा ग्रंथ प्रकाशित केला आहे. महानुभाव वाङ्मयाचे व मराठी भाषा-साहित्याचे ज्येष्ठ वैदर्भीय संशोधक स्व. डॉ. सुरेशराव डोळके ह्यांच्या जन्मदाता म्हणून वारसा राजेंद्र डोळके यांना लाभलेला आहे. ह्याचा निर्देश ''...ग्रंथामागची प्रेरणा, हिंमत आणि शक्तीही त्यांचीच आहे'' असा करून लेखकाने त्यांनाच हा ग्रंथ अर्पणही केला आहे. एकप्रकारे ज्ञानाचा वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे येणे हे मराठी साहित्य - संस्कृतीचे महद्भाग्यच म्हटले पाहिजे.

वर उल्लेखिलेल्या 'स्मृतिग्रंथा'तून वाचलेल्या ज्ञाननिष्ठांची आणि प्रज्ञावंतांचीही एक पुष्ट परंपरा सुदैवाने मराठीला लाभली. अर्थात तत्कालीन सुधारणावादाच्या, आधुनिकतावादाच्या व कथित पुरोगामीपणाच्या झंझावातात हे परंपरारक्षणाचे प्रयत्न टीकेचे, हेटाळणीचे व 'प्रतिगामी' मानून फेटाळण्याचे प्रकार झाले. आज २१ व्या शतकात 'देशीवादा'च्या नावाने मोठेमोठे विचारवंत भारतीय परंपरा रक्षणाच्या वा त्याकडे परतण्याच्या गोष्टी करताहेत तेव्हा हा कालमहिमा विलक्षणच म्हटला पाहिजे. डोळके पिता-पुत्र ह्याच ज्ञानवंतांच्या परंपरेचे पाईक ठरतात.

प्रस्तुत ४०० पृष्ठांच्या ग्रंथ हा मूलतः डॉ. राजेंद्र यांनी डॉ. प्रभुदेसाई ह्यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच. डी. पदवीसाठी सिद्ध केलेला या शीर्षकाचा प्रबंध आहे. प्राचीन मराठी साहित्याच्या संशोधन - संपादन - समीक्षेची किती समृद्ध परंपरा मराठीला आहे हे सुज्ञास सांगण्याची गरज नाही. नरींद्र आणि भास्करभट्ट हे महानुभाव सांप्रदायिक दोन कवी आणि त्यांची अनुक्रमे 'रूक्मिणीस्वयंवर' व 'शिशुपाळवध', 'उद्धवगीता' ही

अनुक्रमणिका

महाकाव्ये या ग्रंथात पहिल्यांदाच सविस्तर अभ्यासविषय बनून पुढे येत आहेत. डॉ. वि. भि. कोलते, डॉ. सुरेश डोळके, डॉ. रा. चि. ढेरे, वि. ल. भावे इत्यादींची संपादने, महानुभावीय वाङ्‌मयावरील काही अभ्यासग्रंथ, डॉ. कोलते यांचे भास्करभट्टावरील स्वतंत्र पुस्तक, डॉ. द. भि. कुळकर्णी यांचा 'महाकाव्य' विषयावरील प्रसिद्ध प्रबंध, प्राचीन मराठी वाङ्‌मयेतिहासाचे काही प्रकल्प इत्यादींमधून ह्या दोन कवींचे अभ्यास पूर्वी झालेला आहे. परंतु ह्या दोन कवींच्या चरित्राचा आणि काव्याचा विस्तृत परामर्श घेणारा हा डोळके यांचा ग्रंथ वैशिष्ट्यपूर्ण ठरणारा आहे. प्रस्तुत ग्रंथाचे परीक्षण नव्हे, तर त्याची ओळख वाचकांना करून देण्याचा हा एक प्रयत्न आहे.

एकूण नऊ प्रकरणांतून ह्या समीक्षाग्रंथाची शिस्तबद्ध रचना करण्यात आली आहे. पार्श्वभूमी, नरींद्र आणि भास्कर : व्यक्तित्त्व आणि कर्त्तृत्व, रूक्मिणीस्वयंवर आणि शिशुपाळवधः काही वादग्रस्त प्रश्न, मुलानुसरण, कल्पित व अन्य काव्यरचनांवरील प्रभाव, काव्यदृष्ट्या निरीक्षण, नरींद्र आणि भास्कर यांची महाकाव्ये, समाजदर्शन, तत्त्वज्ञान आणि समारोप, अशी समग्र विश्लेषणाची पद्धत डोळके ह्यांनी अवलंबिलेली दिसते. इथे प्राचीन साहित्यशास्त्राचा वाङ्‌मयीन मूल्यांकनासाठी मुख्यतः आधार घेतलेला आहे. आणि ते साहित्यकृतींचा काळ व स्वरूप ह्यास अनुरूपच आहे. समाजदर्शन, तत्त्वज्ञान ह्या काही प्रकरणांतून आधुनिक विवेचन पद्धतींचाही काही एक स्पर्श ह्या ग्रंथास लाभलेला दिसतो. प्रामुख्याने संपूर्ण ग्रंथाची समीक्षा पद्धती ही भारतीय काव्यशास्त्रीय घटकांच्या अनुरोधाने झालेली आहे. काहींना कदाचित ही या ग्रंथाची एक उणीवही वाटू शकेल.

या ग्रंथात लेखकाचे लक्ष विशेषकरून 'रूक्मिणीस्वयंवर' व 'शिशुपालवध' ह्या काव्यावर केंद्रित झालेले दिसते. त्या तुलनेत 'उद्‌धवगीता' जरा बाजूला पडल्यासारखे झाले आहे. ते तत्त्वज्ञानपर काव्य असल्याने इतर प्रकरणांतील समीक्षानिकषांच्या तुलनेत 'तत्त्वज्ञान' ह्या प्रकरणांतर्गत 'उद्‌धवगीते'चे अधिक विस्तृत विश्लेषण आले आहे. वरवर पाहता प्रबंध ग्रंथाचे स्वरूप ह्या संदर्भात असंतुलित वाटते, पण सूक्ष्म विचार करता व 'महाकाव्य' ह्या संकल्पनेकडे झुकलेले एकूण विवेचन बघता ही मांडणी विषयानुरूपच झालेली दिसते.

पहिल्या 'पार्श्वभूमी' प्रकरणात महानुभाव पंथ - तत्त्वज्ञान - वाङ्‌मय व संस्कृत महाकाव्य लक्षणांची चर्चा प्रामुख्याने आली आहे. नरिंद्र आणि भास्कर ह्यांचे व्यक्तित्त्व शोधण्याचा व कर्तृत्व विशद करण्याचा प्रयत्न दुसऱ्या प्रकरणात लेखक करतात. तिसऱ्यात ह्या दोन्ही काव्याविषयीचे काही वादविषय निकालात काढण्यात आले आहेत, तर चौथ्या 'मुलानुसरण, कल्पित व अन्य काव्यरचनांवरील प्रभाव' या तुलनेने मोठ्या प्रकरणात इतर काव्यांशी व कवींशी तुलना करण्यात आली असून मूलाधारांचा शोध घेण्यात आला आहे. पाचव्या 'काव्यदृष्ट्या निरीक्षणा'च्या प्रकरणात अलंकार व रस या दोन संकल्पनाधारे काव्यात्मतेचे स्वरूप तपासले आहे. सहावे प्रकरण विशेषतः दोन्ही काव्यरचनांना 'महाकाव्य' पदवीस चढविण्याचा साधार प्रयत्न करण्यात लेखक खर्ची घालतो. ''वृत्तरचना व सर्गबद्धता ही बाह्य लक्षणे सोडल्यास अंतरंगदृष्ट्या 'शिशुपालवध' महाकाव्य ठरते'' (पृ.३३५) असा निष्कर्ष काढण्यात आला आहे. 'तत्त्वज्ञान' प्रकरणात 'शिशुपालवध' व 'रूक्मिणीस्वयंवर' यात तत्त्वज्ञान असे नाहीच, तर 'उद्‌धवगीता'मध्ये अद्वैताची झाक स्पष्ट दिसते असा निष्कर्ष डोळके मांडतात. ह्या सर्व विस्तारपूर्वक मांडणीचा अतिशय समर्पक समारोप करताना त्यांनी ह्या काव्यग्रंथोचे मराठीतील नेमके स्थान अधोरेखित केले आहे. ''...या मराठी भाषेच्या सुरूवातीच्या काळातील दोन महाकाव्यांनी संस्कृत महाकाव्यांचे मराठी अवतार उत्कृष्ट रीतीने कसे होऊ शकतात याचे आदर्श घालून दिले आहे... दुर्दैवाने ही काव्ये काही काळानंतर सांकेतिक लिप्यांच्या कड्याकुलपात बंद झाल्याने उत्तरकालीन काळाची स्फूर्तिस्थाने ठरू शकली नाहीत. या विवेचनाने मराठी रसिक नरींद्राला आद्य व सर्वश्रेष्ठ महाकवी व भास्कराला त्याखालोखाल श्रेष्ठ कवी ही योग्यता एकमुखाने बहाल करतील, यात काही शंका नाही '' (पृ.४०८) ह्या ग्रंथाची विवेचनशैली विद्वत्तापूर्ण असूनही ओघवती आणि प्राचीन काव्यशास्त्रसापेक्ष असूनही आकलनसुलभ व प्रासादिक असल्याने विद्यार्थी-अभ्यासकांना हा ग्रंथ 'आधार व मार्गदर्शक' वाटल्यावाचून राहणार नाही. त्यामुळे डोळके ह्यांच्या प्रस्तुत ग्रंथाविषयीचा डॉ. द. भि. कुळकर्णी यांचा ''प्रस्तुत ग्रंथात संशोधनविद्या आणि साहित्यविद्या यांचे एकीकरण झालेले असल्यामुळे सहजच या लेखनास संशोधनमूल्य व समीक्षामूल्य प्राप्त झाले आहे... साहित्याच्या प्रत्येक गंभीर अभ्यासकास संग्रही ठेवावासा वाटेल असा हा मौलिक ग्रंथ आहे'' (पाठपृष्ठ) हा अभिप्राय प्रत्यक्षात फलद्रुप होवो अशी कामना आपण करू या !

(**<u>नरींद्र आणि भास्कर</u>** - डॉ. राजेंद्र गणेश डोळके, लाखे प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती १०-१२-२०११)

❚ डॉ. राजेंद्र नाईकवाडे
४८, योगायोग, जुना नंदनवन परिसर,
नागपूर ४४० ००९
भ्रमणभाष : ९८५०३५१०२५

अनुक्रमणिका



।। पुस्तक परीक्षण ।।

आनंदपथिकाची आनंदयात्रा

डॉ. लीना रस्तोगी

■

संस्कृत काव्यमर्मज्ञांची धारण आहे की काव्याच्या आस्वादनातून ब्रह्मनंदाच्या तोडीचा आनंद मिळू शकतो. मात्र केवळ "ट ला ट, री ला री" अशी सामान्य काव्यरचना तसा आनंद देऊ शकत नाही हेही तितकेच खरे! म्हणूनच तर "अमृतातेही पैजा जिंकणारी अक्षरे मेळविणारी" माऊली म्हणते की, "वाचे बरवे कवित्व । कवित्वी बरवे रसिकत्व। रसिकत्वीही परतत्त्व स्पर्शु" असणारी रचनाच असा ब्रह्मानंद देण्यास समर्थ असते! अशी परतत्त्वाचा स्पर्श असणारी कविता काही दिवसांपूर्वी वाचायला मिळाली. कै. ज. श्री. देशपांडे ह्यांच्या "आनंदसूक्त" ह्या कवितासंग्रहात - आणि खात्री पटली की काव्यासास्वाद हा ब्रह्मानंदसहोदर असू शकतो!

"आनंदसूक्त" मध्ये एकूण ३२६ कविता आहेत. त्या वाचताना जाणवते की हे एका आनंदयात्रिकाचे स्वानुभूतीचे उत्स्फूर्त उद्‌गार आहेत. Poetry is a spontaneous overflow of powerful feelings recollected in tranquility असे म्हणतात. पण येथे तर tranquility हाच स्थायी भाव आहे! येथे recollection ची गरजच नाही! हा आनंदाविष्कार उत्स्फूर्त, ताजा, टवटवीत आहे, तरीही त्याचे अधिष्ठान मात्र दीर्घ चिंतन हेच आहे. प्रत्येक ओळीला तत्तचिंतनाची भक्कम बैठक आहे.

ईश्वर हा ह्या कवीचा जिवलग मित्र! म्हणूनच तो सहजपणे लिहून जातो,

"न मी जरी, जगात कोण कौतुके तुझी करी?" (पृ.२६)

इतके खेळीमेळीचे नाते असले तरी ते तितकेच उत्कट आहे. गूढ आहे.

"घेऊन एकदाचा तव पूर्णपणे ठाव ।
मी वल्हवीन अंती माझी स्वतंत्र नाव ।।"

हा निर्धार कवीच्या कर्मयोगचिंतनातूनच स्फुरलेला आहे. पण स्वतंत्र नाव वल्हवितानाही कवी क्षणभरही त्या विश्वनियंत्याला विसरलेला नाही. त्याचे शब्द आहेत,

"आमुच्या रक्तात खेळुनि विश्वसमरी रंगशी ।
काही असो! दोस्ती तुझीमाझी अशी निर्भंगशी।।" (पृ.३६)

ही 'निर्भंग' दोस्ती काही वेळा 'मी वल्लभा, तो कांतु' अशा माधुर्यभावाचेही रूप घेऊन येते आणि मग अशा दिलखेचक ओळी प्रकटतात की,

"तुझी राधाराणी झुरूनिझुरूनीया युगयुगी।
उभी राहे मोहे थिजुनि बुजुनी सन्मुख उगी।।"

कालिदासाच्या 'शैलाधिराजतनया न ययौ न तस्थौ' ह्या पंक्तींची आठवण अगदी अनायासेच ह्या ओळी जागवून जातात! जुन्या मराठी काव्यरसिकांनी कवींचे तीन प्रकार कल्पिले होते. संतकवी, पंतकवी आणि तंतकवी! ते प्रकार आता इतिहास जमा झालेत. त्यानंतर रविकिरण मंडळाने मराठी कवितेला नवी दिशा दाखवली. कवीची बंदिस्त प्रेरणा उन्मुक्त होऊन बहरू लागली. पुढे भावगीतांनी व निसर्गवर्णनाच्या प्रेमाने नटलेल्या कवितांनी मराठी रसिकावर मोहिनी घातली. पुढे काळाच्या ओघात कवितेचे अनेक प्रकार उदयाला आले, पण कोणत्याही प्रकारच्या चौकटीत बंदिस्त होऊ न शकणारी एक वेगळीच कविता 'आनंदसूक्त'त आहे. ती वाचकाला अंतर्मुखही करते आणि खिळवूनही ठेवते.

मजा अशी की संत, पंत आणि तंतकवी (शाहीर) ह्या सर्वांची चोख वैशिष्ट्ये ह्या कवीच्या रचनात गुण्यागोविंदाने नांदतात आणि तरीही हा कवी कोणत्याही एका सीमित साच्यात मावत नाही. त्याची आभा वेगळीच! अत्यतिष्ठत् दशाङ्गुलम्! शाहीराची लालस मनोवेधी शब्दकळा,

आत्मसात केलेले पंतकवींचे पांडित्य आणि या दोहोंना लाभलेले, संतकवींचे आत्मानुभूतीचे अधिष्ठान असा काही वेगळाच बाज ह्या कवितांचा आहे. 'थिजुनि बुजुनी' उगी राहणाऱ्या राधाराणीच्या वस्त्राचा एक धागा शृंगाराचा आहे खरा, पण तिच्या 'झुरण्या'तून विरहिणीची आत्माहुतीतील बेहोषीच मनाला लोभावून जाते! भक्ती आणि शृंगार यांचा मनोज्ञ संगम कवीच्या रचनातून पदोपदी - म्हणजे प्रत्येक पदातून आणि पावलोपावली - जाणवतो !

वस्तुतः कै. ज. श्री. देशपांडे माझे पूर्वपरिचित नाहीत. त्यांच्या रचना मी प्रथमच वाचल्या, आणि डोळ्यापुढे अशी एक आत्ममग्नमूर्ति उभी राहिली की जी बोले, चाले, हिंडे! परी समाधी न खंडे!

उदा. वाट पहात पहात तुझी सदा मनोमन ।
काया उरकते कामे कशीबशी क्षणोक्षण ।।

ह्या ओळी वाचताना जाणवते की

यस्त्विन्द्रियाणि मनासा नियम्यारभतेऽर्जुन ।
कर्मेन्द्रियैः कर्मयोगमसक्तः स विशिष्यते ।।

हा गीतेतील उपदेश अणुरेणूत साठवून घेतलेल्या एका मनस्वी कर्मयोग्याची ही अनुभूती आहे! कायेने कर्मे 'उरकणारा' हा कवी मनाने मात्र सतत आत्मचिंतनात मग्न आहे. म्हणूनच,

रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिन्द्रियैश्वरन् ।
आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति ।।

अशी ह्या कवीची 'प्रसादमय' अवस्था आहे. ही अवस्था अत्यंत सहज, स्वाभाविक आहे, म्हणून तर बिनदिक्कतणे हा कवी लिहून जातो की,

''मनोभावे झाले समरस तुझ्याशी सहज मी'' (पृ.९७)

असे 'सहज'तेने 'समरस' होता येणे सोपे असते का? त्यासाठी विलक्षण साधना लागते - मात्र त्यानंतर लाभतो तो निखळ, निखालस आनंद! मग कवी लिहून जातो

''एकमेकांचा वारसा मिळाला !
एकमेकांचा आरसा मिळाला!'' (पृ. ९६)

वस्तुतः अज्ञेय, अमूर्त असे परमतत्त्व स्वतःत प्रतिबिंबित व्हावे, म्हणजेच स्वतः आरसा बनावे अशी कामना बहुतेक सर्वच कविहृदयी साधकाची असते. पण ह्या कवीची झेप काही औरच आहे. त्याची भाषा चक्क 'एकमेकांचा' आरसा होण्याची आहे! इतकी जवळीक तर प्रत्यक्ष संतकवींनाही साधता आली नसावी. 'पतितपावन न होशी म्हणुनी जातो माघारा' म्हणत संतांनीही निमूटपणे शरणागती पत्करली. पण हा कवी मात्र विरहाच्या क्षणीही करूणाष्टके आळवीत नाही, तर दिमाखात म्हणतो की 'भीक नाही मागणार, भेटशील आपोआप' (पृ. ४१) हा आत्मविश्वास विलक्षण आहे. तो मधुराद्वैतातून उद्‌भवलेला असावा.

''नहीं खोलत आज किंवारा'' असा लोभस फणकारा दाखविणाऱ्या मधुराद्वैतार्य गुलाबराव महाराजांची आठवण उपर्युक्त ओळी वाचताना आपोआपच जागते. कवीच्या चिंतनवस्त्राला नक्कीच मधुराद्वैताची मनमोहक झालर आहे!

ह्या कवीच्या हृदयात निरहार्त राधाराणी सोबतच ईश्वरचा अंतरंगसरवाही दडलेला आहे. आता हेच पहा -

''अधीर जाहलो मनात, थंड का अजून तू ?
का न येतसे अजून प्रेम मानसी उतु !'' (पृ. १०७)

दर्शन होत नाही म्हणून कविमन 'अधीर' झाले आहे खरे, पण त्यातही बरोबरीच्या भावनेची, जिवलगपणाची डूब आहे. जर मी तुझ्या दर्शनासाठी अधीर आहे तर तूही तितक्याच उत्कटतेने अधीर व्हावयास हवे हा त्यातला ध्वन्यर्थ! म्हणूनच कधी कधी आपुलकीने भरलेली तक्रारही कवी करतो की

''सलगीचा सवदा न पटे तुला
म्हणुनि लोटिशि दूर असा मला!'' (पृ.२९)

मात्र कधी कधी शांकरतत्त्वज्ञान ह्या दर्शनलालसेवर ही कुरघोडी करते आणि मग कवी म्हणून जातो

''चित्त चैतन्ये विशद जाहलेले।
नसेना का तव रूप पाहिलेले।।'' (पृ. ११५)

आत्मचैतन्याची अशी भानपूर्वक जाणीवच कवीला सकारात्मक बनविते असे वाटते. कवीच्या आनंदयात्रेचे उगमस्थान म्हणजे ही सकारात्मकताच असावी. तिच्याच बळावर कवी म्हणू शकतो की

''असा रोजचाच करू दिव्य दसरा साजरा !
आणि खेळगडी करू रोज रोज विश्वंभरा!''

प्रस्तु संग्रहातील एकूण ३२६ कवितांचे सहा खंडात विभाजन करून संपादिकेने औचित्य साधले आहे. त्यातील सहाव्या विभागत कवीच्या प्राथमिक रचना आहेत. पहिला विभाग कवीच्या आत्मशोधाच्या प्रवासातील असावा इतर चार विभागातील रचना मात्र कवीच्या परिणतप्रज्ञ प्रगल्भ अवस्थेतील असावी असे वाटते. त्या विभागांना संपादकांनी अतिशय अर्थगर्भ बोलकी शीर्षक दिलेली आहेत. प्रेमरंग, आत्मरंग, सायुज्यरंग आणि विश्वरंग. अशी शीर्षके दिल्याबद्दल संपादकांचे अभिनंदन करावेसे वाटते.

अनुक्रमणिका

पण गंमत अशी की हे सारे रंग वेगळे करताच येत नाहीत! कवीच्या प्रेमरंगात आत्मरंगाची गहिरी छटाही बेमालूमपणे मिसळलेली आहे आणि त्यावर सायुज्यरंगाची झळाळीही आहे! मुळात ते प्रेमच आत्मरंग लेवून सायुज्याला पोहचलेले आहे! आणि जेव्हा हे भगवत्प्रेम वैराग्य-व्यतिरेक ओलांडून अन्वयानुभूती घेऊन विश्वात्मक बनते तेव्हा त्यावर 'विश्वरंग' ही चढतो! म्हणूनच आनंदपथिकाच्या ह्या काव्य प्रवासाची खुमारी काही वेगळीच आहे. त्या प्रवासात कधी कैफ आहे - उदा.

''आनंदाच्या तंद्रीमाजी पंचशरीर पोहते'' (पृ. १६६)

कधी अहंलोपातली कृतकृत्यता आढळते. उदा.

''धुके वितळून गेले, रंगमहाल खुलला!'' (पृ. ४१२)

तर कधी उन्मनी अवस्थाही जाणवते. उदा.

''अंगअंगी उन्माद तर भरावा'' (पृ. ९०)

कवीचा हा प्रवास 'कालातीत' आहे तो म्हणतो -

''जीवनाची शुद्धबुद्ध सर्व काळात हरली'' (पृ. १६२)

म्हणूनच, ह्या कालजयी पथिकाच्या दृष्टीने वसंत कधी लोपतच नाही. कवी स्वतःच् वसंत होऊन जातो! त्याचे शब्द आहेत,

''दुजा मी न राहे! जहालो वसंत!'' (पृ. १२९)

अचिंत्याचा वेध घेत घेत हा कवी अलगदपणे चिदानंदाच्या प्रांगणात उतरतो. त्याचे मैत्र चैतन्याशीची

''अनंताच्या पंथी निजसुहृद मी एक परम'' (पृ. २८१)

असे गात गातच हा पथिक परमोच्च अवस्थेपर्यंत पोचून म्हणतो, 'माझे फिटले पारणे!' आणि तरीही ही आनंदयात्रा संपत नाहीच, कारण इथे काळच खुंटलेला असतो! म्हणून कवीचे शब्द आहेत,

''माझे फिटले पारणे
आता स्वच्छंदे णे!'' (पृ. २८४)

'आनंदसूक्ता'तील कविता म्हणजे एका तत्त्वचिंतकाचे उत्स्फूर्त उग्दार आहेत. अशा रचनांत प्राधान्य असते ते हृदयाला भिडणाऱ्या आशयाला. वृत्तयोजना, अलंकार इत्यादी बाह्य उपांगे तेथे गौणच ठरतात. तरीही उत्प्रेक्षा (पृ.३८९), विरोधाभास (पृ.४१०) असे काही अलंकार ह्या संग्रहात आढळतात, पण ते अगदी सहजगत्या आलेले आहेत, अलंकारांच्या कृत्रिम सोसापोटी आलेले नाहीत. काही ठिकाणी अनुप्रासही दिसतात. तेही असेच अनायास उत्स्फूर्ततेतून. उदा.

''अंगीअंगी निःसंग होऽनीया
दंग झालो मी रंगमहाली या'' (पृ. ११४)

एखाद्या ब्युटीस्पॉट सारख्या तीन छंदोमुक्त कविता वगळल्यास या एकूण संग्रहातील ३२३ कविता लयबद्ध आहेत. भुजंगप्रयात, द्रुतविलंबित, प्रमाणिका इत्यादी विविध वृत्ते कवीने हाताळली आहेत, पण शिखरिणी वृत्त कवीचे लाडके असावेसे वाटते. दिंडी, चंद्रकांत इत्यादी खास छंदही येथे आढळतात. माधव जूलियनांचा आवडता आनंदकंद छंदही कवीने हाताळला आहे, मात्र बहुतांश रचना मराठीच्या अष्टाक्षरी छंदात आहेत. कवीचे वृत्तज्ञाननैपुण्य स्पष्टच आहे. अगदी नगण्य असा छंदोभंग फक्त सहा ठिकाणी आढळतो. (पृष्ठ ७३, ८४, ८६ (यतिभंग), १२१, १६५ व ३८२) पण तोही गालबोटासारखाच!

प्रा. कुसुममाला कोलारकरांनी संपादनासाठी घेतलेले श्रम पदोपदी जाणवतात. कवीच्या 'आनंदलहरी' ह्या पहिल्या कवितासंग्रहासाठी पं. महादेवशास्त्री जोशींनी लिहिलेली प्रस्तावना आणि कवीचे निवेदन छापून त्यांनी औचित्य साधले आहे. त्यांच्या स्वतःच्या भावना प्राक्कथनात बोलक्या झाल्या आहेत. त्या निश्चितच अभिनंदनास पात्र आहेत. 'आनंदसूक्त' हे शीर्षकही अतिशय बोलके आहे. ते कुणी दिले हे मला ज्ञात नाही, पण तेही जर संपादिकेने दिले असेल तर त्याबद्दल त्यांचे खास अभिनंदन, कारण ह्याहून अधिक चपखल शीर्षक प्रस्तुत कवितांना लाभूच शकले नसते! 'आनंदसूक्त' हे एक संग्राह्य पुस्तक आहे ह्याबद्दल वाद नसावा! इति शम् ।

'आनंदसूक्त', ज. श्री. देशपांडे,विजय प्रकाशन, नागपूर - ४४० ०१२. पृष्ठ संख्या ४४२ । किंमत : ४५० रू.

। डॉ. लीना रस्तोगी
संस्कृत भाषा प्रचारिणी
सिव्हील लाईन्स,
नागपूर - ४४० ०१०
भ्रमणभाष : ९७३००१२९०८

अनुक्रमणिका



।। पुस्तक परीक्षण ।।

मोहकुळ

डॉ. सौ. प्रज्ञा आपटे

■

कविता हा सध्याचा सगळ्यात लोकप्रिय साहित्यप्रकार आहे. यातही केंद्रस्थानी 'बाई' असणाऱ्या स्त्रीवादी कवितेने आपले एक स्थान निर्माण केले आहे. नेहा भांडारकर यांच्या 'मोहकुळ' या संग्रहातील एकूण २५ कवितांपैकी अनेक कविता अशाच प्रकारच्या अत्यंत आत्मनिष्ठ कविता आहेत. आजच्या प्रगत, वेगवान विज्ञानयुगात समाजात, कुटुंबात, भावनिक संबंधात जे बदल घडत आहेत ते अशा प्रकारच्या बहुस्तरीय कवितेमधून अत्यंत मोकळेपणाने प्रकट होताना दिसतात. यातील काही कविता ८ ओळींच्या तर काहींनी कवितासंग्रहाची ३-४ पाने व्यापली आहेत.

एकमेकांच्या ओढीने, मोहाने, एकमेकांना शोधणारे 'तो' व 'ती'चे दोन समांतर किनारे कवयित्रीला जाणवतात. त्यांचे मनोमीलन अशक्यप्राय असल्याचा उल्लेख 'किनारा' या कवितेत आहे. आयुष्य म्हणजे 'सुप्त मेळ' (हार्मनी) याचेही भान या लेखनातून जाणवते. कधी किंचित एकसुरीपणा यातून जाणवतो पण आक्रस्ताळेपणामात्र कवयित्रीने टाळला आहे. तरीही हळवा प्रेमानुभव, भावविवशता, सोशिकता, त्याग याच्या पलीकडे जाणारी ही अत्याधुनिक कार्पोरेट जगातली स्वतंत्र व मोकळी वाट आहे. आजच्या प्रगत, वैभवसंपन्न भासणाऱ्या समाजाची कुरूप, अव्यक्त राहिलेली बाजू या कवितातून आकळतें. एका कवितेत कवयित्री म्हणते की - 'शहाजहानने कलेवर दफन करण्यासाठी बांधला असावा ताजमहाल पण आजच्या प्रियकराने तर प्रेमाचे धिंडवडे काढण्यासाठीच... हे कटू सत्य उमगले आहे' या विश्वातला 'तो' तिला कधी निव्वळ यंत्रमानव भासतो (निःशब्द उत्तर) या जगण्यात 'तू तुझाच अन् मी माझीचं' हे निरीक्षण पुढे यात नोंदवले आहे. परंपरागत हळुवार पण जपणाऱ्या नव्हे तर तीव्र प्रतिक्रिया नोंदवणाऱ्या या कविता हुरहूर, काहूर, विरह-मीलन, पराधीनता-गुलामी यांना मागे टाकत, सामर्थ्याचा स्वर उमटविण्याची आकांक्षा असणाऱ्या कविता आहेत असे जाणवते. स्त्री-पुरूषातील परस्पर आकर्षण, यातून निर्माण होणारे नात्याचे बंध आणि या मोहबंधातून व्यक्त होणारी कविता असा एक स्वतः कवयित्रीने 'मोहकुळ वृत्तांत' प्रस्तावनेमध्ये नोंदवला आहे. नवीनच शब्दकळा 'मोहकुळ'या शीर्षकापासून जाणवते. संग्रहातून गद्याकडे झुकणारी आविष्काराची शैली जाणवते. 'कृष्णविवर' ही कविता विज्ञानातील प्रतिमा रंगवणारी आहे. सामाजिक, प्रेमविषयक, निसर्गपर अशा वर्गीकरणात जरी त्या कविता बसत नाही तरी तेच विषय अनोळखी प्रतिमांमधून समकालीन विस्कळितपणा घेऊन शब्दबद्ध होतात. बर्म्युडा ट्रॅंगल, ब्लॅकहोल, ययाती, एकलव्य या प्रतिमांचे कवयित्रीला जे अपेक्षित संदर्भ आहेत त्यातही असांकेतिकता आहे. 'आयुष्य हे सुखदुःखाने भरलेले धुपाटणे आहे' असे कवयित्रीला वाटते. अनेकवेळी गद्यप्राय भासणाऱ्या या कवितेतील शब्दांचा अंदाज लावणे असांकेतिकतेमुळे आणि दूरान्वयामुळे थोडे कठीण जाते. 'कवितेचा रिमेक' मध्येही 'जुन्या अनुभवातून नवं' असं स्वतःच्याच या कवितेचे स्वरूप कवयित्रीने बऱ्याच प्रयत्नांनी उलगडून दाखवले आहे.

यानंतरच्या काळात 'घर' बाईला मर्यादाबद्ध करून ठेवू शकणार नाही. काळाच्या भोवऱ्यात गरगरत हतबलपणे जगायचे आता यापुढे मान्य होण्यासारखे नाही. एकविसाव्या शतकात स्त्रीमनाची धाडसी गाणी गाण्याचा मानस त्या निमित्ताने कवयित्रीने व्यक्त केला आहे. त्यांच्या मनातील स्त्रीमनाच्या गाण्याला, आकांक्षांना आकाशही अपुरे ठरावे अशा शुभेच्छा देते.

(**मोहकुळ** : नेहा भांडारकर, विजय प्रकाशन, सीतावर्डी, नागपूर - १२, पृष्ठ - ५१, मूल्य - ८० रू.)

■ **डॉ. सौ. प्रज्ञा आपटे**
सावली हॉस्पिटलच्या वर दत्त निवास,
धरमपेठ, नागपूर - १०
दूरध्वनी : ०७१२ २५२११७१



।। पुस्तक परीक्षण ।।

कोरकूंचा भाषिक - सांस्कृतिक दस्तऐवज

डॉ. अण्णा प्रल्हादराव वैद्य

■

मानवी भाषेचा शास्त्रीय पद्धतीने विचार भारतात प्राचीनकाळी झाला आहे. संस्कृत भाषेची व्याकरण व्यवस्था पाणिनी व त्यानंतरच्या पंडितांनी मांडल्याचे उल्लेख प्राचीन ग्रंथामध्ये आहेत. पाश्चात्य देशामध्ये लॅटिन भाषेच्या संदर्भात अशी शास्त्रीय अभ्यासाची परंपरा सुरू होती. भारतीय व पाश्चात्य या दोन्ही परंपरामध्ये ऐतिहासिक अभ्यास हे एक साम्य असल्याचे आपल्याला जाणवते. साधारणतः भाषेच्या ऐतिहासिक अभ्यासाला अठराव्या शतकात सुरूवात झाली. विल्यम जोन्स यांनी या अभ्यासपद्धतीचा पाया रचला. एकोणविसाव्या शतकात तौलनिक भाषाविज्ञानाचा अभ्यास सुरू झाला. विसाव्या शतकात वर्णनात्मक भाषाविज्ञान व त्यानंतरच्या काळात समाजभाषा वैज्ञानिक अंगाने भाषेच्या अभ्यासाला गती मिळाली.

महाराष्ट्रापुरता विचार केल्यास १९५४ च्या आसपास परिषदेच्या माध्यमातून भाषेच्या शास्त्रीय अभ्यासाविषयी चर्चा व्हायला लागली. गेल्या पन्नास वर्षांमध्ये मराठी भाषा व तिच्या बोली या संदर्भात संशोधन झाले व सुरू आहे. मु. श्री. कानडे, ना. गो. कालेलकर, कृ. पा. कुलकर्णी, श्री. न. गजेंद्रगडकर, प्र. न. जोशी, ग. ना. जोगळेकर, स. ग. मालशे, अशोक केळकर, हे. वि. इनामदार, मिलिंद मालशे, अंजली सोमण, कल्याण काळे व अशा अनेक मंडळींनी आपल्या वेगवेगळ्या ग्रंथामधून मराठी भाषावैज्ञानिक अभ्यासाची मीमांसा केली आहे. यातूनच मराठी भाषा व बोली च्या संदर्भात संशोधनाला गती मिळाली.

''कोरकू बोली-वर्णनात्मक आणि समाजभाषा वैज्ञानिक अभ्यास'' हा देवयानी प्रकाशन, मुंबई या प्रकाशन संस्थेने फेब्रुवारी २०१२ मध्ये प्रकाशित केलेला ग्रंथ म्हणजे डॉ. काशीनाथ बऱ्हाटे यांच्या आचार्य पदवीच्या संशोधन प्रबंधाचे ग्रंथरूप होय.

सध्या भाषेच्या क्षेत्रात मूलभूत व भरीव काम करणाऱ्या संस्था व संशोधक संस्थेने अल्प आहेत. जागतिकीकरणाच्या रेट्यात अनेक भाषा कृत्रिम प्राणवायूवर जिवंत आहेत. अशा अवस्थेत मराठी भाषेची अवस्था फार नाजुक आहे. हे आपण जाणतो मराठी भाषिक प्रांताच्या आसपास डोंगराळ भागात राहणाऱ्या अनेक आदिवासी जमाती आहेत. कोरकू ही अमरावती जिल्ह्यातील मेळघाट परिसरात वास्तव्यास असलेली आदिवासी जमात आहे. कोरकू आदिवासी जी भाषा बोलतात तिला 'कोरकू बोली' असे म्हणतात. सातपुडा पर्वतरांगाचा मध्यप्रदेश व महाराष्ट्राच्या सीमेवरील ही जमात अतिदुर्गम जंगलात वास्तव्यात आहे. अनेक समस्यांचा सामना करीत कोरकू लोक आपले जीवन जगतात. त्यांनी आपल्या परंपरा जोपासल्या आहेत. पूर्वापार चालत आलेले विधी, परंपरा, सण, उत्सव, गाणी लोककथा, नृत्य संगीत याबाबत कोरकूंची वेगळी ओळख आहे. कोरकूंच्या जीवनाचा समाजशास्त्रीय अंगाने अभ्यास वेगवेगळ्या पातळीवर सुरू आहे.

डॉ. बऱ्हाटे यांनी कोरकू बोलीच्या संदर्भात केलेले संशोधन हे मौलिक स्वरूपाचे आहे. कोरकू बोलीचे समाज भाषावैज्ञानिक दृष्टिकोनातून त्यांनी केलेले संशोधन व काढलेले निष्कर्ष महत्त्वाचे आहेत. हा ग्रंथ कोरकू बोली भाषेचा शास्त्रशुद्ध, विस्तृत व मार्मिक असा महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. आचार्य पदवीच्या या शोधविषयाचे महत्त्व लक्षात घेता भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाअंतर्गत येणारी म्हैसूर येथील सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन लँग्वेजेस या संस्थेचे या ग्रंथाच्या प्रकाशनासाठी अनुदान प्राप्त झाले आहे.

३४० पृष्ठसंख्या असलेल्या या ग्रंथाचे मुखपृष्ठ आकर्षक आहे. मलपृष्ठावरील भाषेसंदर्भात सर्वसमावेशक असे उल्लेखनीय टिपण मुद्रणदोषांचे अत्यल्प प्रमाण असणारा हा ग्रंथ आहे. अपेक्षित ठिकाणी कोष्टके आहेत. हा ग्रंथ तीन भागात

अनुक्रमणिका

विभागला असून पहिल्या भागात कोरकू बोलीचे स्वनविज्ञान, रूपिमविचार, वाक्यविचार दुसऱ्या भागात कोरकू बोलीची समाजभाषा वैज्ञानिक मांडणी व तिसऱ्या भागात परिशिष्टे व संदर्भग्रंथ सूचीचा समावेश आहे.

कोणत्याही ग्रंथलेखकाची भूमिका ही जेवढी स्पष्ट तेवढी त्या ग्रंथाची यशस्विता सिद्ध होत असते. आपली भूमिका वाचकांच्या समोर ठेवताना डॉ. बऱ्हाटे म्हणतात, ''सातपुड्याच्या कुशीत राहणाऱ्या एकांतप्रिय मितभाषी निसर्गप्रेमी आणि अनेक सांस्कृतिक मूल्ये जोपासणाऱ्या कोरकूचा शिबिराच्या निमित्याने संपर्क आला त्यांनी जोपासलेल्या सामाजिक व सांस्कृतिक संचिता सोबतच त्यांच्या बोलीने मनात कुतुहल निर्माण केले'' (पृ.५) डॉ. मधुकर वाकोडे यांचे आशीर्वाद डॉ. बऱ्हाटे यांना मिळाले आहेत.

प्रास्ताविकामधून लेखकाने वर्णनात्मक समाजभाषा वैज्ञानिक परंपरांचा संक्षिप्त आढावा घेतला आहे. यामध्ये अमरावती जिल्ह्यातील कोरकू चे वास्तव्य, त्याच्या सभोवतीचा प्रदेश, त्यांचे सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे संदर्भ नोंदविले आहे. कोरकू बोलीची व्याकरणीक संरचना नोंदवणारे जॉन ड्रेक यांच्या संदर्भाची नोंद डॉ. बऱ्हाटे यांनी घेतली आहे. शिवाय कोरकू बोलीची वैशिष्ट्ये, आदिवासींच्या बोलींच्या अध्ययन व संशोधनाची आवश्यकता इत्यादी घटकांचा संक्षेपाने उल्लेख आला आहे. कार्यपद्धती अंतर्गत डॉ. बऱ्हाटे यांनी डॉ. सु. बा. कुळकर्णी यांच्या म. सा. प मधील 'बोली भाषांचा अभ्यास' या लेखातील दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार आपल्या संशोधन कार्याची दिशा ठरविली. शब्दावली व वाक्यावलीसाठी डॉ. शं. गो. तुळपुळे यांच्या प्रश्नावलीचा आधार घेतला. कोरकू बोलीतील शब्दसंकलनासाठी घर, गाव, शेत, जंगल, पशू, प्राणी यांच्यात चालणाऱ्या क्रिया याविषयीचे शब्द गोळा केले. कोरकूचा सण, उत्सवाच्या वेळी लोकगीते ध्वनीमुद्रित केली. अत्यंत चिवटपणे डॉ. बऱ्हाटे यांनी हे संशोधन केले.

पहिल्या प्रकरणात स्वनिमविचार अंतर्गत कोरकू बोलीतील स्वनिमाचे वर्गीकरण, त्याची वैशिष्ट्ये, स्वर व व्यंजन स्वनिमाचे वर्गीकरण, व्यंजन स्वनिमाचा विनियोग, खंडाधिष्ठित स्वनिम, स्वनिम संयोग, अवयव संरचना इत्यादीचे तपशिलातून विवेचन केले आहे. अवयव संरचना या घटकामध्ये डॉ. बऱ्हाटे यांनी कोरकू बोलीतील शब्दांच्या अवयवाचा सूक्ष्म अभ्यास करून काढलेले निष्कर्ष व्याकरणाच्या दृष्टीने अत्यंत मोलाचे आहेत. हा भाग काहीसा तांत्रिक शास्त्रीय असा भाग असल्याने तो मुळात बारकाईने वाचण्याचा व समजून घेण्याचा भाग आहे.

दुसऱ्या प्रकरणात कोरकू बोलीतील रूपिमविचाराचा विस्ताराने आढावा लेखकाने घेतला आहे. भाषिक रूपातील अर्थदृष्ट्या लघुत्तम असणाऱ्या घटकाला रूपिका ही संज्ञा आहे. स्वर व व्यंजन यांच्या विविध सानुक्रम रचना कोरकू बोलीत आहेत. त्याची बहुविध प्रकारातील आतंरवैशिष्ट्यासह तपशिलवार मांडणी डॉ. बऱ्हाटे यांनी केली आहे. यामध्ये कोरकूचे रूपिम वर्गीकरण, शब्दसिद्धी, वचन प्रत्यय, लिंगप्रत्यय, विभक्तीप्रत्यय, सामासिकता, समासाचे वर्गीकरण, अभ्यस्तता, नाम, सर्वनामे, विशषणे, क्रियापदे, काळ, अव्यये इत्यादीची विस्ताराने मराठी रूपांतरासह केलेले विवेचन सुटसुटीत आहे. एकूण वीस निष्कर्ष 'रूपिमविचार' या प्रकरणाच्या अंती लेखकाने काढले आहेत ते मौलिक स्वरूपाचे आहेत.

तिसऱ्या प्रकरणात कोरकूची वाक्यरचनेची साक्षेपी चिकित्सा डॉ. बऱ्हाटे यांनी नोंदविली आहे. वाक्यरचना ही कोणत्याही भाषेची व्यावहारिक पातळीवरची क्रिया असते. वाक्याचे दोन भाग असतात. पूर्वाधाला उद्देश व उत्तरार्धाला विधेय असे म्हणतात. पूर्वाधात नाम, सर्वनाम व विशेषण याचा समावेश असतो तर विधेयामध्ये क्रियाविशेषण हे वाक्याच्या शेवटी येते. कोरकू बोलीत वाक्य विचाराअंतर्गत नामपदबंध, विशेषण, क्रियापदबंधाचा विस्तार, प्रयोग वाक्यरचना प्रकाराचे विस्ताराने विवेचन केले आहे.

मूळात भाषा ही समूहाची निर्मिती आहे. माणूस प्रभावी संदेशवहनासाठी भाषा वापरतो. माणसाच्या विकासाच्या टप्प्यात महत्त्वाची भूमिका भाषेने बजावली आहे. समाज व संस्कृतीचा एक अविभाज्य भाग म्हणून भाषा कार्यरत असते. यातून भाषेचे समाजपातळीवरील कार्याचे स्वरूप निश्चित करणारी समाजभाषा वैज्ञानिक शाखा अलिकडच्या काळात निर्माण झाली. त्याआधारे सैद्धांतिक मांडणी झाली आहे, पुढे होत राहील. ही प्रक्रिया कोरकू बोलीच्या संदर्भात शोधतांना प्रकरण चार मध्ये डॉ. बऱ्हाटे यांनी कोरकूतील व्यक्तिनामे, विशेषनामाचे प्रयोग, कोरकू बोलीची संदेशनात्मक क्षमता, ग्रामनामे, नद्या, कुलनामे, गोत्र, सर्वनामांचे प्रयोग, नातेसंबंध यासह कोरकूवर अन्य भाषेचा प्रभाव व त्यातून निर्माण झालेले भाषिक परिवर्तन, धर्मप्रसार, शिक्षण व प्रसारमाध्यमाच्या परिणामातून जुन्या व नव्या पिढीतील भाषिक फरक निर्माण झाला असा निष्कर्ष डॉ. बऱ्हाटे यांनी नोंदविला आहे. या प्रकरणात कोरकूच्या संस्कृती विषयीची आलेली माहिती ही कोरकू बोलीच्या दृष्टीने महत्त्वाची आहे.

या ग्रंथात जोडलेले परिशिष्ट म्हणजे कोरकू बोली व संस्कृतीचा महत्त्वाचा दस्तऐवज आहे. यामध्ये पाच लोककथा

शब्दशः मराठी अर्थासह दिल्या आहे. यातून कोरकूतील वर्णन वैशिष्ट्ये, वाक्यरचना विशेष, शब्दलयीचे रूप स्पष्ट होते. लोकगीते शीर्षकातून विविध अशा एकोणवीस गीताची नोंद डॉ. बऱ्हाटे यांनी घेतली आहे. पस्तीस म्हणी व एकशेबारा वाक्प्रचार, ४६ उखाणे, पाचशेच्या वर वाक्य व तीन हजार तीनशेच्यावर कोरकू शब्दांचा संग्रहातून कोरकूमधील भाषिक भांडार या ग्रंथाने उपलब्ध करून दिले आहे. यामधून लेखकाने कोरकू आदिवासींच्या सामाजिक, सांस्कृतिक, पौराणिक व सृजनशील अशा जीवन शैलीचा प्रत्यय वाचकाला आणून दिला आहे. आदिवासींचे हे सांस्कृतिक वैभव आजही टिकून आहे. कोरकू लोकगीतांचा आशय, लोककथेमधील कल्पकता मूल्यनिर्देशिकता, म्हणीतील सामाजिक जाण, वाक्प्रचारामधील चातुर्य उखाण्यातील मार्मिकता, शब्दसंग्रहातून त्यांचा भाषिक आवाका लेखकाने प्रतिबिंबित करण्याचा प्रयत्न केला आहे तो यशस्वी झाला आहे. या ग्रंथाच्या शेवटी संदर्भग्रंथाची सूची जोडली आहे.

हा विषय क्षेत्रअभ्यासाचा विषय आहे. त्यासाठी लेखकाने तीन गावे निवडून त्या गावातील निवेदकाच्या बोलीचा उपयोग शब्द संकलन करण्यासाठी केला आहे. परंतु संपूर्ण मेळघाट क्षेत्र व एकूणच कोरकूच्या वस्त्या ह्या सातपुडा जंगलाच्या चारीबाजूस विखुरलेल्या आहेत हे लक्षात घेतल्यास उत्तर ईशान्य वाजू कडचे दोन तीन गावे या क्षेत्र अभ्यासात जोडती असती तर आणखी तपशिलातून हा अभ्यास झाला असता. दुसरे असे की, हे संशोधन बोलीला केंद्रस्थानी ठेवून केले आहे. बोलीच्या उच्चारामध्ये वय व लिंगाच्या आधारे सूक्ष्म भेद पडतात असा भेद निवेदकाच्या निवडीत दिसत नाही. निवेदकामध्ये एखाद्या बालकाची निवड केली असती तर विषयाला न्याय मिळाला असता असे काही मुद्दे सोडले तर, कोरकू भाषेसंदर्भात डॉ. बऱ्हाटे यांनी महत्त्वपूर्ण असा ग्रंथ उपलब्ध करून दिला आहे. कोरकू ही मेळघाट मध्ये विस्तारित भू-प्रदेशात वास्तव्यास असलेल्या आदिवासींची बोली भाषा आहे. या बोलीवर संशोधन करून डॉ. बऱ्हाटे यांनी या क्षेत्रात केलेले संशोधन हे मौलिक स्वरूपाचे कार्य केले आहे. कोरकुंच्या भाषेच्या संदर्भातील अभ्यासपूर्ण दस्तऐवज असणारा हा ग्रंथ अभ्यासकांना उपयुक्त आहे.

(<u>**कोरकू बोली : वर्णनात्मक आणि समाजभाषावैज्ञानिक अभ्यास**</u>, डॉ. काशीनाथ विनायक बऱ्हाटे, देवयानी प्रकाशन, मुंबई, पृष्ठे ३४०, मूल्य - २०० रू., प्रथमावृत्ती २०१२)

▮ डॉ. अण्णा प्रल्हादराव वैद्य
बी/३, मनकर्णा नगर, जुना बायपास रोड,
अमरावती - ४४४ ६०६.
भ्रमणभाष : ९४२०१२५६८१

:: साभार पोच ::

समीक्षा/संशोधन :

कविभूषण : व. ग. खापर्डे डॉ. पद्मरेखा धनकर वानखेडे, हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर, ३००/-

बोली : समाज साहित्य आणि संस्कृती डॉ. कैलास सार्वेकर, प्रतिभास प्रकाशन, परभणी, १६०/-

मराठीसाठी लोक नागरी पुष्पा फडके, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, ४५०/-

अर्वाचीन कवींचा काव्यविचार डॉ. हेमंत खडके, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २६०/-

समीक्षेचा अंतःस्वर देवानंद सोनटक्के, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००/

कादंबरी :

चकवा डॉ. अलका कुलकर्णी, साधना प्रकाशन, पुणे, १००/-

स्मशानभोग बाबाराव मुसळे, कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद १८०/-

गराडा डॉ. इंदू कुकलकर, सुयोग प्रकाशन, नागपूर, २३०/-

आठवणीतले गावकुस हिरामण लांजे 'रमानंद', विवेक प्रकाशन, नागपूर, १५०/-

कथासंग्रह :

रितं गाव विजय जावळे, जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद, १५०/-

स्वकथन :

माझं नर्सिंग : शोध अस्तित्वाचा सुजाता तोखंडे, आकांक्षा प्रकाशन, नागपूर, ३००/-

संगीतिका :

स्वर मेघ : संगितिका, संगीताचार्य सुलभा ठकार

प्रकाशक : डॉ. एस. एन, ठकार, पुणे, १००/-

नाटक :

अग्निशिखा कावेरी उर्मिला राघवेन्द्र चाकूरकर, रेणू प्रकाशन, ठाणे, ३०/

चरित्र :

हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील कंठमणी श्यामराव बोघनकर उर्मिला राघवेन्द्र चाकूरकर, अभिजात प्रकाशन, पुणे, ४०/-


प्रवास वर्णन :

डूंगनच्या देशात उर्मिला राघवेन्द्र चाकूररकर, साक्षात प्रकाशन, औरंगाबाद, १००/-

नियतकालिक विशेषांक :

अतिरिक्त (नवदोत्तर कविता विशेषांक) मार्च २०१३ संपादक - दा. गो. काळे, दिनकर मनवर, रोकडिया नगर, शेगाव, जि. बुलढाणा, २००/-

अनुक्रमणिका



।। पुस्तक परीक्षण ।।

ढसाळांची कविता : आकलन आणि आस्वाद

सुदाम राठोड

■

नामदेव ढसाळांची कविता या शतकातली महत्तम कविता आहे. तुकारामानंतर मराठी कवितेला एवढ्या उंचीवर घेऊन जाणारा दुसरा कवी दिसत नाही. नामदेव ढसाळांची कविता संबंध शोषित-पीडित जगाच्या व्यथा वेदना कवेत घेत अधिकाधिक व्यापक बनत गेली. नामदेव ते नामदेव असा मराठी कवितेचा प्रवास सांगितला जातो, तो एका अर्थाने सार्थच आहे. मात्र मराठी कवितेला मिळालेला हा समृद्ध वारसा अधोरेखीत करून जपण्याचे कष्ट मराठी समीक्षकांनी घेतलेले दिसत नाही. एकतर आज मराठीत निव्वळ काव्यसमीक्षक म्हणावेत अशा समीक्षकांची वानवा आहे. त्यात जे काही जुने जाणते आहेत ते मर्ढेकर आणि बालकवींच्या कवितेतून बाहेर पडायला तयार नाही. त्यामुळे आता कवींनाच दुहेरी भूमिका निभवावी लागतेय. ते एकमेकांच्या कवितांवर परीक्षण वजा समीक्षणे लिहून मराठी काव्यसमीक्षेचा गाडा मोठ्या नेटाने पुढे ढकलता येते. त्याद्वारे एकमेकांची थोरवी गातायेत असेही एक चित्र आहे. पण काळ ठरवत असतो की, कोणती कविता चिरंतन आहे नि कोणती कविता तात्कालिक आहे. येणारी पिढी जेव्हा अधिक डोळसपणे एकूण मराठी कवितेकडे पाहाते. तेव्हा नामदेव ढसाळांची कविता ठळकपणे समोर येते. तिची ताकद आणि तिचं अनन्यत्व स्पष्टपणे दिसून येते. भालचंद्र फडके, रा.ग.जाधव, वसंत आबाजी डहाके, चंद्रकांत पाटील, रणधीर शिंदे, महेंद्र भवरे, महेंद्र कदम यांसारख्या काही कवी समीक्षकांनी सुट्या-सुट्या लेखांमधून ढसाळांच्या कवितेची थोडी-बहुत समीक्षा केलेली आहे. प्रभा गणोरकर यांनी ढसाळांच्या 'चिंध्याची देवी आणि इतर कविता' या कविता संग्रहाला प्रस्तावना लिहिलेली आहे. नवीन अभ्यासक समिता जाधव, धम्मपाल रत्नाकर यांनी ढसाळांच्या कवितेवर संशोधन केलेले आहे. परंतु ते प्रबंधही अजूनपर्यंत पुस्तक रूपाने आलेले नाहीत. १९९७-९८ ला अनुष्टुभचा नामदेव ढसाळ विशेषांक वगळता त्यांच्या कवितेची फारशी दखल समीक्षकांनी घेतलेली दिसत नाही. याचं कारण सांगताना ते स्वतः म्हणतात, ''माझ्या कवितेवर लिहिण्याची हिंमत कुण्या समीक्षकात नाही. अक्षरशः त्यांची फाटते.'' या संबंध पार्श्वभूमीवर नव्या पिढीचा तरूण अभ्यासक भगवान पांडुरंग फाळके ढसाळांच्या कवितेवर लिहू धजतो हे नक्कीच कौतुकास पात्र आहे.

'कवीच पृथ्वीला वाचवू शकतात सर्वनाशापासून!' (नामदेव ढसाळ यांची कविता : आस्वाद आणि समीक्षा) हा भगवान पांडुरंग फाळके लिखित समीक्षाग्रंथ औरंगाबादच्या कल्याणमित्रता प्रकाशनाच्या वतीने नुकताच प्रकाशित झालेला आहे. आवर्जुन नोंदवण्यासारखी गोष्ट म्हणजे हे काही एम.फिल किंवा पीएच.डी. साठी सादर केलेल्या प्रबंधाचं पुस्तकरूप नव्हे. हे भगवान फाळके यांनी नामदेव ढसाळ यांच्या कवितेचं मांडलेलं स्वतंत्र चिंतन आहे. त्यामुळे त्यात संशोधनाची रूढ चौकट दिसून येत नाही. त्या अनुषंगाने पाळले जाणारे नियम व अटी यात नाही. हे एका अर्थाने नामदेव ढसाळांच्या कवितेचं रसपूर्ण आस्वादन आहे. एका भव्यकवितेचं सम्यक परिशीलन आहे, तिचे महत्त्व आणि महत्ता अधारेखित करण्याचे ठाम विचार आहेत. हे पुस्तक पाहिल्यानंतर एकदम नजरेत भरते ते त्याच्या आकर्षक मुखपृष्ठामुळे. जळगांवच्या विनोद चव्हाण यांनी अतिशय कल्पकतेने ढसाळांच्या व्यामिश्र भावांची चित्राकृती साधली आहे. त्यात कलावंताचा कलंदरपणा आहे, बुद्धाची करूणा आणि निर्वाणाआगोदरची पिडा आहे. त्यात क्रांतीचे प्रतीक असणारा लाल रंग अधिक गडद झालेला आहे. या पुस्तकात अभ्यासपूर्ण अशा पाच लेखांचा समावेश आहे. ढसाळांच्या कवितेतील अलक्षित धागे पकडून या पाचही लेखात स्वतंत्र चिंतन मांडलेले आहे. या चिंतनाचे विषय आणि मांडणी

लेखकाच्या प्रगल्भ जाणीवांची साक्ष देतात. हे पाचही लेख वैशिष्ट्यपूर्ण आहेत. 'नामदेव ढसाळ यांच्या कवितेतील आई' हा या पुस्तकातील पहिला लेख. आईच्या त्यागाची, वात्सल्याची थोरवी गाण्यात आजवर मराठी कवितेची बरीच पाने खर्ची पडली आहे. पण, त्यापलिकडे जावून तिच्यातील मानुषी भावांना स्पर्श करण्याची किमया नामदेव ढसाळांनी साधली. ढसाळांच्या कवितेतील आई अभावग्रस्त जगातील शोषित, पीडित स्त्रियांची प्रतिनिधी आहे. इथं मुलाने आईला दिलेली शिकवण आहे. आईला ही व्यवस्था, आणि या व्यवस्थेतील सांस्कृतिक ताणेबाणे समजून घेण्याचे आवाहन आहे. नेमकं हेच वेगळेपण हेरून फाळके यांनी 'ढसाळांच्या आईचा शोध' या लेखातून घेतलेला आहे. 'आईच्या सोशिक रूपाविषयी सहानुभूती व्यक्त करणे, गौरव उद्गार काढणे हा मार्ग नाकारून ज्यामुळे खऱ्या अर्थाने तिचे व तिच्यासारख्या असंख्य स्त्रियांचे जगणे संपन्न करता येईल.... कल्पनेच्या भावनाकल्लोळतल्या गुळगुळीत शब्दांपेक्षा आईचे हे वास्तवदर्शी शब्दचित्र मराठी कवितेत आई विषयीच्या चित्रणाला वेगळे परिमाण देणारे ठरले आहे.' हा निष्कर्ष लेखकाच्या बहू-आयामी विचारशक्तीचा निदर्शक आहे. फाळके यांचे हे चिंतन मुळापासून वाचण्यासारखे आहे.

'नामदेव ढसाळ यांच्या पाच कविता' या शिर्षकाखाली लेखकाला भावलेल्या आणि महत्त्वाच्या वाटणाऱ्या पाच कवितां विषयीचे दीर्घ चिंतन मांडलेले आहे. या पाच कवितांची निवड पाहता ढसाळांच्या एकूण कवितेतील अंतःसूत्र या कवितांमधून जाणवते. 'मोक्षाच्या अन् अत्याचाराच्या मार्गानं', 'माझी मऊभोर स्वच्छ पिसे', 'अनुभव', 'हंगामाचं कुत्रं' आणि 'आठवणी' अशा या पाच कविता प्रातिनिधिक स्वरूपात निवडलेल्या आहेत. पैकी पहिल्या कवितेत अमानुष सत्ता जिथे कुठे असेल तेथील न्यायपूर्ण शांततामय जीवन जगण्यासाठी धडपडणाऱ्या जनतेचा ही कविता प्रातिनिधिक स्वर आहे. असे मत लेखक नोंदव‍े त्याचं स्पष्टीकरण देताना कवितेच्या अंतरंगापासून सामाजिक, राजकीय संरचनेच्या अमानवी कृत्याकडे लेखक बोट दाखवतो. जबाबदार शासनव्यवस्था आणि या कवितेतील सूचक आशय यांचा सहसंबंध उलगडून मानवी अधिकारांची चर्चा करतो. 'माझी मऊभोर स्वच्छ पिसे' या कवितेतील ढसाळांची कोवळीक वृत्ती आणि ती करपून गेल्यानंतर सर्जनाच्या पातळीवर भावानुभावांची जी आदळापट हो‍े त्यातून निर्माण होणाऱ्या वेगवेगळ्या संवेदनांचा वेध लेखकाने घेतलेला आहे. ढसाळांची संपूर्ण कविता अनुभवातून आविष्कार पावलेली आहे. या अनुभवाच्या वेगवेगळ्या तऱ्हा 'अनुभव' या कवितेतून व्यक्त झालेल्या आहेत. या अनुभवांचा उगम आणि विस्तार शोधण्याचे काम फाळके यांनी केलेले आहे. 'हंगामाचं कुत्रं' या कवितेला संभवाच्या पातळीवर नेवून लेखकाने सगळ्या शक्यता पडताळून पाहिल्या आहेत. वेगवेगळ्या दृष्टीने अर्थांचा ध‍डताळा घेतलेला आहे. हंगामाचं कुत्रं प्रत्येक झाडावर लघवी करत जाते. याचा अर्थ सांगताना लेखक म्हणतो की, 'झाडाला जीवनाचा संदर्भ मानले तर या जीवनावर, त्याच्या सर्जनावर एक प्रकारे ते विरजन पडणे म्हणता येईल. वा त्यावर पाणी फिरणे म्हणता येईल.' लेखकाचे हे स्पष्टीकरण आणि अर्थविस्तार त्याच्या प्रगल्भ काव्यजाणीवेची साक्ष देतात. 'आठवण' या पाचव्या कवितेत ढसाळांच्या उद्‌ध्वस्त भावविश्वाचे चित्रण आलेले आहे. मूळात ढसाळांची कविता ही जगण्याला समांतर असल्याने, व्यक्तिगत दुःखाचे अनेक पदर या कवितेला लाभले आहेत. पण हे दुःख एका पातळीवर एकट्या ढसाळांचे उरत नाही. तर ते समष्टीचे रूप घेऊन व्यापक जनसमूहाचे प्रतिनिधित्व करत जाते. हे त्याचे व्यापकपण लेखकाने अधोरेखित केलेले आहे. गत आठवण वर्तमानाला कशी-कशी प्रभावित करत जाते हे ही लेखकाने स्पष्ट करून सांगितले आहे. या पाचही कवितेतील कणखरपणा, अनुभूतीचा उत्कटपणा, तीव्र सामाजिक भान, कला आणि मूल्यभान यांच्यातील परिणामकारकता नेमकेपणाने लेखक दाखवून देतो.

आजपर्यंत संबंध दलित कवितेकडे केवळ एका वैचारिक परिप्रेक्षातून पाहिले गेले. पण त्या विचारांच्या पलिकडे कवीचे स्वतःचे एक भावविश्व असते. त्यात कवीच्या तरल, हळव्या, नाजुक, जाणिवा असतात. याचे एक वेगळे भान फाळके यांनी 'नामदेव ढसाळ यांच्या कवितेतील स्वाभाविकता' या लेखातून व्यक्त केलेले आहे. या लेखाचे प्रयोजन सांगताना फाळके म्हणतात, 'नामदेव ढसाळ म्हटले की, प्रचंड विद्रोही कवी इतकेच आणि तेही काहीतरी नकारात्मक अर्थाने घेण्याचा कल अधिकपणे दिसून येतो.... पण याशिवाय प्रेमातील व्याकुळता, हळुवारपणा, हळवेपणा, आदरणीयता, उत्कटता, प्रांजळता, निर्मलता, मंगलमयता आणि पारदर्शकता या सर्वांमधून घडणारी त्यांची कविता अतिशय तरल आहे.' या तरल आणि उत्कट कवितांमधल्या ढसाळांच्या स्वभावाचे विविध पैलू फाळके यांनी दाखविले आहेत. त्यांच्या कवितेतील भावनिक ओलावा, ज्या ओलाव्यातून काळजाला स्पर्श करणाऱ्या संवेदना अंकुरल्या आणि मेंदूत हालचाल घडविणारे कवितिक घाव उमटले. त्या घावांचा मार्मिक शोध फाळके यांनी घेतला आहे. ढसाळ मूळातच कलंदर वृत्तीचा कवी आहे. कुठलीही वासना, विकार लपवून न ठेवता नैसर्गिक जीवन जगणारा तो एक बेधडक कलावंत आहे. त्याच्या विद्रोही, सम्यक, समष्टी,

प्रेम, काम, लोभ, हर्ष, दुःख या सर्व गुणांच्या संमिश्रणाने बनलेली त्यांची एक अलक्षित भावदुनिया फाळके यांनी उजागर केलेली आहे.

ढसाळांची काव्यदृष्टी जगण्याशी अत्यंत प्रामाणिक आहे. जगणे आणि लिहणे यातील एकमयतेचा आंतरिक संबंध त्यांच्या काव्यविषयक भूमिकेतून अभिव्यक्त होतो. कविता काय असते? तिचं प्रयोजन कोणतं? कवीचे कवितेशी कशा प्रकारचे नाते असते? या संबंधाने काही संदर्भ ढसाळांच्या कवितेत विखुरलेले आहेत. ते संबंध तुकडे गोळा करून, त्याची नीट जोडणी करून, साधलेले चित्र म्हणजे या पुस्तकातील, 'कवितिक नामदेव ढसाळ कवितेविषयी म्हणतात' हा लेख होय. नेहमीप्रमाणे नामदेव ढसाळांच्या कवितेतील हा अलक्षित पैलू उलगडून दाखवण्याचा प्रयत्न भगवान फाळके यांनी केलेला आहे. या लेखात फाळकेंनी अतिशय मौलिक असे निष्कर्ष नोंदवलेले आहेत. 'माणूसपणाच्या उन्नत जाणीवेपेक्षा कविता काही वेगळी नसते. अशावेळी प्रत्यक्ष कविता लिहिणारे आणि कविता न लिहिताही कविता जगणारे असे दोघेही 'कवी' या शब्दात गृहित धरल्यास 'कवीच पृथ्वीला वाचवू शकतात सर्वनाशापासून!' हे कवीने केलेले विधान किती व्यापक मौलिक आहे याचा आपणास प्रत्यय येतो' फाळके यांनी यासाठी ढसाळांच्या 'मी मारले सूर्याच्या रथाचे सात घोडे' या कविता संग्रहाची अर्पण पत्रिका दाखला म्हणून घेतलेली आहे.

'दुष्टांनी पोहचवली आहे पृथ्वीला इजा
कवी जाणतात हे सर्व
कवीच पृथ्वीला वाचवू शकतात सर्वनाशापासून!'

ढसाळांनी यांतून कवी आणि कवितेचे सामर्थ्य नोंदवलेले आहे. आपली कविता सामान्यातल्या सामान्य माणसाचे बोट धरून चालावी आणि त्या सामान्यांना नागवणाऱ्या व्यवस्थेच्या विरोधात उभी ठाकावी ही कवितेकडून असणारी ढसाळांची अपेक्षा फाळके यांनी संदर्भासहित स्पष्ट करून सांगितली आहे.


या पुस्तकातील शेवटचा लेख आहे 'जमले तर साद घाला मला : एक आकलन' यात ढसाळांची एक भावलेली कविता घेऊन तिचे आकलन फाळकेंनी मांडलेलं आहे. हे आकलन खूप वेगवेगळ्या स्तरावरचे आहे. या कवितेतून ढसाळ देह जाणिवेच्या पल्ल्याड सृष्टीच्या अस्तित्वाशी असणाऱ्या आपल्या अस्तित्वाच्या नात्याची स्वरलय प्रतिमांकित करतात. फाळके यांनी ही स्वरलय पकडून या एकाच कवितेचे विविध अर्थांतरण पडताळून पाहिले आहे. प्रखरता आणि कोमलता, विद्रोह आणि सयंतपणा, नकार आणि स्वकार, वेदना आणि आनंदानुभव या परस्पर विरोधी दोन वृत्तीचा समन्वय फाळके यांनी दाखवून दिला आहे. ही कविता ढसाळांच्या अतिशय तरल, नाजुक भावांची निसर्गगोचर अभिव्यक्ती आहे. या अथांग विश्वात आपल्या अस्तित्वाची दखल कुणी घेवो न घेवो, आपण मात्र प्रत्येक अन्यायाची दखल घेऊन त्याची बाजू मांडत राहायची. कवी मरून गेला तरी त्याची कविता त्याला अमर करते. ढसाळांना खात्री वाटते की, त्यांच्या पश्चात कुणाच्यातरी हृदयात कवितारूपाने ते कायम जिवंत असतील. फाळके यांना हा कवीच्या अंतःकरणातील प्रामाणिक स्वर वाटतो. ही संबंध कवितेविषयी फाळके यांनी आशय आणि अभिव्यक्तीच्या पातळीवर वेगवेगळ्या तऱ्हेने स्पष्टीकरणे नोंदवली आहेत.

रूढार्थाने या ग्रंथाला केवळ समीक्षाग्रंथ म्हणता येणार नाही. ढसाळांच्या एकूण कवितेतील अंतरस्वर पकडून साधलेला हा लयात्म विचार आणि लालित्यपूर्ण आस्वादन आहे. यात भाषेचे अभिजात रूप आणि व्यासंगपूर्ण अभिव्यक्ती दिसून येते. फाळके यांचे हे पहिले पुस्तक असूनही त्यात नवखेपणाच्या खुणा आणि कच्चे दुवे दिसून येत नाहीत. मलपृष्ठावरील मजकुर असा आहे. 'नामदेव ढसाळ यांची कविता सर्वहारा जगाच्या व्यथा, वेदना आणि विद्रोहाचे विलक्षण प्रत्ययकारी शब्दरूप आहे. जगण्यावर चढविण्यात आलेली अमानुषतेची पुटं आवेशाने काढून निर्मळ, निरागस, निर्वैर माणूसपणाचे ती मंगलगान करते. प्रतिभेचा संपन्न आविष्कार असणाऱ्या या कवितेची व्यासंगपूर्णता, व्यामिश्रता आणि व्यापकता अधिक सखोलपणे अभ्यासली जाणे, ही एकूण मराठी कवितेची फार मोठी गरज आहे. त्यातील एक प्रयत्न म्हणजे नव्या पिढीतील भगवान पांडुरंग फाळके यांनी ढसाळांच्या काही कवितांच्या अनुषंगाने मांडलेले हे महत्त्वपूर्ण आकलन आणि आस्वादन होय.' या विधानांचा प्रत्यय हे पुस्तक वाचताना येतो. भगवान फाळके यांच्या पुढील लेखनाला सदिच्छा !

(**कवीच पृथ्वीला वाचवू शकतात सर्वनाशापासून !** (नामदेव ढसाळ यांची कविता : आस्वाद आणि समीक्षा), भगवान पांडुरंग फाळके, कल्याण मित्रता प्रकाशन, औरंगाबाद. पृथमावृत्ती, किंमत : ७० रू.)

। सुदाम राठोड
मराठी भाषा व वाङ्मय विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.
भ्रमणभाष : ९७६७५३८६९५

अनुक्रमणिका



।। दृष्टिक्षेप ।।

आजच्या हिंदी कवितेविषयी


■

'ऐवजी' या अनियतकालिकाचा नवा अंक अलीकडेच प्रकाशित झाला. समकालीन हिंदी कवितेच्या स्थितिगतीबाबत काही महत्त्वाची निरीक्षणे या अंकात नोंदविली गेली आहेत. या अंकात आजच्या हिंदी कवितेविषयी जितेंद्र श्रीवास्तव, गिरीराज किराडू, गणेश विसपुते यांनी लिहिले आहे. महत्त्वाच्या हिंदी कवींच्या काही कवितांचे अनुवाद या अंकात आहेत. गीत चतुर्वेदी , व्योमेश शुक्ल, गिरीराज किराडू, महेश वर्मा, हरेप्रकाश उपाध्याय, विमलचंद्र पांडे, नीलेश रघुवंशी यांच्या काही कवितांचा अनुवाद गणेश विसपुते यांनी केला आहे. श्रीधर नांदेडकर यांनी शिरीषकुमार मौर्य, अनुज लुगुन, कुमार अनुपम, सिद्धांत मोहन तिवारी यांच्या कवितांचा अनुवाद केला आहे. तर जयप्रकाश सावंत यांनी मनोजकुमार झा यांच्या कवितांचा, प्रफुल्ल शिलेवार यांनी बसंत त्रिपाठी, एकांत श्रीवास्तव, यांच्या कवितांचा अनुवाद केला आहे. कवी विष्णू खरे यांच्या हेमंत कुकरेती यांनी घेतलेल्या मुलाखतीचा अनुवाद बलवंत जेऊरकर यांनी केला आहे. या मुलाखतीमध्ये विष्णू खरे यांनी एकूणच समकालीन हिंदी कवितेविषयी अत्यंत महत्त्वाची निरीक्षणे नोंदवली आहेत. ''...आधुनिक काळात अजून कुणी मोठा मुस्लिम कवी दिसत नाही. असद जैदींमध्ये तशा शक्यता होत्या पण पूर्ण होऊ शकल्या नाहीत, पण अजून त्यांच्याजवळ बराच अवधी आहे. कथा साहित्यात अब्दुल बिस्मिल्लाह, असगर वजाहत, शानी, मंजूर एहतेशाम यांनी जसं स्थान मिळवलं आहे तशा स्तराच्या मुस्लिम कवींची मी वाट पाहतोय. हिंदी कवितेचा समाज तेव्हाच मोठा बनू शकेल जेव्हा ख्रिश्चनांच्यामधूनही एखादा मोठा कवी येईल. महादेवी वर्मांसारखा मेजर फिमेल व्हॉईस आज ऐकू येत नाही. कात्यायनी, सुभद्राकुमारी चौहान यांच्या स्तरापर्यंत पोहचली आहे. एकूणच हिंदी कवितेला अजून बऱ्याच प्रकारच्या चळवळींची गरज आहे. फिक्शनसारखं काही कवितेत होऊ शकलं नाही यांची सल आहे. दलित-वंचित लेखक तिथं आपल्या समाजासह उपस्थित आहेत, पण ते कवितेत येऊ नाही शकले. मुस्लिम-दलित कवितेत हे टांगेवाले, खाटीक रूपांमध्येच पाहायला मिळावेत हे दुःखद आणि हास्यापद आहे. हा एक प्रकारचा कॉम्प्लेक्स आहे. अल्पसंख्यांक, श्रीमंत-गरीब आणि स्त्रियांवरील मोठी कविता हिंदीत येणं अजून बाकी आहे.'' हिंदी कवितेच्या या स्थितीवरून आजच्या एकूणच मराठी कवितेच्या परिस्थितीचा अंदाज येणे अगदी शक्य आहे. जितेंद्र श्रीवास्तव यांनी आजच्या हिंदी कवितेच्या जमेच्या नसलेल्या बाजूंवर विस्ताराने विचार केला आहे. ते लिहितात, ''मागील वीस वर्षांतील हिंदी कवितेची जमेची नसलेली बाजू अशी सुद्धा आहे की तिच्याजवळ तिचा स्वतःचा असा समर्थ समीक्षक नसणे. पुर्वसूरींचे समीक्षकच अधुनमधून तिच्याकडे नजर वळवतात.'' एकूणच हिंदी कवितेचे आजचे स्वरूप, विस्तीर्ण अशा भाषिक पट्ट्यात सुरू असलेल्या कविताव्यवहार जाणून घेण्याचा प्रयत्न या अंकात केला गेला आहे. हिंदी भाषेतल्या कवितेचा आणि त्याअनुषंगाने मराठी भाषेतल्याही कवितेचा विचार करणारा हा अंक आहे. आजचे हिंदीतले महत्त्वाचे कवी चंद्रकांत देवताले यांचेसाठी गणेश विसपुते यांनी लिहिलेले मानपत्र, मलपृष्ठावर देवताले यांच्या एका कवितेचा अनुवाद आणि कवी ग्रेस यांच्या संदर्भात मनोज सुरेंद्र पाठक यांचे स्मरणरंजन करणारे टिपण, कविता आणि कवीचे जगणे या संदर्भातील कुँवर नारायण, विनोदकुमार शुक्ल, राजेश जोशी, विजयकुमार, एकांत श्रीवास्तव या कवींची मनोगते असा बराच मजकुर या अंकात आहे. गणेश विसपुते यांचे मुखपृष्ठ आहे. आजच्या हिंदी कवितेच्या स्थितीगतीचा विचार करणारा 'ऐवजी'चा हा अंक संदर्भमूल्य असणारा आहे.

ऐवजी : फेब्रुवारी २०१३, संपादक - रमेश इंगळे उत्रादकर, शिक्षक कॉलनी, जिजामाता नगर, बुलढाणा ४४३ ००१. (अंक खासगी वितरणासाठी) देणगीमूल्य-चाळीस रूपये.

yugwanivss@rediffmail.com

अनुक्रमणिका



।। दृष्टिक्षेप ।।

सामाजिक परिर्वतन आणि मराठी साहित्य

■

'सामाजिक परिवर्तन आणि मराठी साहित्य' या डॉ. वासुदेव मुलाटे गौरवग्रंथाचे संपादन डॉ. र. बा. मंचरकर यांनी केले आहे. पुण्याच्या पद्मगंधा प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या या ग्रंथाला महावीर जोंधळे, डॉ. मनोहर जाधव व डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांचे संपादनसहाय्य लाभले आहे. चारशे ऐंशी पानांच्या या ग्रंथात पाच विभाग आहेत. 'तत्त्वचर्चा' हा पहिल्या विभागात सामाजिक परिवर्तन आणि साहित्य या संकल्पनांचे स्पष्टीकरण व परस्पर अनुबंध विशद करणारा आहे. 'परिवर्तनाची संकल्पना आणि स्वरूप' या लेखात डॉ. रावसाहेब कसबे यांनी परिवर्तनाच्या सर्वस्पर्शी संकल्पनेची चिकित्सा केला आहे. साहित्य आणि साहित्यमूल्ये या संकल्पनांच्या फेरमांडणीची आवश्यकता आणि त्यासंदर्भातील नवी सूत्रे डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी विशद केली आहे. बदलत्या सामाजिक सांस्कृतिक पर्यावरणाचे साहित्याशी असणारे अनुबंध कसे असावेत त्याची चिकित्सा डॉ. जनार्दन वाघमारे यांनी केली आहे. सामाजिक परिवर्तनाच्या चळवळींशी पर्यायाने समाज प्रबोधन पंरपरेशी मराठी लेखकांनी आपले वैचारिक नाते जोडले पाहिजे, कृतिप्रवण असे प्रबोधनाचे विचार साहित्यकृतीतून प्रकट झाले पाहिजे अशा आशयाचे विचार डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी 'मराठी लेखक आणि सामाजिक परिवर्तनाच्या चळवळी' या लेखात मांडले आहेत. डॉ. सदा कऱ्हाडे यांनी 'मार्क्सवाद आणि मराठी साहित्य' यांच्यातील अनुबंधाचा साक्षेपी आढावा घेतला आहे.

'उपयोजन' या दुसऱ्या विभागामध्ये एकूण सतरा लेख आहेत. या विभागात परिवर्तनाच्या संकल्पनेशी वाङ्मयीन प्रवाह, साहित्यप्रकार आणि संप्रदायांचे असणारे बंधअनुबंध उकलून दाखविले आहेत. डॉ. कन्हैया कुंदप आणि डॉ. सुलक्षण दिलीप कुळकर्णी यांनी अनुक्रमे महानुभाव गद्य व पद्य साहित्याची चिकित्सा केली आहे. मराठी भाषेचा धर्मभाषा म्हणून स्वीकार करणाऱ्या महानुभावांच्या गद्य व पद्य साहित्यातील विचार, शैली, आशय दृष्ट्या विश्लेषण या दोन लेखांमध्ये केले आहे. डॉ. सूर्यनारायण रणसुभे यांनी सूफी संप्रदायाच्या विचारमूल्यांची ओळख करून दिली आहे. 'मराठी संतकविता आणि परिवर्तनाच्या जाणिवा' या लेखात डॉ. र. बा. मंचरकर यांनी संतकवितेतील परिवर्तनाच्या जाणिवांचा शोध घेतला आहे.

यानंतर स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्यातील परिवर्तनांचा आढावा घेणारे लेख आहेत. डॉ. प्रकाश देशपांडे केजकर यांनी आधुनिक मराठी कवितेतील परिवर्तनाचे विश्लेषण आणि मूल्यमापन केले आहे. सामाजिक परिवर्तन आणि मराठी कविता यांच्यातील अनुबंधांचे विश्लेषण डॉ. अविनाश सांगोलेकर यांनी केले आहे. डॉ. किशोर सानप यांनी लघुपत्रिकांच्या चळवळीचे विवेचन व विश्लेषण केले आहे. दलित साहित्यप्रवाहाचे आणि परिवर्तनाचे नाते आणि या प्रवाहाचा प्रभाव व परिणाम यांची चिकित्सा डॉ. दत्ता भगत यांनी केली आहे. आंबेडकरवादी साहित्याची परिवर्तनाची दृष्टी आणि आशयसूत्रे यांचे विश्लेषण डॉ. यशवंत मनोहर यांनी केले आहे. ग्रामीण साहित्याच्या सामाजिक आणि वाङ्मयीन वेगळेपणाचा आढावा प्रा. भास्कर चंदनशीव यांनी घेतला आहे. डॉ. द. ता. भोसले यांनी ग्रामीण साहित्यातील नव्या दृष्टीचा, आशसूत्रांचा वेध घेतला आहे. स्त्रीवादी साहित्य आणि समीक्षेचा आढावा डॉ. वैशाली भालसिंग यांनी घेतला आहे. परिवर्तनाशी नाते असणाऱ्या आदिवासी साहित्याच्या प्रवाहाची ओळख डॉ. विनायक तुमराम यांनी करून दिली आहे. एकूणच सामाजिक सांस्कृतिक पर्यावरणाच्या पार्श्वभूमीवर आदिवासी साहित्याच्या स्वरूपाची चिकित्सा भूजंग मेश्राम यांनी केली आहे. प्रा. फक्रुद्दिन बेन्नूर यांनी मुस्लिम मराठी साहित्याच्या प्रवाहाचे स्वरूप विशद केले आहे. डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांनी ख्रिस्ती साहित्याच्या प्रवाहाची वैशिष्ट्ये विशद केली आहेत.

या सर्व लेखांतून मराठी साहित्याच्या एकूणच वाटचालीचा भव्य असा पट आपल्या डोळ्यासमोर उभा राहातो. प्रारंभापासून आजपर्यंतच्या मराठी साहित्याच्या प्रवाहाचे परिवर्तनाच्या संकल्पनेशी असणाऱ्या अनुबंधांचे साक्षेपी विश्लेषण डॉ. सदा कऱ्हाडे यांनी 'विषय समारोपा'त केले आहे.

यानंतरचा विभाग 'डॉ. वासुदेव मुलाटे साहित्य समीक्षा' हा आहे. डॉ. वासुदेव मुलाटे यांच्या कथा लेखनाची वैशिष्ट्ये डॉ. श्रीराम गुंदेकर यांनी विशद केली आहेत. महावीर जोंधळे यांनी डॉ. मुलाटे यांच्या 'विषवृक्षाच्या मुळ्या' या कादंबरीचा वेध घेतला आहे. डॉ. संजय शिंदे यांनी डॉ. वासुदेव मुलाटे यांच्या समीक्षालेखनाची चिकित्सा केली आहे.

यानंतरचा चवथ्या विभागात डॉ. वासुदेव मुलाटे यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंचा वेध अंजली मुलाटे-सहस्रबुद्धे, डॉ. सतीश साळुंखे, प्रा. अर्जुन व्हटकर, डॉ. गिरीश मोरे यांनी घेतला आहे. पाचव्या विभागात श्याम देशपांडे यांनी डॉ. मुलाटे यांची घेतलेली मुलाखत आहे. डॉ. मुलाटे यांची ग्रंथसंपदा व मान-सन्मान याविषयीच्या नोंदी या विभागात आहेत.

साहित्याच्या समाजशास्त्राची मांडणी करू पाहाणारा, साहित्याचे परिवर्तनाशी असणारे अनुबंध शोधणारा, साहित्य आणि नैतिक मूल्यांच्या परस्पर प्रभाव परिणांमाचा शोध घेणारा हा ग्रंथ. सामाजिक परिवर्तन आणि मराठी साहित्य यांच्यातील नाते व ताणेबाणे अधोरेखित करणारा महत्त्वाचा ग्रंथ आहे.

<u>सामाजिक परिवर्तन आणि मराठी साहित्य</u>. (डॉ. वासुदेव मुलाटे गौरवग्रंथ) संपादक डॉ. र. बा. मंचरकर, पद्मगंधा प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती : २३.१०.२०११)

yugwanivss@rediffmail.com



चित्रकार विजयराज बोधनकर

- विदर्भातल्या दोनशे ते अडीचशे वर्षे जुन्या विठ्ठल मंदिरात जन्म. घरी पाच पिढ्यांपासून चित्रकला, मूर्तीकला व सुवर्णकलेची परंपरा.
- शालेय शिक्षण विदर्भात. त्यानंतर सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट मुंबई येथे कलाशिक्षण.
- अनेक जाहिरात कंपन्यांमध्ये उपयोजित चित्रकार म्हणून कार्य.
- 'लोकसत्ता', 'लोकमत', 'सकाळ' या वृत्तपत्रांमध्ये चित्रकार म्हणून दहा वर्षे कार्य.
- 'रे मना' या दिवाळी अंकाचे संपादन. या दिवाळी अंकाला पंधरा पुरस्कार मिळाले.
- महात्मा जोतीराव फुले ते विश्वास पाटील या कालखंडातील शंभर साहित्यिकांच्या स्वभावचित्रांचे प्रदर्शन. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनांसह जागतिक मराठी साहित्य अकादमीच्या संमेलनातही हे प्रदर्शन गाजले.
- अस्सल आध्यात्मिक चित्रकारितेच्या क्षेत्रात विशेष कामगिरी. चेन्नई, बंगलोर, हैद्राबाद, मुंबई, दिल्ली येथील नामवंत आर्ट गॅलरीज् मधून आध्यात्मिक पेंटिंग्ज्ची प्रदर्शने. आध्यात्मिक चित्रांना जगभर मागणी.
- झी चोवीस तास या वाहिनीवर तब्बल अडीच तास विठ्ठलावर निरूपण. दूरदर्शन, आय.बी.एन. लोकमत, ई. टी.व्ही. या वाहिन्यांवरून मुलाखती प्रसारित.
- 'कथा एका मित्राची' या कथाकथनाच्या माध्यमातून अंधश्रद्धा निर्मुलनाचे कार्य. ग्रामीण भागात चित्रकीर्तन व अनेक ठिकाणी व्याख्याने, कथाकथन.
- 'महाराष्ट्र टाईम्स', 'नवशक्ती', 'पुढारी' या वृत्तपत्रांच्या पुरवण्यांमधून लेखमाला प्रसिद्ध. 'पुढारी' या दैनिकातील 'जागर वयाचा' ही लेखमाला फार लोकप्रिय ठरली. सध्या 'सामना' वृत्तपत्रातील 'उत्सव' पुरवणीत 'क-कलेचा' हा स्तंभ सुरू.
- पुस्तके : 'यात तुमचा स्वभाव कुठला?', 'साहित्यिकांची स्वभावचित्रे', 'लाईन मारता मारता' (व्यंगचित्रांची लाईन बरं का!) ही पुस्तके प्रकाशित.
- 'जागर वयाचा', 'चित्रकला फुलवून सांगताना', 'देवाला दगड मारणाऱ्या मित्राची कथा' ही पुस्तके प्रकाशनाच्या मार्गावर.
- पुरस्कार : चित्रकार मुळगावकर पुरस्कार, मराठी वृत्तपत्र संघाचा पुरस्कार, रोटरी क्लब पुरस्कार, जनादेश पुरस्कार वगैरे अनेक पुरस्कार.

अनुक्रमणिका



।। चित्रांविषयी ।।

की टू डिव्हॉनिटी...

विजयराज बोधनकर

■

एका पत्रकाराने मला एक शब्दात अध्यात्माचा अर्थ विचारला. मी म्हणलो, 'अध्यात्म म्हणजे स्व-संशोधन.' जीवन म्हणजे काय? तर जीव अन्तो... तो म्हणजे ईश्वर... ईश्वर म्हणजे ऊर्जा... न दिसणारी पण प्रवाहीत असणारी. जसं माझं शरीर हे आईच्या उदरात घडलं पण आईने नाही घडवलं, तिने फक्त वाढविलं आणि जन्म दिला. मग एका शुक्रानुतून हे शरीर टप्प्याटप्प्याने कसं वाढत गेलं? हा माझा गहण प्रश्न मात्र केंद्र प्रवाहित बिंदू बनत गेला. शेवटी ज्याला उत्तर नाही अशा उत्तराच्या मागे लागलो आणि चिकित्सक पद्धतीने विचार करीत राहिलो. कुठल्याही प्रश्नाचं संशोधन झालं नाही की, मग संशयाचं भूत मानगुटीवर बसतं. सृष्टी आणि मी, शेवटी मी सुद्धा सृष्टीचाच अंश आहे. कारण पंचमहाभूताच्या ऊर्जेपासूनच मी घडलो आणि सृष्टीही पंचमहाभूतातून उत्पन्न झाली आहे. आत्मा सर्वत्र एकच आहे... हे मी हजारदा तरी वाचलं. आत्मा दिसत नाही, पण आहे! हे मला त्रिवार मान्य आहे, कारण विद्युत प्रवाह तारेतून वाहत असतांना दिसत नसतो पण असतो हे मात्र निश्चित. परंतु मी मात्र माझ्या आत्म्याला रोज पाहतो आणि त्याला नमस्कार करतो. हा विचार ऐकून नक्कीच सारे हसतील...पण, जेव्हा जेव्हा माझं लक्ष सूर्याकडे जातं आणि त्याच्या ऊर्जेबद्दल विचार करतो तेव्हा मात्र माझं संशोधन आणि गहण होत जातं आणि मन म्हणतं की, सर्वांचा आत्मा जर एकच असेल तर मग तो सूर्यच आहे... कारण सूर्यापासून निर्माण होणारी ऊर्जा हीच इथल्या प्रत्येक सजीवाला चालतं बोलतं करते. जसं प्रत्येक मोबाईल चार्ज करावा लागतो तेव्हा तो ॲक्टीवेट होतो तसंच सूर्य हा मानवाचा चार्जर आहे, आणि मानवी शरीर हे ऊर्जा ग्रहण करणारं पिरॅमीड आहे. त्या सूर्यातून प्रसरण पावणारी ऊर्जा पृथ्वीवरची प्रत्येक गोष्ट शोषण करून घेते आणि ॲक्टीवेट अर्थातच गतिमान होते. म्हणूनच रोज सूर्याला अर्ध्य देण्याची परंपरा जन्माला आली असावी.

चिंतन हा माझा विचारगर्भ आहे. चिंतनाची शाळा अनेक बाजूने विचार करावयास भाग पाडते. निसर्ग हा सूर्याकडून ऊर्जा घेतो आणि सर्वांना सर्व काही देत राहतो. असं मनात येणं स्वाभाविक आहे. विचार करून शोधाची छबी मला कॅनव्हासवर प्रकट करावीशी वाटली. माणूस फक्त घेणारा आहे आणि निसर्ग देणारा आहे. विचार अक्षरातून प्रकट होतात म्हणूनच अक्षराला ब्रह्म म्हटलंय... शेवटी ब्रह्म म्हणजे गती. इथे प्रत्येक गोष्ट गतिमान आहे. इथला प्रत्येक ॲटम गतिमान आहे. कोटी वर्षापासूनच हे राहटगाडगं कासवाच्या संथगतीने कार्यरत आहे. सृष्टी क्षणाक्षणाला स्पंदीत होत राहते पण तिचे स्पंदन जगदीशचंद्र बोस सारख्या माणसाला लक्षात येतं राहतं. इथली प्रत्येक घटना ॲटमने बनलेली आहे आणि प्रत्येक ॲटम ऊर्जात्मक आहे. त्या गतीला स्वतःची मर्यादा आहे... ती घेते नी देते... देतांना अहंकार नसतो तर ओम्‌कार नाद असतो. 'ओऽऽम्' हा ही एक रहस्याचा भाग आहे. ओम म्हणजे नादब्रह्मच्या लहरी आहे. अल्फा, बीटा, थीटा ही तीन तरंगे म्हणजेच ओऽऽम्‌काराची छबी आहे. ओऽऽम्‌कारातला बिंदू हा सूर्यच आहे. शेवटी सूर्य ही ऊर्जा कुणाकडून घेतो? हा प्रश्न गहण आहे. त्या विषयावर येतांना मात्र एकच शब्द डोळ्यापूढे येतो... तो शब्द म्हणजे 'अनंत'. अनंतातच अंत नी अनंत लपला आहे. कारण त्या अनंताच्या इथल्या गोष्टीचा प्रत्येक सजीवाचा अंत ठरला असून त्याच्या विचारबिजातून पुन्हा नव्या अस्तित्वाला जन्म देऊन तो नष्ट होत असतो. म्हणजेच ही साखळी आहे... निसर्गाची, ऊर्जेची आणि अनंताची.

पण मानव हा षड्‌रिपूंना घेऊनच आलेली एक अस्वस्थ गती, व नकारात्मक आणि सकारात्मकतेचं मिश्रण आहे. मानव कधी तीक्ष्ण नकारात्मक हत्यारासारखा तर कधी

सापासारखा विष प्रवृत्तीनेही वागत असतो. हाही एक चिंतनाचाच विषय आहे. मानवाला निसर्गाने असं का घडवलं, तेव्हा यावर एकच औषध प्रत्येक माणूस जसा विचार करतो तसा तो घडत जातो. विचार बीज हेच मानवाचं व्यासपीठ आहे. त्यामुळेच माझं पुढच्या प्रदर्शनाचं नाव आहे 'द मॅन इज द सीड'. बधू या हे विचार बिजातून कुठली चित्रे जन्म घेतात ते?

शेवटी निर्मितीच्या अगोदर ती निर्मिती विचारांनी प्रेरीत झाली असते. माझ्या चित्रामागे विचारऊर्जेची प्रेरणा आहे. शेवटी चित्रकारांची चित्रे पटकन पाहून, नकारात्मक विचार करतांना, आम्हाला यातलं काही कळत नाही... असं म्हणण्यापेक्षा ती सर्व चित्र मनात साठवून त्यावर विचार केल्यास त्याची ऊर्जा ही मनाला अनंताकडे नेण्यास कारणीभूत ठरू शकते. शेवटी माणूस हाही अनंतच आहे. केव्हा? जेव्हा तो संकुचित विचार टाकून विचार करावयास प्रारंभ करतो तेव्हा. शेवटी 'सारासार विचार हरिपाठ' हाच माझ्या विचार ऊर्जेचा उगम आहे.

। विजयराज बोधनकर
२०३-१-१, ब्रंह्मांड हौ. सोसायटी,
आझाद नगर, घोडबंदर रोड,
ठाणे (प.) - ४०० ६०७
भ्रमणभाष : ९९२०४११८२८

:: साभार पोच ::

।। कविता संग्रह ।।

सोंग घेऊन हा पोर रफिक सूरज, लोकवाङ्मय गृह, मुंबई, १२५/-
एक वलय दुःखाचे ललित सोनोने, आकांक्षा प्रकाशन, नागपूर, १००/-
माझ्या वर्तमानाची नोंद पी.विठ्ठल, गोदा प्रकाशन, औरंगाबाद, १२०/-
माझे हायकू सुचित्रा कातरकर, विजय प्रकाशन, नागपूर, ७०/-
अनावृत रेषा प्रियांका डहाळे, काव्याग्रह प्रकाशन, वाशिम, १००/-
झोपडी नंबर बारा अनिल कांबळे, काव्याग्रह प्रकाशन, वाशिम, १००/-
राजहंस मी रसप, विजय प्रकाशन, नागपूर, १२०/-
काव्य मकरंद प्रातिनिधिक काव्यसंग्रह, विजय प्रकाशन, नागपूर, ७५/-
प्रतिशब्द अमर रामटेके, निर्मल प्रकाशन, नांदेड, ६०/-
संदर्भ माझ्या जातीचे मिलिंद वागूल, साक्षात प्रकाशन, औरंगाबाद, ७०/-
भूल तुष्की, विजय प्रकाशन, नागपूर, १००/-
रान-उन्मन प्रशांत पांढरे, संवेदना प्रकाशन, पुणे, १००/-
मनाच्या कविता तुष्की, विजय प्रकाशन, नागपूर, १३०/-
चला ठेचू नांगी नांगी अनंत राऊत, निर्मल प्रकाशन, नांदेड, १२५/-
सुखपारा स्वाती सुरंगळीकर, विजय प्रकाशन, नागपूर, १००/-
चित्र मही अनंत राऊत, निर्मल प्रकाशन, नांदेड, १२५/-
असेही-तसेही क्रान्ती, विजय प्रकाशन, नागपूर, १००/-
अग्निसखा क्रान्ती, विजय प्रकाशन, नागपूर, १००/-
चकोर शंकर विटणकर, तीता प्रकाशन, नागपूर १२०/-
बीजमंत्राची कविता भगवंत क्षीरसागर, संगत प्रकाशन, नांदेड, १५०/-

- परीक्षणासाठी पुस्तकाच्या दोन प्रती पाठवाव्या.
- परीक्षणासाठी आलेली पुस्तके परत पाठविली जात नाहीत.
- परीक्षणासाठी आलेल्या पुस्तकांची साभार पोच 'युगवाणी'तून देण्यात येते.
- परीक्षणार्थ पुस्तके पाठविण्याचा पत्ता :
  प्रा. अजय देशपांडे, वामनघाट मार्ग, हनुमान नगर, वणी - ४४५ ३०४, जि. यवतमाळ.

।। लेखकांसाठी सूचना ।।

- लेखकांनी आपले साहित्य कागदाच्या एका बाजूने लिहून वा मुद्रित करून पाठवावे.
- लेखनाच्या डाव्या बाजूस आवर्जून समास सोडावा.
- लेखन सुवाच्य हस्ताक्षरात आणि शुद्धलेखनाचे अधिकाधिक नियम पाळणारे असावे.
- लेखकाने आपल्या लेखनाची प्रत स्वतः जवळ ठेवावी. नापसंत लेखन परत पाठविणे शक्य होणार नाही.
- लेखन अनुवादित वा रूपांतरित असल्यास मूळ लेखकाची व प्रकाशकाची संमती लेखी स्वरूपात जोडावी.
- नव्या लेखनाचे 'युगवाणी'त स्वागत आहे.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त : जानेवारी २०१३ ते एप्रिल २०१३

■

दि. २० जानेवारी, २०१३ :

दि. ९, १०, ११ जानेवारी, २०१३ रोजी चिपळूण येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आल्याने विदर्भ साहित्य संघाचा वर्धापनदिन यावर्षी दि. २० जानेवारी, २०१३ रोजी संपन्न झाला.

दि. १ फेब्रुवारी, २०१३ :

विदर्भ साहित्य संघाद्वारे संचालित उर्दू भाषा वर्गाच्या शंभराव्या तुकडीचा समारोप समारंभ दि. १ फेब्रुवारी २०१३ रोजी झाला.

दि. १४ फेब्रुवारी, २०१३ :

स्वामी विवेकानंद ह्यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त विदर्भ साहित्य संघाच्या कार्यालयात विवेकानंदांच्या छायाचित्राचे अनावरण बंगाली असोसिएशनचे अध्यक्ष श्री. तपन चक्रवर्ती व सचिव श्री. प्रदीप गांगुली ह्यांच्या हस्ते करण्यात आले.

दि. २१ फेब्रुवारी, २०१३ :

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी प्रीत्यर्थ कऱ्हाडचे माजी खासदार श्री. श्रीनिवास पाटील (सातारा) यांनी 'आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण - एक सुवर्ण पान' या विषयावर व्याख्यान देऊन ग. त्र्यं. माडखोलकर' स्मृती व्याख्यानमालेचे पुष्प गुंफले.

दि. २७, २८ फेब्रुवारी, २०१३ :

मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, जिल्हा ग्रंथालय, माहिती संचालनालय आणि विदर्भ साहित्य संघ यांच्या सहकार्याने आयोजित ग्रंथोत्सवात विदर्भ साहित्य संघाच्या वतीने 'भाषा आणि संस्कृती' या विषयावर एका परिचर्चेचे आयोजन करण्यात आले होते.

दि. ३ मार्च, २०१३ :

विदर्भ साहित्य संघाच्या 'घर-अंगण' प्रकल्पांतर्गत 'मैत' या एकांकिकेचा प्रयोग सादर करण्यात आला.

दि. ९ मार्च, २०१३ :

विदर्भ साहित्य संघाच्या 'चित्रलिपी' उपक्रमांतर्गत ९ मार्च, रोजी भारतीय शास्त्रीय नृत्यांवरील वृत्तचित्रांचे प्रदर्शन फिल्म्स डिव्हिजनच्या नागपूर विभागाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आले.

दि. १६ मार्च, २०१३ :

गुरुदेव रवींद्रनाथ टागोर ह्यांना लाभलेल्या नोबेल पारितोषिकाला यंदा शंभर वर्षेपूर्ण झाली. या निमित्ताने वीणा आलासे यांच्या 'रवींद्र-दीक्षा : सप्तपर्णी' ह्या पुस्तकाचे प्रकाशन लेखिका आशा बगे यांच्या हस्ते झाले.

दि. २४ मार्च, २०१३ :

विदर्भ साहित्य संघ आणि आंबेडकरी विद्वत् सभा यांच्या संयुक्त विद्यमाने आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. ज.वि. पवार यांचे 'अक्षरशिल्प' या प्रकल्पांतर्गत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ग्रंथ 'ॲनिहिलेशन ऑफ कास्ट व सद्यस्थिती' या विषयावर व्याख्यान झाले.

दि. २७ एप्रिल, २०१३ :

विदर्भ साहित्य संघाच्या 'घर-अंगण' प्रकल्पांतर्गत ज्योती मोहन पुजारी लिखित 'माफीचा साक्षीदार'या कादंबरीची नायिका 'शेवंता' अभिनेत्री श्रद्धा तेलंग यांनी अभिनीत केली तर 'जय-पराजय' कादंबरीची नायिका 'डॉ. प्रिया' कल्याणी गोखले यांनी साकार केली.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त : जानेवारी २०१३ ते एप्रिल २०१३

■

दि. २० जानेवारी, २०१३ :

दि. ९, १०, ११ जानेवारी, २०१३ रोजी चिपळूण येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आल्याने विदर्भ साहित्य संघाचा वर्धापनदिन यावर्षी दि. २० जानेवारी, २०१३ रोजी संपन्न झाला.

दि. १ फेब्रुवारी, २०१३ :

विदर्भ साहित्य संघाद्वारे संचालित उर्दू भाषा वर्गाच्या शंभराव्या तुकडीचा समारोप समारंभ दि. १ फेब्रुवारी २०१३ रोजी झाला.

दि. १४ फेब्रुवारी, २०१३ :

स्वामी विवेकानंद ह्यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त विदर्भ साहित्य संघाच्या कार्यालयात विवेकानंदांच्या छायाचित्राचे अनावरण बंगाली असोसिएशनचे अध्यक्ष श्री. तपन चक्रवर्ती व सचिव श्री. प्रदीप गांगुली ह्यांच्या हस्ते करण्यात आले.

दि. २१ फेब्रुवारी, २०१३ :

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी प्रीत्यर्थ कऱ्हाडचे माजी खासदार श्री. श्रीनिवास पाटील (सातारा) यांनी 'आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण - एक सुवर्ण पान' या विषयावर व्याख्यान देऊन ग. त्र्यं. माडखोलकर' स्मृती व्याख्यानमालेचे पुष्प गुंफले.

दि. २७, २८ फेब्रुवारी, २०१३ :

मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, जिल्हा ग्रंथालय, माहिती संचालनालय आणि विदर्भ साहित्य संघ यांच्या सहकार्याने आयोजित ग्रंथोत्सवात विदर्भ साहित्य संघाच्या वतीने 'भाषा आणि संस्कृती' या विषयावर एका परिचर्चेचे आयोजन करण्यात आले होते.

दि. ३ मार्च, २०१३ :

विदर्भ साहित्य संघाच्या 'घर-अंगण' प्रकल्पांतर्गत 'मैत' या एकांकिकेचा प्रयोग सादर करण्यात आला.

दि. ९ मार्च, २०१३ :

विदर्भ साहित्य संघाच्या 'चित्रलिपी' उपक्रमांतर्गत ९ मार्च, रोजी भारतीय शास्त्रीय नृत्यांवरील वृत्तचित्रांचे प्रदर्शन फिल्म्स डिव्हिजनच्या नागपूर विभागाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आले.

दि. १६ मार्च, २०१३ :

गुरुदेव रवींद्रनाथ टागोर ह्यांना लाभलेल्या नोबेल पारितोषिकाला यंदा शंभर वर्षेपूर्ण झाली. या निमित्ताने वीणा आलासे यांच्या 'रवींद्र-दीक्षा : सप्तपर्णी' ह्या पुस्तकाचे प्रकाशन लेखिका आशा बगे यांच्या हस्ते झाले.


दि. २४ मार्च, २०१३ :

विदर्भ साहित्य संघ आणि आंबेडकरी विद्वत् सभा यांच्या संयुक्त विद्यमाने आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. ज.वि. पवार यांचे 'अक्षरशिल्प' या प्रकल्पांतर्गत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ग्रंथ 'ॲनिहिलेशन ऑफ कास्ट व सद्यस्थिती' या विषयावर व्याख्यान झाले.

दि. २७ एप्रिल, २०१३ :

विदर्भ साहित्य संघाच्या 'घर-अंगण' प्रकल्पांतर्गत ज्योती मोहन पुजारी लिखित 'माफीचा साक्षीदार'या कादंबरीची नायिका 'शेवंता' अभिनेत्री श्रद्धा तेलंग यांनी अभिनीत केली तर 'जय-पराजय' कादंबरीची नायिका 'डॉ. प्रिया' कल्याणी गोखले यांनी साकार केली.

अनुक्रमणिका


विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक
युगवाणी
एप्रिल-मे-जून २०१३
चित्र : विजयराज बोधनकर

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त : जानेवारी २०१३ ते एप्रिल २०१३

■

दि. २० जानेवारी, २०१३ :

दि. ९, १०, ११ जानेवारी, २०१३ रोजी चिपळूण येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आल्याने विदर्भ साहित्य संघाचा वर्धापनदिन यावर्षी दि. २० जानेवारी, २०१३ रोजी संपन्न झाला.

दि. १ फेब्रुवारी, २०१३ :

विदर्भ साहित्य संघाद्वारे संचालित उर्दू भाषा वर्गाच्या शंभराव्या तुकडीचा समारोप समारंभ दि. १ फेब्रुवारी २०१३ रोजी झाला.

दि. १४ फेब्रुवारी, २०१३ :

स्वामी विवेकानंद ह्यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त विदर्भ साहित्य संघाच्या कार्यालयात विवेकानंदांच्या छायाचित्राचे अनावरण बंगाली असोसिएशनचे अध्यक्ष श्री. तपन चक्रवर्ती व सचिव श्री. प्रदीप गांगुली ह्यांच्या हस्ते करण्यात आले.

दि. २१ फेब्रुवारी, २०१३ :

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी प्रीत्यर्थ कऱ्हाडचे माजी खासदार श्री. श्रीनिवास पाटील (सातारा) यांनी 'आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण - एक सुवर्ण पान' या विषयावर व्याख्यान देऊन ग. त्र्यं. माडखोलकर' स्मृती व्याख्यानमालेचे पुष्प गुंफले.

दि. २७, २८ फेब्रुवारी, २०१३ :

मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, जिल्हा ग्रंथालय, माहिती संचालनालय आणि विदर्भ साहित्य संघ यांच्या सहकार्याने आयोजित ग्रंथोत्सवात विदर्भ साहित्य संघाच्या वतीने 'भाषा आणि संस्कृती' या विषयावर एका परिचर्चेचे आयोजन करण्यात आले होते.

दि. ३ मार्च, २०१३ :

विदर्भ साहित्य संघाच्या 'घर-अंगण' प्रकल्पांतर्गत 'मैत' या एकांकिकेचा प्रयोग सादर करण्यात आला.

दि. ९ मार्च, २०१३ :

विदर्भ साहित्य संघाच्या 'चित्रलिपी' उपक्रमांतर्गत ९ मार्च, रोजी भारतीय शास्त्रीय नृत्यांवरील वृत्तचित्रांचे प्रदर्शन फिल्म्स डिव्हिजनच्या नागपूर विभागाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आले.

दि. १६ मार्च, २०१३ :

गुरुदेव रवींद्रनाथ टागोर ह्यांना लाभलेल्या नोबेल पारितोषिकाला यंदा शंभर वर्षेपूर्ण झाली. या निमित्ताने वीणा आलासे यांच्या 'रवींद्र-दीक्षा : सप्तपर्णी' ह्या पुस्तकाचे प्रकाशन लेखिका आशा बगे यांच्या हस्ते झाले.


दि. २४ मार्च, २०१३ :

विदर्भ साहित्य संघ आणि आंबेडकरी विद्वत् सभा यांच्या संयुक्त विद्यमाने आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. ज.वि. पवार यांचे 'अक्षरशिल्प' या प्रकल्पांतर्गत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ग्रंथ 'ॲनिहिलेशन ऑफ कास्ट व सद्यस्थिती' या विषयावर व्याख्यान झाले.

दि. २७ एप्रिल, २०१३ :

विदर्भ साहित्य संघाच्या 'घर-अंगण' प्रकल्पांतर्गत ज्योती मोहन पुजारी लिखित 'माफीचा साक्षीदार'या कादंबरीची नायिका 'शेवंता' अभिनेत्री श्रद्धा तेलंग यांनी अभिनीत केली तर 'जय-पराजय' कादंबरीची नायिका 'डॉ. प्रिया' कल्याणी गोखले यांनी साकार केली.

अनुक्रमणिका


विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक
युगवाणी
एप्रिल-मे-जून २०१३
चित्र : विजयराज बोधनकर

अनुक्रमणिका



ISSN-2319-6092

वार्षिक वर्गणी : २०० रूपये

पत्ता :
विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक,
नागपूर - ४४० ०१२
दूरध्वनी : ०७१२-२५२३९२९, २५५३७६७

संपादकीय पत्रव्यवहार :
प्रा. अजय देशपांडे
वामनघाट मार्ग, हनुमान नगर,
वणी - ४४५ ३०४, जि. यवतमाळ.
भ्रमणभाष : ९८५०५९३०३०
ई-मेल : srushti_ajay@rediffmail.com
yugwanivss@rediffmail.com

www. yugwanivss.com
www.facebook.com/yugwani.ank@gmail.com

श्री विदर्भ साहित्य संघ
विदर्भ विषय: सारस्वतीजन्मभू: ॥
मकर संक्रांत १९२३

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक
युगवाणी

अनुक्रमणिका